...पे
...हिंदी
...
...0064

राष्ट्रवादाचे शिल्पकार

बाळ गंगाधर टिळक

गोवर्धन पारीख

REFBK-0017300



069364
निबंध
9313160

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्वत्वाचा.
अनुक्रम 069364 वि: निबंध
क्रमांक 916.54 दि: 23/3/60

भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार

बाळ गंगाधर टिळक

गोवर्धन पारीख

मराठी ग्रंथ संग्रहालय, मणे. स्थलम
अनुक्रम ७१३७५ दि: ...
क्रमांक १७८५ दि: १३१३

शिवाजी विद्यापीठाच्या

लोकमान्य टिळक स्मारक व्याख्यानमालेतर्फे

दिलेली व्याख्याने

मराठी ग्रंथ संग्रहालय पुणे
दा. क्र. 96300

REFBK-0017300

मौज प्रकाशन गृह, मुंबई ४

मौज प्रकाशन : १७८

पहिली आवृत्ती : जुलै १९६९

© १९६९, गोवर्धन पारीख

किंमत : चार रुपये

मांडणी व वेष्टण : गजानन भागवत

प्रकाशक : वि० पु० भागवत, मौज प्रकाशन गृह, खटाववाडी, मुंबई ४

मुद्रक : वि० पु० भागवत, मौज प्रिंटिंग ब्यूरो, खटाववाडी, मुंबई ४

आधी काय? सामाजिक की राजकीय? १

'मवाळ' आणि 'जहाल' २४

भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार ४४

ठाणे ग्रंथ संग्रहालय, ठाणे, स्थलांक
अनुक्रम ७९३७५ वि: अभिलेख
दिनांक १७/५/ वर्ग वि: ९३१३१

प्रस्तावना

मराठी ... भाग. स्वरूप
अनुक्रम ...४१३७५... दि: ...१९८५...
क्रमांक ...१८८५... नोंद दि: ...२३१३...

महाराष्ट्र शासनाच्या योजनेनुसार शिवाजी विद्यापीठात लोकमान्य टिळक स्मारक व्याख्यानमाला दरवर्षी सुरू आहे. यंदाचे १९६८–६९ हे या व्याख्यानमालेचे तिसरे वर्ष होय. प्रथम वर्षी ही व्याख्याने रत्नागिरी येथे झाली आणि त्यासाठी थोर साहित्यिक श्री० धनंजय कीर हे लाभले. दुसऱ्या वर्षी सुप्रसिद्ध इतिहाससंशोधक प्रा० न० र० फाटक यांनी ही व्याख्याने कोल्हापूर येथे शिवाजी विद्यापीठाच्या सभागृहात दिली. यंदा शिक्षण-तज्ञ व मुंबई विद्यापीठाचे भूतपूर्व रेक्टर प्रा० गोवर्धन पारीख यांनी ही व्याख्यानमाला सांगली येथे गुंफली. प्रा० पारीख यांनी कार्यबाहुल्यातूनही सवड काढून या व्याख्यानांची जबाबदारी स्वीकारली याबद्दल त्यांना धन्यवाद द्यावेत तेवढे थोडेच आहेत. ही व्याख्याने पुस्तकरूपाने मराठी वाचकांना आता उपलब्ध होत आहेत. प्रस्तुत भाषणे वाचताना प्रा० पारीख यांनी ती तयार करण्याच्या कामी किती परिश्रम घेतलेले आहेत हे वाचकांना कळून येईल. त्यांची सर्वच मांडणी अभ्यासपूर्ण व विवेचक अशी आहे.

या ठिकाणी एवढेच म्हणावेसे वाटते की, प्रा० पारीख यांनी केलेल्या काही विधानांची अधिक स्पष्टता करण्याइतका अवसर त्यांना मिळाला असता तर विषयाच्या स्पष्टीकरणाच्या दृष्टीने फार बरे झाले असते. उदाहरणार्थ, 'भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार' ह्या त्यांच्या तिसऱ्या व्याख्यानात ते म्हणतात की, "'कांहीं कारणामुळें' एकराष्ट्रीयत्वाची कल्पना रुजत नाही असे त्यांचे (लोकमान्यांचे) म्हणणे. ते कारण दिसत नव्हते. असे का व्हावे? याचे उत्तर सामाजिक सुधारणेचा मार्ग त्यांनी त्याज्य ठरविला हे होय. सुधारणा तूर्त नको असे म्हणणे म्हणजे सामाजिक समीक्षा तूर्त नको असे होते. त्यामुळे टिळकांच्या विचारांना स्वाभाविकच मर्यादा निर्माण झाल्या आणि त्यांच्या सुसंगतीला तडा गेला." पुढे टिळकांच्या धर्म, प्रांत यांसंबंधीच्या विचारांबाबत प्रा० पारीख सांगतात की, "... त्यांच्या (लोकमान्यांच्या) जातिविषयक भूमिकेमुळेही काही महत्त्वाचे गैरसमज झाले आहेत. वेदोक्तप्रकरणातील त्यांची भूमिका व अस्पृश्यतेबाबतच्या पत्रकावर सही करण्यास त्यांनी दिलेला नकार याबद्दलची आठवण ही दोन उदाहरणे दिली जातात. या दोन्ही प्रसंगी टिळकांनी घेतलेली भूमिका समर्थनीय ठरत नाही. ज्या सामान्य जनतेला ते राजकीय लढ्याकडे आकर्षित करू पाहात होते त्या जनतेच्याच मनात या काहीशा वाकिली पद्धतीच्या लेखनाने ते दुरावा निर्माण करीत होते." एवढे सांगून झाल्यावर प्रा० पारीख लगेच म्हणतात, "तथापि मृत्युवश होण्याच्या अवघे साडेचार महिने आधी लिहिलेल्या एका

लेखात टिळक म्हणतात, '...अधिकारारूढ पुरुष त्याच्या त्याच्या विषयांत निष्णात असला म्हणजे झालें; मग तो जातीचा ब्राह्मण असो वा ब्राह्मणेतर असो, जैन असो वा लिंगायत असो; तिकडे पहाण्याचें कारण नाहीं....रणांगणांत तलवार गाजवणारा कोणी असला तरी ज्याप्रमाणें तो क्षत्रिय अगर मराठा समजावयाचा तद्वतच हल्लींच्या कठीण प्रसंगीं कामास आलेला किंवा येणारा पुरुष ब्राह्मणेतर असला तरी ब्राह्मणच समजला पाहिजे. जाति-भेद जन्मसिद्ध न मानतां गुणकर्मसिद्ध मानण्यास येथेंच सुरुवात होते व झाली पाहिजे.''' प्रा० पारीख यांनी लोकमान्यांच्या या विचारांना ''लोकमान्यांचे हे राजकीय मृत्युपत्रच होय'' असे म्हटले आहे. तितक्या महत्त्वाचे हे विचार आहेत यात शंकाच नाही. प्रश्न एवढाच आहे कीं, वेदोक्तप्रकरण व अस्पृश्यतेसंबंधीच्या घटना घडून गेल्यानंतर लो० टिळकांच्या विचारांत त्यांच्या जीवनाच्या शेवटी शेवटी काही मूलगामी बदल घडले असे मानायचे काय? या आणि अशाच काही प्रश्नांचा अधिक विचार झाला असता तर लोकमान्यांच्या व्यक्तित्वावर अधिक चांगला प्रकाश पडला असता. तथापि प्रा० पारीख यांच्या विवेचनातून विचारांना चालना निश्चित मिळेल याची खात्री वाटते.


प्रा० पारीख यांची तीनही व्याख्याने उत्कृष्ट झाली. वाचकांनाही ती तशी वाटतील यात शंकाच नाही.

या व्याख्यानांची एकंदर व्यवस्था करण्याचे काम स्थानिक समितीकडे होते. ते काम समितीने उत्तम रीतीने केले. त्यासाठी समितीचे, विशेषतः विलिंग्डन महाविद्यालयाचे प्राचार्य ना० बा० तारे यांचे, आभार मानले पाहिजेत.

आप्पासाहेब पवार

कोल्हापूर
१६-५-१९६९
वैशाख २६, १८९१

आभार



शिवाजी विद्यापीठाची दरवर्षी होणारी टिळक स्मारक व्याख्यानमालेची व्याख्याने १९६८-६९ या वर्षासाठी देण्याचे आमंत्रण देऊन लोकमान्यांविषयी माझे विचार प्रकट करण्याची संधी विद्यापीठाने मला दिली याबद्दल विद्यापीठाचे कार्यकारी मंडळ आणि कुलगुरू डॉ० आप्पासाहेब पवार यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

ही व्याख्याने प्रसिद्ध करण्याची परवानगी देऊन विद्यापीठाने मला अधिकच उपकृत केले आहे. डॉ० आप्पासाहेब पवार यांनी लिहिलेली प्रस्तावना हीही नेहमीच्या औपचारिक स्वरूपाची नसून, त्यांच्या माझ्यावरील लोभाची ती द्योतक आहे. आप्पासाहेबांचे आभार मानावे तितके थोडेच, अशी माझी भावना आहे.

लोकमान्यांनी स्थापन केलेल्या डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या फर्ग्युसन महाविद्यालयाचा मी विद्यार्थी. तेथेच मी सामाजिक व राजकीय प्रश्नांसंबंधी विचार करावयास आरंभ केला. आणि त्याच 'सोसायटी'ने चालविलेल्या विल्लिंग्डन महाविद्यालयात लोकमान्यांच्या कार्याविषयी प्रथम बोलण्याची मला संधी मिळाली. या योगायोगाबद्दल मला साहाजिकच आनंद आणि अभिमान वाटतो. व्याख्यानांच्या दिवसांत सर्व प्रकारे उत्कृष्ट व्यवस्था केल्याबद्दल आणि प्रेमळ आदरातिथ्याबद्दल प्राचार्य तारे, प्रा० दामोळकर आणि प्रा० हातकणंगलेकर यांचा मी अत्यंत आभारी आहे.

व्याख्यानविषयाची वेळोवेळी अनेक स्नेह्यांशी चर्चा झाली. त्यांतील काहींचा कृतज्ञतापूर्वक उल्लेख करणे आवश्यक आहे. तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी, प्रा० न० र० फाटक, प्रा० अ० भि० शहा यांच्याशी झालेल्या चर्चेतून सुचलेले कित्येक विचार व्याख्यानांत विखुरलेले आहेत. तथापि ते अशा स्वरूपात मांडण्याची आणि त्यांतील अपुरेपणाची व दोषांची जबाबदारी मात्र सर्वस्वी माझीच होय.

प्रकाशनाचा विषय काढताच अत्यंत आपुलकीने श्री० पु० आणि विष्णुपंत भागवत यांनी जबाबदारी स्वीकारली आणि अत्यंत साक्षेपाने आणि त्वरेने ती पार पाडली. त्यांचे माझ्यावरील ऋण सतत वाढतच आहे. आणि त्या ऋणात सतत राहावे अशीच माझी इच्छा आहे.

मुंबई
२० मे, १९६९

गोवर्धन पारीख

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळम
क्रमांक ७१३५५ दि. १९८५
क्रमांक १७८५ दि. २३।१।८७

टिळकांचे चरित्रकार श्री० न० चिं० केळकर यांनी टिळकचरित्र अनेक प्रकारांनी लिहिता येईल असे म्हटले आहे. आणि "मुख्यतः घडलेला इतिहास संगतवार सांगण्याच्या दृष्टीनेंच" आपण चरित्र लिहिले असे स्पष्टीकरणही केले आहे. माझा प्रयत्न टिळकचरित्र सांगण्याचा नाही. तथापि त्या चरित्रातील घटनांचा निरनिराळ्या दृष्टींनी अर्थ लावणे शक्य आहे. आणि अशा प्रयत्नांपैकीच हा एक प्रयत्न आहे. टिळकांचे कार्य हे प्रामुख्याने राजकीय आहे आणि त्याचाच मी विचार करणार आहे.

"टिळकांनीं कॉलेजांत प्रवेश केल्यापासून (१८७२) ते मृत्युवश होईपर्यंत (१९२०) सुमारें पन्नास वर्षांचा काळ गेला. तितकाच तो १८७२ पूर्वी जाऊन मोजला असतां १८२२ हें वर्ष येतें. म्हणजे पुण्यास पेशवाईची अखेर झाल्यापासून अवघीं चारच वर्षें होतात. यामुळे पूर्वसंशोधनास एक प्रकारचें निश्चित व निर्णायक असें स्वरूप येऊं शकतें."[1] असे मत श्री० केळकरांनी व्यक्त केले आहे. स्वतः टिळकांनी १८२० ते १८७० या कालखंडाचे "एक राज्य जाऊन दुसरें राज्य कायम होईपर्यंत मध्यंतरींचा काल" असे वर्णन केले आहे. आणि असा काल "राष्ट्राच्या अभिवृद्धीस पुष्कळ प्रकारें प्रतिबंधक असतो" असा ऐतिहासिक तत्त्वाचा आधार देऊन या कालात "महाराष्ट्रदेशाची स्थिति अशाच प्रकारची होती"[2] असे म्हटले आहे. टिळक मृत्युवश झाल्यापासून आता सुमारे पन्नास वर्षे झाली आहेत. यामुळे आता "निश्चित व निर्णायक" स्वरूपाचे काही सांगणे शक्य आहे. माझा प्रयत्न तशा प्रकारचा आहे असा माझा मुळीच दावा नाही. परंतु त्या दिशेने प्रयत्न व्हावेत असे आवाहन मी जरूर करीन. तोच या व्याख्यानांचा मुख्य हेतू आहे.

लोकमान्यांच्या निरनिराळ्या प्रतिमा निरनिराळ्या लोकांपुढे आहेत. त्यांच्याविषयी अनेक अपसमज आहेत.[3] ही परिस्थिती आता बदलली पाहिजे हे सहज मान्य होईल. तथापि, त्याबरोबरच क्रियाशील व्यक्तीचे जीवन हे एखाद्या वैचारिक प्रमेयासारखे तर्कशुद्ध, सुसंगत असत नाही हेही ध्यानात ठेवले पाहिजे. म्हणून विचारांच्या वा घटनांच्या सुसंगतीला महत्त्व देण्याऐवजी जिव्हाळा व जाणीव यांच्या आधाराने त्या जीवनाचा अर्थ लावणे अधिक महत्त्वाचे ठरते.

विशिष्ट घटनेला वा घटनांना महत्त्व किंवा मोल नाही असे नाही, पण ते एकूण जीवनकार्याच्या संदर्भात; आणि त्यामुळेच, तसे न मानल्यास एखादी सकृद्दर्शनी विसंवादी घटना अवास्तव महत्त्व पावते किंवा ओढाताण करून ती विशिष्ट साच्यात बसविण्याचा प्रयत्न केला जातो. या दोन्ही प्रवृत्ती टाळणे मला आवश्यक वाटते.

ज्या कल्पनांच्या आधारे घटनांचा किंवा विधानांचा अर्थ लावायचा त्यांचे स्वरूपही काही वेळा स्पष्ट नसते. उदाहरणार्थ, राष्ट्रीयत्व ही टिळकांच्या जीवनकार्याच्या संदर्भात एक मध्यवर्ती कल्पना आहे. एक तर स्वातंत्र्य-आंदोलनाच्या वाढीबरोबरच राष्ट्रीयत्वाची आमची जाणीवही बदलत गेलेली दिसते. दुसरे म्हणजे आजचे राष्ट्रीयत्वाचे निरनिराळे अर्थ टिळकांच्या काळच्या परिस्थितीत प्रतिबिंबित झालेले पाहाणे आणि टिळक या वा त्या बाजूचे होते असे म्हणणे हा टिळकांवर अन्याय आहे. तात्पर्य, त्यांचे म्हणणे तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भातच प्रथम अर्थपूर्ण केले पाहिजे. त्यानंतर त्यांतील शाश्वत भाग शोधता येईल. तत्कालीन परिस्थितीच्या मर्यादा उल्लंघून जाण्याचे सामर्थ्य लोकमान्यांच्या विचारांत आणि जीवनदृष्टीत आहे की नाही हेही आपणांस तपासून पाहायचे आहे.

अर्थात हे शोधताना काही अडचणी आहेत. उपलब्ध साधनसामग्री मी पूर्णपणे तपासली आहे असे मुळीच नाही; यामुळे माझे निष्कर्ष सुधारणे किंवा बदलणे शक्य आहे. शिवाय नवी साधने उपलब्ध होत जाणारच. लोकमान्यांचे राजकीय विचार हे बव्हंशाने वृत्तपत्रीय लेखनातून व्यक्त झालेले आहेत. अशा लेखनाच्या बाबतीत विचार, विशिष्ट घटनेबद्दलच्या प्रतिक्रिया, वादांतील भूमिका, विशिष्ट मुद्यांवर परिस्थित्यनुरूप कमीजास्त भर, इत्यादी निरनिराळ्या गोष्टींची सरमिसळ होते आणि कित्येक वेळा पुनरुक्तीही होते. शिवाय टिळकांच्या लेखनाच्या बाबतीत, "त्यांनीं लिहिलेला एकादा अग्रलेख दुसऱ्याचा व दुसऱ्यानें लिहिलेला अग्रलेख त्यांचा, असा भ्रम चुकून एखाद्याही ठिकाणीं आम्हांला पडला नसेल अशी खात्री किंवा निर्वाळा आम्हीं देऊं शकत नाही."[४] अशी कबुली केळकरांसारख्या निकटवर्तीयांनी प्रांजलपणाने दिली आहे. स्वतः टिळकांनीही या बाबतीत संपादकाला येणारी अडचण एका प्रसंगी सूचित केली आहे.[५] हे सर्व ध्यानात घेतले पाहिजे. त्याबरोबरच सुमारे ३५–४० वर्षांच्या आपल्या कर्तृत्वाच्या काळात लोकमान्य बदलले नाहीत असेही म्हणता यायचे नाही. आणि कोणतेही निश्चित मत बनवताना ही गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे.

हे प्रास्ताविक स्पष्टीकरण केल्यानंतर एका महत्त्वाच्या तत्कालीन वादाकडे मी वळतो. 'आधी सामाजिक की आधी राजकीय' असे या वादाचे स्वरूप सांगितले जाते. टिळक आणि आगरकर हे डेक्कन कॉलेजात असतानाच हा वाद सुरू झाला. आणि सुमारे १९०१ पर्यंत तो आमच्या सामाजिक जीवनातील

एक मध्यवर्ती प्रश्न म्हणून टिकला. १८९५ साली आगरकर मृत्युवश झाले, आणि १९०१ साली रानडे गेले. त्यानंतर मात्र हळूहळू या वादाऐवजी राजकीय 'मवाळ' व 'जहाल' या भेदाला अधिक महत्त्व आले. टिळकांच्या कार्याचे मूल्यमापन करताना या वादाला बरेच महत्त्व दिले गेले आहे. आणि ते स्वाभाविक आहे. महाराष्ट्रातील सुशिक्षितांत या वादामुळे दोन तट निर्माण झाले आणि त्या काळी व त्यानंतरही सुमारे १९२० सालापर्यंत बहुतेकांचे विचार या वादाभोवतीच बव्हंशी गुंफलेले आहेत असे म्हणता येईल. यामुळे या प्रश्नाचा सविस्तर विचार करणे आवश्यक वाटते.

एका अर्थी हा वाद टिळक-आगरकर यांच्यापासून सुरू झाला किंवा तो त्यांच्यापुरताच मर्यादित होता असे नाही. सार्वजनिक प्रश्नांविषयी आस्था असलेले तत्कालीन बरेच सुशिक्षित त्यात ही किंवा ती बाजू घेत. आणि त्यांच्या भूमिकांना राजकीय घटनांची आणि व्यापक विचारांची संपन्न पार्श्वभूमी होती असे म्हणता येईल.

१८१८ साली पेशवाईचा शेवट झाला, हे विधान म्हणजे एक औपचारिक (फॉर्मल) ऐतिहासिक सत्य आहे. एखादी राजवट केव्हा सुरू झाली आणि केव्हा संपली हे ऐतिहासिक घटनाप्रवाहाच्या दृष्टीने सांगणे कठीण असते. तत्संबंधीची विधाने घटनांचा कालानुक्रम सूचित करतात. परंतु इतिहासाच्या प्रवाहाचा अर्थ लावताना त्या विधानांच्या मर्यादा ध्यानात घेतल्या पाहिजेत. १८२० ते १८७० या कालखंडाविषयीचे लोकमान्यांचे म्हणणे या दृष्टीने अर्थपूर्ण आहे. एक राजवट जाणे आणि दुसरी येणे ही एका विशिष्ट क्षणी घडणारी घटना नसून तो एका कालखंडात घडून येणारा बदल आहे, हे यावरून स्पष्ट होते.

या कालखंडातील सर्वांत महत्त्वाची राजकीय घटना म्हणजे १८५७ सालचे बंड ही होय. दिल्लीची गादी आणि पेशवाई या दोहोंच्या वारसदारांचा गेलेले राज्य मिळविण्याचा तो एक संघटित सशस्त्र प्रयत्न होता. इंग्रजी राजवटीविरुद्ध हिंदू आणि मुसलमान या दोघांनी एकाच वेळी पुकारलेला परंतु फसलेला असा तो स्वातंत्र्याचा लढा होता, ही भावना आजच्याप्रमाणेच समकालीनातही असणे स्वाभाविक आहे. केवळ हिंदू व मुसलमान यांच्या विरुद्धच नव्हे, तर पोर्तुगीज, डच, फ्रेंच या सर्वांशी सुरू असलेल्या स्पर्धेत व प्रसंगी लढाईतही इंग्रज यशस्वी झाला होता. त्याने केवळ पेशवाईच नाहीशी केली होती असे नाही; त्याने सर्वांनाच हार खावयास भाग पाडले होते. हे असे का झाले याची येथे चर्चा करण्याचे कारण नाही; परंतु त्याबद्दल समकालीनांच्या प्रतिक्रिया मात्र पाहिल्या पाहिजेत.

विष्णुशास्त्री चिपळूणकर यांनी ही कारणमीमांसा करताना, "सद्दी, कारस्थान व कवायत" ही तीन कारणे सांगितली असून, "त्यांच्या योगानें हिंदुस्थानासारखें अफाट राज्य त्यांच्या अचानक पदरीं पडलें"[६] असे म्हटले आहे.

ही तिन्ही कारणे सामाजिक चिकित्सेतून निघालेली नाहीत; चिकित्सा असलीच तर ती अत्यंत वरवरची आहे. विष्णुशास्त्री म्हणतात, "आमचा ठरलेला सिद्धांत आम्हीं मार्गेंच नमूद केला आहे, कीं आमच्या देशास कांहीं एक झालें नाहीं. त्याची नाडी अद्याप साफ चालत असून शरीरप्रकृतीस म्हणण्यासारखा कांहीं एक विकार झाला नाहीं..." पंडितांनी त्याची जी "विनाकारण विटंबना आरंभली आहे" ती "सर्व सोडून देऊन साधारण पौष्टिकाचे उपचार त्याजवर सुरू झाले असतां तो लवकरच पुनः पहिल्यासारखा सशक्त व तेजस्वी होईल, याविषयीं आम्हांस बिलकुल संशय नाहीं. हल्लीं जी आमच्या राष्ट्रास विपत्तीची स्थिति प्राप्त झाली आहे ती आमच्या दोषांमुळें आली नसून ती यदृच्छेनें कोणत्याही देशास येण्यासारखी आहे व आजपर्यंत आलीही आहे."[७]

या भूमिकेची पार्श्वभूमी केवळ १८५७ च्या लढ्याचीच नाही. १८५७-पूर्वीही लहानसहान बंडे होतच होती.[८] १८५७ नंतर झालेला अशा तऱ्हेचा एक महत्त्वाचा प्रयत्न म्हणजे वासुदेव बळवंत फडके यांचा होय. टिळकांचे कार्य सुरू होईपर्यंत तोही पराभूत झाला होता. (१८७९) यामुळे संघटित सशस्त्र उठावाचा मार्ग यशस्वी होणार नाही हे स्पष्ट झाले होते. तो त्याज्य किंवा निषिद्ध असल्याचे टिळकांना कधीच वाटले नाही. परंतु अव्यवहार्य असल्याने तो स्वीकारणे निरुपयोगी होय असे मात्र त्यांचे मत होते असे दिसते. मला कोणी आठ आणे यशाची खात्री दिल्यास उरलेल्या आठ आण्यांसाठी मी ईश्वरावर भरवसा ठेऊन सशस्त्र उठावास अवश्य मान्यता देईन, अशा अर्थाचे त्यांचे उद्गार प्रसिद्ध आहेत.[९] त्यावरून वरील विधानाला बळकटी येते; पण त्याबरोबरच साधनांविषयीचा टिळकांचा शुद्ध उपयुक्ततावादी किंवा फलितवादी (प्रॅग्मॅटिक) दृष्टिकोणही स्पष्ट होतो. जे प्रभावी होईल, यशस्वी ठरेल, असे कोणतेही साधन वापरावे, अशीच भूमिका त्यामागे होती.

असे यश मिळवायचे असेल तर इंग्रज यशस्वी होण्यासाठी जबाबदार असलेल्या कारणांकडे लक्ष देणे आवश्यक होते. विष्णुशास्त्री यांच्या भूमिकेतून यशप्राप्ती-विषयी विश्वास निर्माण होत होता. आपला हा प्राचीन आणि वैभवशाली देश पराभूत होण्यास सद्दी, कारस्थाने व कवायत ही कारणे झाली म्हटले की, त्यांतील सशस्त्र उठावाच्या अव्यवहार्यतेमुळे कवायतीचा मुद्दा आपोआपच बाजूला पडतो. इंग्रज कारस्थानी असल्यामुळे त्याच्या डावपेचांबद्दल नेहमी सावध राहिले पाहिजे. त्याच्या आहारी जाता कामा नये. बुद्धिचातुर्याने, मुत्सद्देगिरीने त्याचे डाव त्याच्यावर उलटवले पाहिजेत. आपले नवनवे डाव टाकत गेले पाहिजे. या बाबतीत सूक्तासूक्तविचार अनावश्यक आहे. असे करीत गेल्याने इंग्रजाची एक दिवस सद्दी संपेल. आज ना उद्या ही सद्दी संपणारच, असा ठाम विश्वास विष्णु-शास्त्र्यांच्या भूमिकेतून निघत होता. कारण, आपला देश केवळ यदृच्छेने पराभूत झाला. हे असे होणारच. कोणाचीही सद्दी कायमची टिकू शकत नाही. इतिहास

चक्रनेमिक्रमाने चालतो, ही भारतीय उपपत्ती प्रसिद्ध आहे.[१०] यामुळे पराभूत झालो असलो तरी पुनः आम्ही वैभवशिखरावर आरूढ होणारच. मार्क्सवाद ज्याप्रमाणे कार्यकर्त्याला भविष्यकाळ त्याचाच आहे, इतिहासाची त्याला पूर्ण साथ आहे, असा विश्वास देतो तशाच प्रकारचा विश्वास काहीसा अभिप्रेत असलेली ही उपपत्ती आहे. फरक इतकाच की, मार्क्सवाद बुद्धीच्या साहाय्याने विश्वासाचे समर्थन करू पाहातो. उलट, 'चक्रनेमिक्रमा'त दैवावरील श्रद्धा प्रकट होते. ही श्रद्धा लोकमान्यांच्या बाबतीत प्रयत्नांना मारक न ठरता प्रेरक ठरली, आणि तिने एक प्रकारची जिद्द निर्माण केली. टिळक हे हट्टी स्वभावाचे होते हा समज निर्माण होण्यास काही प्रमाणात तरी ही जिद्दच कारणीभूत झाली असे म्हणावे लागते.

कितीही मर्यादित स्वरूपाचे असले तरी टिळकांच्या पूर्वी राजकीय विषयांवरील विस्तृत लेखन करणारांत विष्णुशास्त्री यांचे स्थान महत्त्वाचे आहे. स्वभाषा, स्वधर्म यांविषयी अभिमान, गतेतिहासाची स्मृती, भारतीय संस्कृतीच्या श्रेष्ठतेची भावना इत्यादी गोष्टींवर शास्त्रीबोवांनी भर दिला होता. आणि नव्या राष्ट्रवादी भावनेचे आधार म्हणून हेच घटक टिळकांच्या आरंभीच्या लेखनात आढळतात. विष्णुशास्त्री व टिळक "या उभयतांमध्यें स्वभावभेद कांहीं कांहीं गोष्टींत असला तरी दोघांची विचारसरणी राष्ट्रीय बाबतींत एकच होती असें दिसतें."[११] असे टिळकांचे चरित्रकार म्हणतात. हे विधान तपासण्यासाठी दुसरी एक बाजूही येथे ध्यानात घेतली पाहिजे.

टिळकांचे जीवनकार्य सुरू होण्यापूर्वी व्यक्त झालेला महाराष्ट्रातील दुसरा महत्त्वाचा विचार म्हणजे लोकहितवादी आणि महात्मा ज्योतिराव फुले यांचा. या दोघांच्या विचारांची विष्णुशास्त्र्यांनी जवळजवळ निर्भर्त्सनाच केली होती. लोकहितवादी हे इंग्रजी शिक्षण घेतलेले पहिल्या पिढीतले गृहस्थ. प्राप्त झालेली विद्या, अभ्यासक्रम पुरा झाल्यानंतर, परिश्रमपूर्वक व सतत अध्ययनाच्या योगाने त्यांनी वाढवली. लोकहितवादींचे तत्कालीन विचारवंतांत वैचारिक संपन्नतेच्या दृष्टीने अनन्यसाधारण स्थान असून त्यांचे विचारधन अजूनही उपयुक्त ठरू शकेल यात संशय नाही. "इंग्रज सरकार या देशांत आहेत, याविषयीं लोक उघड नाहीं परंतु मनांतले मनांत कुरकुर पुष्कळ करतात. व मुख्यत्वेंकरून भट, पंडित, शास्त्री हे तर फार हैराण आहेत. परंतु माझें मत असें आहे कीं, या देशास हेंच सरकार ठीक आहे....हें सरकार लोकांची सुधारणा करण्याकरितां अत्यंत मेहनत करीत आहे. त्यांस विद्या शिकवतें....इंग्रज लोक अत्यंत सुधारलेले म्हणून या रीतीनें त्यांणीं विद्यावृद्धीचें व लोकसुधारणेचें व त्यांच्या जुन्या मूर्ख समजुती जाण्याचें काम चालविलें आहे. इतकी तजवीज कोण करील? आतां येऊन जाऊन इतकेंच म्हणतात कीं, अद्यापि ते लोकांस मोठ्या चाकऱ्या देत नाहींत. परंतु मोठी चाकरी देण्यास लायक अद्यापि लोक झाले नाहींत. ज्या लोकांस लांच खावी हें पाप वाटत नाहीं, ज्यांस ब्राह्मणापेक्षां कुळंब्याचा जय कमी

व्हावा असें वाटतें, त्यांस विद्यावृद्धि व्हावी असें वाटत नाहीं, लोकांस कायदे कोणचे असावे, पहिलें शास्त्र कोणत्या योग्यतेचें व पुढें कायदे कोणत्या योग्यतेचे असावे हें समजत नाहीं, व कायदा राज्यास असावा हें अवश्य आहे किंवा नाहीं हें राजास कळत नाहीं, व आपले जातीचा अभिमान धरावा हें वाटतें, व पक्षपात करावा हें वाटतें, व फौजेस कवाईत पाहिजे हें वाटत नाहीं. सुधारणा काय पाहिजेत हें माहित नाहीं, व्यापारवृद्धि होण्याची रीती ठाऊक नाहीं, अशा लोकांस चाकरी कशी देतील?"[१२] ही सुधारणा झाली म्हणजे आपण मोठमोठ्या चाकऱ्याच काय पण सर्वच व्यवहार पाहू शकू व इंग्रजांस सांगू की, "तुम्हीं आपले देशांत जावें. आतां आमचे देशाचा कामकारभार आम्हांस चांगला करतां येतो. तुमचें गुरुत्व नको."[१३] परंतु लोकहितवादींच्या ठिकाणी हे राजकीय भविष्य वर्तविण्याचेच द्रष्टेपण होते असे नाही. "आतां ज्ञान सर्व ज्ञातींत प्रसृत झालें आहे" म्हणून आता "ब्राह्मण व इतर जात सारखीच होईल. जो विद्वान तोच ब्राह्मण, जो शूद्राचें आचरण करतो तो ब्राह्मण कशाचा? असें होऊन भेद आहे तो अर्थातच निघेल, व जुनें शास्त्र स्त्रियांस दासी करण्याकरितां केलें तें फिरेल."[१४] लोकहितवादींचा समग्र विचार अत्यंत व्यापक स्वरूपाचा सामाजिक द्रष्टेपणा दर्शवितो, हे उघड आहे. त्याचप्रमाणे त्यांनी केवळ भट, भिक्षुक, ब्राह्मण यांवरच टीका केली असे नाही; इंग्रज अधिकाऱ्यांचे दोषही त्यांनी स्पष्ट केले आहेत.

महात्मा ज्योतिराव फुले हे तर संस्कृतीचे भवितव्य पाहाणारे गृहस्थ होते असे म्हटले पाहिजे. भटाभिक्षुकांची पुरोहितशाही नष्ट करून सामाजिक समता प्रस्थापित केली पाहिजे. सर्व प्रकारच्या गुलामगिरीचे मूळ मानसिक गुलामगिरीत असून ती घालविण्यासाठी सत्याचा शोध घेतला पाहिजे, हे सत्य सर्वजनांचे सत्य असले पाहिजे आणि प्रत्येकाच्या विकासाला वाव मिळेल अशा मूलभूत मानवी हक्कांच्या आधारावर त्याची उभारणी झाली पाहिजे, असा अत्यंत तेजस्वी व सतत मार्गदर्शन करू शकणारा समर्थ संदेश ज्योतिरावांच्या शिकवणुकीतून दिसतो. ज्योतिरावांनी केवळ हा संदेशच दिला असे नसून त्याचा अंमल व्हावा यासाठी प्रत्यक्ष कृती करण्याचे अलौकिक मनोधैर्य दाखविले. अशा प्रकारे महात्म्यांनीही 'महात्मा' म्हणून गौरवावे असे त्यांचे थोर कार्य होते यात संशय नाही.

लोकहितवादी आणि महात्मा फुले या दोघांच्याही विचारांत अत्यंत कठोर आत्मनिरीक्षण होते. अशा तऱ्हेचे आत्मनिरीक्षण केल्यावाचून व त्यानुसार प्रत्यक्ष उपाययोजना केल्यावाचून आपली परिस्थिती सुधारणार नाही असे त्यांचे मत होते. फुले यांनी प्रत्यक्ष कृतीने ते व्यवहारात आणण्याचे धैर्यही दाखविले होते. दोघांच्याही विचारांत राजकीय प्रश्नाला गौणस्थान होते. ज्योतिरावांच्या विशाल दृष्टीला तर राष्ट्रवादही संकुचित वाटला. त्यांनी केलेली राष्ट्रसभेची टीकाही प्रसिद्ध आहे. या दोघांच्याही विचारांवर अत्यंत कठोर टीका

विष्णुशास्त्री यांनी केली आहे. त्या टीकेचा परामर्ष घेण्याचे येथे कारण नाही. तात्त्विक किंवा वैचारिक भूमिकेचा परामर्ष घेताना प्रसंगी वैयक्तिक स्वरूपाचे प्रहार करण्याची प्रवृत्ती तिच्यात आहे : ती समर्थनीय मानता येत नाही. परंतु खरा मुद्दा थोडासा भिन्न आहे. लोकहितवादी काय किंवा ज्योतिराव काय, यांच्या टीकेमुळे आमचा तेजोभंग होतो, यामुळे आम्ही आपल्या उद्धारार्थ पुनः प्रयत्नशील कसे होणार, असा प्रश्न विष्णुशास्त्र्यांनी विचारला आहे. आणि इंग्रजी राज्याने दिपून गेलेले किंवा परकीय मिशनऱ्यांच्या आहारी गेलेले असे उथळ उल्लेख करून हा वैचारिक क्रांतीचा संदेश बाजूला सारण्याचा प्रयत्न त्यांनी केला आहे. "लहानपणापासून पोरांस जर दोन महातत्त्वें शिकवून ठेवलीं कीं तुमच्या वाडवडिलांनीं आजपर्यंत जें जें म्हणून करून ठेवलें आहे तें तें सारें निव्वळ गाढवपणाचें आहे, देवबापानें हल्लीं जे धनी आपणाला पाठवून दिले आहेत, ते साऱ्या दुनियेंतले शहाणे आहेत; यास्तव आपल्या आचारविचारांचा जितका तिटकारा करावा तितका थोडा, व इंग्रजांचें जितकें अनुकरण करावें तितकें श्रेयस्कर, तर मग तेच अंकुर बळावून पुढें जो विचित्र शाखाविस्तार दृष्टीस पडतो तो कां नये पडूं? कोणी बापाची ओळख विसरतात, कोणास बापाची लाज वाटूं लागते, कोणी आईशीं विनोद करतात, कोणी सोमरसाचें सेवन करून गटारोदकानें अवभृतस्नान करतात इत्यादि इत्यादि शतशः प्रकारांनीं आमच्या अर्वाच्य पंडितांची बुद्धि जी आज फांकलेली दृष्टीस पडते, ती कशामुळें बरें? तीस वरील दोन महासिद्धांत हेच कारणीभूत नव्हेत काय?"[१५] विष्णुशास्त्र्यांच्या या व अन्यत्र घेतलेल्या भूमिकेत काही गोष्टी सहज नजरेत भरण्यासारख्या आहेत : एक म्हणजे विरोधकांच्या टीकेची सत्यासत्यता तपासून पाहाण्याऐवजी ती बाजूस टाकणे, त्यांच्या भूमिकेचा विचार करण्याऐवजी फक्त सुशिक्षितांच्या गैरवर्तनाबद्दल त्यांनाच काय ते जबाबदार धरून परंपरेचा अभिमान बाळगणारांनाच नव्हे तर सर्वांनाच घृणा वाटावी अशा भडक स्वरूपात त्यांचे वर्णन करणे. त्यामुळे त्यांचे लक्ष सत्यापेक्षा परिणामांकडे, फलाकडे होते हे स्पष्ट होते. आणि परिणामांच्या दृष्टीनेच आत्मनिरीक्षणाचा मार्ग त्यांनी आक्षेपार्ह ठरविला होता. आत्मनिरीक्षण त्याज्य ठरविल्यामुळे आत्मपूजेकडे वळणे त्यांना अपरिहार्य होते. आणि हा आत्मपूजेचा सूर त्यांच्या लेखनात ठिकठिकाणी वारंवार आढळतो.

"आज हजारों वर्षें जी हिंदुस्तानची गेली ती एक महारात्रच गेली, आज परमेश्वरानें महाभाग्याचा सुदिन दाखविला, असे प्रमादजनित उद्‌गार नुकते नुकते ऐकूं येत होते, त्यांचा घोष अजून आमचे कानांत घुमतो आहे! पण या समजुती आतां बऱ्याच पालटत चालल्या आहेत. विलायतेंतील कांहीं थोड्या थोर लोकांचीं कदींही मतें असलीं, तरी चार हजार कोसांवरून या ऊष्ण देशांत येऊन व गेलीं शंभर वर्षें सतत युद्धप्रसंग करून जे लोक आपले धनी होऊन बसले त्यांनी एवढी यातायात केवळ परोपकारबुद्धीनें केली नाहीं, व हिंदुस्तानचें राज्य करण्यांत या

देशाच्या हिताव्यतिरिक्त त्यांचे कांहीं तरी हेतू असावे हें आतां सर्वांच्या मनांत वागूं लागलें आहे. असो. वरच्या लिहिण्यानें हल्लींच्या राज्याचा आम्हीं द्वेष करतों, किंवा त्यानें आपल्या देशावर जे अपरिमित उपकार आजपर्यंत केले व अजूनही करीत आहे ते आम्हीं जाणत नाहीं, असें नाहीं. आम्हांस तर असें वाटतें कीं, असे विचार करण्याची आमचे अंगी शक्ति आणून त्यांचा उल्लेख उघडपणें करण्याची जी मोकळीक आमचें सरकार आम्हांस देतें आहे यापरतें औदार्य कोणतेंही नाहीं. तें मनांत येऊन वरच्यासारखे लेख लिहितांना कृतघ्नत्व-शंकेने लेखणी वरचेवर अडखळते. असो, वरील लेखांत आमच्या लोकांची कच्ची समजूत, व आपण सुस्त बसलों तरी देशाची भरभराट आपोआप चालणार आहे हें वेडें मत, या दोहोंवर आमचा मुख्यतः रोख होता. पण हीं दोन्ही आतां कमी होऊन स्वतःच्या उद्योगाखेरीज राज्यकर्त्यांचें शहाणपण व उदारपण हीं आपल्या कामास येणार नाहींत असें लोकांस भासूं लागलें आहे."[१६]

लोकमान्यांच्या जीवनकार्याची ही पार्श्वभूमी आहे. यांतील लोकहितवादी आणि फुले यांचे विचार टिळकांच्या लेखनात कोठेही फारसे प्रतिबिंबित झालेले दिसत नाहीत. टिळकांनी त्यांच्याकडे विशेष लक्षच दिले नाही असे म्हणता येईल. या दृष्टीने पाहिल्यास सुधारणेचा व्यापक वा सर्वांगीण विचार करणारे न्या० मू० म० गो० रानडे हेही या पार्श्वभूमीचा भाग होते असे म्हटले पाहिजे. भारतीय समाज-जीवनाचा रानड्यांनी केलेला सर्वव्यापी विचार टिळकांना अत्यंत आदरणीय वाटत होता यात शंका नाही. लोकहितवादी आणि फुले यांचा टिळकांच्या जीवनाशी प्रत्यक्ष संबंध आला नाही. चिपळूणकर आणि रानडे यांचे तसे नाही. म्हणून या दोघांविषयीच्या टिळकांच्या भूमिकेविषयी पुढे थोडासा ऊहापोह केला आहे.

इंग्रज या ठिकाणी आमच्यावर उपकार करावे यासाठी आला नसून त्याचे हेतू निराळेच आहेत. म्हणून त्याला येथून घालवणे अवश्य आहे. त्यासाठी आपल्या उद्योगावरच विसंबून राहिले पाहिजे. सशस्त्र बंडाचा मार्ग यशस्वी होण्याचा संभव टिळकांना मुळीच दिसत नव्हता. यामुळे लोकमत जागृत करण्या-कडे वळणे त्यांना क्रमप्राप्त होते. साधनांचा हा प्रश्न तत्त्वाचा प्रश्न नव्हता. इंग्रजांची सांप्रत सद्दी असली तरी आज ना उद्या या देशालाही चांगले दिवस येणारच. त्यासाठी प्रयत्नशील झाले पाहिजे. अशा प्रयत्नांत जिद्द पाहिजे. स्वभाषा, स्वधर्म यांविषयी अभिमान, गतेतिहासाची स्मृती इत्यादींच्या साहाय्याने राष्ट्रीय भावना जागृत केली पाहिजे. आणि असे करताना आपला तेजोभंग होणार नाही अशी दक्षता घेणे आवश्यक आहे. लोकमत जागृत करायचे म्हटले म्हणजे "चालू स्थितीचें किंवा सर्वांगीण शिक्षण" कार्य करणे जरूर आहे. "आमचें शिक्षण आम्हीं हातीं घेतलें पाहिजे"[१७] या भूमिकेवर टिळक व आगरकर यांचे एकमत झाले असे सूचित करणारा एक संवाद 'टिळकचरित्रा'त उद्धृत करण्यात आला आहे.

टिळक, आगरकर हे विष्णुशास्त्री चिपळूणकरांना जाऊन मिळाले व न्यू इंग्लिश स्कूल या शाळेची स्थापना करण्यात आली (१८८०). एका वर्षाच्या आतच 'मराठा' व 'केसरी' ही पत्रे निघाली (१८८१). त्यानंतर डेक्कन एज्युकेशन सोसायटीची स्थापना होऊन फर्ग्युसन कॉलेज काढण्यात आले. 'केसरी'चे पहिले संपादक आगरकर हे होते. त्यांच्याऐवजी १८८७ साली टिळक 'केसरी'चे संपादक झाले. गोखले हे तत्पूर्वीच डेक्कन एज्युकेशन सोसायटीस येऊन मिळाले होते. आगरकरांनी व त्यांनी मिळून 'सुधारक' पत्र सुरू केले (१८८८). 'केसरी' व 'मराठा' ही पत्रे टिळकांकडे आली होतीच. टिळक सोसायटीतून राजिनामा देऊन बाहेर पडले, आणि 'मराठा' पत्राचेही संपादक झाले (१८९०).

या सर्व घटना व त्यांच्या अनुषंगाने झालेले मतभेद, वाद, कलह हे सर्वांना माहीत आहेत. मला त्याविषयीच्या तपशिलांत जाण्याचे कारण नाही. "सोसायटींत अंतस्थ वादांत टिळकांविरुद्ध बहुमत आणि सामाजिक वादांत आगरकरांविरुद्ध बहुमत" असे तत्कालीन परिस्थितीचे वर्णन करून श्री० केळकरांनी "टिळक व आगरकर या दोघांचेंही सुखदुःख सारखेंच होतें" असा निष्कर्ष काढला आहे, आणि टिळकांनी सोसायटीबाहेर पडल्यानंतर शाळा काढली नाही, परंतु आगरकरांनी मात्र स्वतंत्ररीत्या दुसरे पत्र सुरू केले, या आक्षेपाचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. टिळकांचा "एकतंत्री स्वभाव व स्वातंत्र्यप्रियता" यामुळे "पूर्वीच्या अनुभवावरून" त्यांनी शाळा, कॉलेज काढण्याचा मार्ग अनुसरला नाही; उलट पत्र एकट्यालाही चालविता येते, यामुळे ते काढणे सोपे होते, म्हणून आगरकर ते करू शकले. "आगरकरांच्या अंगीं टिळकांइतका करारीपणा असला तरी टिळकांइतका कर्तेपणा नव्हता."[१८] यामुळे त्यांच्या हातून 'केसरी'चे संपादकत्व गेले, असा केळकरांचा अभिप्राय आहे.

तथापि आगरकरांचा वा टिळकांचा या वा त्या वादात पराभव झाला अशी या प्रश्नाची मीमांसा वैयक्तिक गुणदोषांवरून करणे योग्य वाटत नाही. त्याऐवजी त्यांच्या वैचारिक भूमिकांचा विचार केल्यास जे घडले ते एकापरीने अपरिहार्यच होते असे म्हणता येते. हा जयापजयाचा प्रश्न नसून मर्यादित भूमिकेवरून केलेले परस्परसहकार्य टिकवायचे की मोडायचे असा तो प्रश्न होता. शाळा काढण्यासाठी एकत्र येताना टिळक-आगरकरांनी आपापल्या भूमिका सोडल्या नव्हत्या. पत्रे सुरू केल्यानंतर लागलीच कोल्हापूर-प्रकरणावरून दोघांनाही तुरुंगवास भोगावा लागला. त्यामुळे दोघांचीही लोकप्रियता वाढली असली तरी टिळकांची मूळ भूमिका लोकप्रियतेच्या दृष्टीने अधिक अनुकूल होती. भवानी-पेठेतील उरवणेशेटजींनी, टिळकांची तोंडओळखदेखील नसताना, कोल्हापूर प्रकरणात पाच हजार रुपये रोख भरून टिळकांना जामीन राहाण्याची तयारी दर्शविली होती.[१९] टिळकांच्या लोकप्रियतेचा हा केळकरांनी उल्लेखिलेला पुरावा ध्यानात घेतल्यास सात हजारांच्या कर्जासह 'केसरी', 'मराठा' ही पत्रे स्वतःकडे

घेण्यात "व्यवहारज्ञान व धमक"[२०] यांचा संबंध फारसा पोहोचत नाही असे वाटते. राजकीय कार्याचे प्राथम्य मान्य करणाराला व्यवहारज्ञान कदाचित अधिक असेल, पण स्वकीयांचे बोल सहन करीत आपल्या भूमिकेचा निष्ठेने पाठपुरावा करणाऱ्याची धमक ही अत्यंत श्रेष्ठ प्रतीचीच समजली पाहिजे.

आपापल्या भूमिका समाजापुढे स्पष्ट व निर्भीडपणे मांडण्यासाठी दोघांनाही स्वतंत्ररीत्या वृत्तपत्रे हाती असणे आवश्यक वाटले असल्यास नवल नाही. परंतु शाळेच्या बाबतीत मात्र तसे म्हणता येत नाही. वृत्तपत्रांना कायद्याच्या मर्यादा सांभाळल्या की इतर प्रश्न आपल्या ध्येयधोरणाच्या आधाराने हाताळता येतात. शाळेचा खरा प्रश्न काही प्रमाणात तरी आर्थिक आहे. प्रस्थापित सत्तेवर आर्थिक साहाय्यासाठी अवलंबून राहाण्याचा, म्हणजे ग्रँट घेऊन सरकारी सासुरवास स्वीकारण्याचा, निर्णय घेतल्याबद्दल टिळकांनी डेक्कन एज्युकेशन सोसायटीला दोष दिला आहे. त्यामुळेच सरकारची कडक नियंत्रणे सोसायटीला मान्य करावी लागली असे त्यांचे म्हणणे.[२१] हे अनुदान स्वीकारण्याचे धोरण राजकीय प्रश्नाला प्राधान्य देण्याच्या दृष्टीने त्याज्य असले तरी सामाजिक प्रश्नांचा विचार करणाऱ्याला त्यात आक्षेपार्ह असे काहीही नव्हते. सामाजिक प्रश्न सोडवण्याच्या दृष्टीने शिक्षणप्रसार आवश्यक होता तर राजकीय प्रश्नाच्या दृष्टीने शिक्षणकार्य 'स्वतंत्र' राहाणे ही खरी गरज होती. नंतर आलेल्या आजीव सदस्यांना त्यागाचे महत्त्व वाटेनासे झाले. अन्यत्र देण्यात येणारे शिक्षणच मुलांना द्यावे, म्हणजे सरकारचेच कार्य आपण कमी खर्चात करावे, यासाठी तो त्याग नव्हता असे टिळकांचे म्हणणे.[२२] यावरून सोसायटीने आपल्या संस्थांसाठी अनुदान घेण्याचे धोरण स्वीकारतानाच तिच्या कामात टिळकांना स्वारस्य वाटेनासे झाले असे अनुमान काढण्यास प्रत्यवाय नसावा. कारण, शाळा काढल्यानंतर लवकरच म्हणजे अवघ्या चारपाच वर्षांतच टिळक-आगरकरांत मतभेद होण्यास सुरवात झाली असे दिसते. संमतिवयाच्या कायद्याचा प्रश्न याच वेळी डोके वर काढू लागला होता. आणि १८८५-८६ सालीच सरकारी शिक्षणखात्याने अनुदान देण्यासाठी न्यू इंग्लिश स्कूलची तपासणी केली आणि तोवर कोणत्याही खाजगी शाळेला दिलेल्या अनुदानापेक्षा अधिक मोठे अनुदान शाळेस देऊन इलाख्यातील एक सर्वोत्कृष्ट शाळा असा अभिप्रायही दिला[२३] हे ध्यानात घेणे जरूर आहे.

सरकारी नोकरीचा लोभ न धरता, न्यू इंग्लिश स्कूल ही इंग्रजी शाळा व पुढे पाच वर्षांत फर्ग्युसन कॉलेज या संस्था काढण्यात सामील होणारे टिळक हळूहळू खाजगी शिक्षणसंस्थांवर कोरडे ओढू लागले आणि कालांतराने इंग्रजी विद्येची टीका करू लागले. सुशिक्षितांच्या मनाच्या अव्यवस्थित वृत्तीला आणि बिघडलेल्या गृहव्यवस्थेला इंग्रजी शिक्षण हे जबाबदार होय असे ते म्हणू लागले, युनिव्हर्सिट्या हे सरकारी हमालखाने आहेत अशी त्यांची निर्भर्त्सना करू लागले, ही एक सूचक घटना आहे. शिक्षणकार्याचे त्यांना महत्त्व वाटत नव्हते असे नाही.

अध्यापनकार्यात ते अत्यंत निष्णात समजले जात. तथापि हे सर्व जमेस धरूनही शिक्षणाकडे राजकीय सुधारणेचे एक साधन या दृष्टीनेच ते बव्हंशी पाहात असावेत, असे म्हणण्यास प्रत्यवाय नाही. पाश्चात्य विद्या ही स्वातंत्र्य असल्यास अमृतमय बनते, एरव्ही ती मदिराच होय, निदान आमच्याकडे तरी ती तशी ठरली आहे, असा अभिप्रायही त्यांनी व्यक्त केला आहे.[२४]

"आधी सामाजिक की आधी राजकीय" हा वाद 'केसरी' सुरू केल्यानंतर दोनतीन वर्षांतच डोके वर काढू लागला. सुरुवातीस "विष्णुशास्त्री हे सर्वांत वडील व प्रौढ असल्यानें त्यांचेंच धोरण चाललें. शास्त्रीबोवा व टिळक यांच्या दरम्यान सामाजिक बाबतींतही फारसा मतभेद नव्हता"[२५] असे टिळकांचे चरित्रकार सांगतात. धर्माविषयी निर्माण होत असलेला तिरस्कार मिशनरी मंडळी आणि आत्मविषयक अज्ञान यामुळे निर्माण होत आहे, असे शास्त्रीबोवांना वाटत होते.[२६] आणि त्यामुळे सुधारणावाद्यांचे मुद्दे निकालात काढताना त्यांची भूमिका ही येथील धार्मिक समजुती, चालीरीती, रूढी, परंपरा इत्यादींचे बव्हंशी समर्थन करणाऱ्या पुनरुज्जीवनवाद्याची आहे. तथापि वरील प्रकार चांगले असोत किंवा नसोत, त्यांच्यात फेरफार करणे किंवा ते नाहीसे करणे इष्ट असो किंवा नसो, वरील गोष्टींमुळे आज आम्ही दुर्बल, द्रव्यहीन वगैरे झालो आहोत या म्हणण्यात काही अर्थ नाही, असे टिळकांचे म्हणणे होते. हे ध्यानात घेतले म्हणजे सामाजिक बाबतींत टिळकांची मते विष्णुशास्त्री यांच्यासारखीच होती हे विधान कितपत योग्य होईल हा एक प्रश्नच आहे. त्यांच्या भूमिका भिन्न असल्याचे याहून कितीतरी चांगले आधारही देता येतील. विष्णुशास्त्र्यांच्या भूमिकेत सामाजिक प्रश्नाला मुळी फारसे स्थानच राहात नाही; टिळकांच्या विचारांत त्याला तातडीचे महत्त्व नाही.

टिळकांची भूमिका शास्त्रीबोवांसारखीच होती असे म्हणता येत नाही. शास्त्रीबोवांच्या विचारांचा त्यांच्या मनावर पुष्कळच परिणाम झाला होता हे जरी खरे असले तरी त्याबरोबरच न्यायमूर्ती रानडे यांच्याविषयीही त्यांना नितांत आदर वाटत होता यात संशय नाही. १८२० ते १८७० या काळातील पुण्याच्या वा एकंदरीत महाराष्ट्राच्या परिस्थितीचे वर्णन करताना टिळक म्हणतात, "महाराष्ट्रदेश म्हणजे त्यावेळीं एक थंड गोळा होऊन पडला होता. ह्या थंड्या गोळ्यास कोणत्या तऱ्हेनें ऊब दिली असतां तो पुनः सजीव होईल व हातपाय हालवूं लागेल याचा रात्रंदिवस एकसारखा विचार करून अनेक दिशांनीं, अनेक उपायांनीं, अनेक रीतींनीं त्यास पुनः सजीव करण्याचें दुर्धर काम अंगावर घेऊन त्याकरितां जीवापाड जर कोणीं मेहनत केली असेल तर ती प्रथमतः माधवरावजींनींच केली असें म्हटलें पाहिजे. व आमच्या मतें हेच त्यांच्या थोरवीचें किंवा असामान्य मोठेपणाचें मुख्य चिन्ह होय."[२७] असे रानड्यांच्या कार्याचे वर्णन करून "असा मनुष्य आपणांतून गेला असतां एकाएकीं सूर्यास्त झाल्याप्रमाणें सर्व लोक दिङ्मूढ झाले यांत कांहीं आश्चर्य नाहीं."[२८] असा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला आहे.

टिळकांनी केलेला रानड्यांचा हा गौरव आणि विष्णुशास्त्र्यांचे कार्य व त्याची टिळकांनी केलेली प्रशंसा, ही विचारात घेतल्यास टिळकांच्या आदरभावनेचा काटा रानड्यांच्याकडे कितीतरी अधिक झुकत होता, याविषयी संशय राहात नाही. रानड्यांना श्रद्धांजली वाहात असताना त्यांच्या कार्याचे स्वरूप व महत्त्व टिळकांनी यथार्थतेने जाणले होते याचाही प्रत्यय आल्यावाचून राहात नाही. "माधवरावजींच्या अंगचा पहिला गुण हा होय की, सर्व बाजूंनीं राष्ट्राची उन्नति झाली पाहिजे असें त्यांस वाटत होतें व या सर्व दिशांचें व बाजूंचें सांगोपांग परीक्षण करून त्यांच्या योग्यायोग्यतेबद्दल निर्णय करण्याइतकी परमेश्वरानें त्यांस प्रगल्भ व व्यापक बुद्धि दिली होती. धर्मव्यवस्था, समाजसुधारणा, उद्योगधंदे, शिक्षण, राजकीय व्यवस्था वगैरे सर्व बाबतींत आम्हीं मागें आहों व या सर्व गोष्टींत सुधारणा झाल्याखेरीज इतर सुधारलेल्या राष्ट्रांची आपणांस बरोबरी करतां यावयाची नाहीं असा त्यांचा पक्का ग्रह झाला होता."[२९] मुंबईच्या हिंदू युनियन क्लबात १८९५ साली न्यायमूर्ती रानड्यांनी केलेल्या 'दि तेलंग स्कूल ऑफ थॉट' या भाषणाचे सारच टिळकांनी वरील शब्दांत व्यक्त केले आहे.[३०] या सर्व बाजू, समाजजीवनाची ही सारी अंगोपांगे एकमेकाशी निगडित आहेत, ती परस्परावलंबी असून एकमेकावर त्यांच्या क्रियाप्रतिक्रिया सतत सुरू असतात, हा त्याच भाषणात व्यक्त झालेला विचार लोकमान्यांना महत्त्वाचा वाटला नसेल असे म्हणणे थोडेसे धाडसाचेच होईल.

परंतु या बाबतीत आणखीही एक गोष्ट सहज ध्यानात येण्यासारखी आहे. "आधीं कोण ? राजकीय कीं सामाजिक ?" या 'केसरी'तील[३१] लेखात मुंबई येथील स्टूडंट्स लिटररी अँड सायंटिफिक सोसायटीपुढे न्यायमूर्ती तेलंग यांनी दिलेल्या व्याख्यानाचा सारांश देत असताना मि० वर्डस्वर्थ यांच्या पत्राचा उल्लेख करून टिळक म्हणतात, "त्यांच्या पत्रांतील मुख्य आशय असा आहे कीं, सामाजिक सुधारणेसाठीं अगदीं जीव सोडण्याची गरज नाहीं. राजकीय सुधारणा होत चालली म्हणजे तिच्या कधीं बरोबर, कधीं किंचित् पाठीमागून, सामाजिक सुधारणा होत जाते. हाच सिद्धांत काशिनाथपंतांनीं आपल्या व्याख्यानांत विशेष खुलाशानें सिद्ध करून दाखविला आहे."[३२] हे व्याख्यान टिळकांनी आपणांस संमत म्हणून थोडक्यात दिले असून त्याबद्दल कसलाही मतभेद व्यक्त न करता तेलंगांची स्तुती केली आहे. या व्याख्यानाचा स्वतः तेलंगांनी निष्कर्ष काढला तो असा : "आमच्या देशांतील सुधारकांस दोन अवघड किल्ले सर करावयाचे आहेत. एक राजकीय स्वातंत्र्याचा व दुसरा सामाजिक स्वातंत्र्याचा. दिसण्यांत सध्या दोनही अभेद्य दिसत आहेत. ... पहिला हल्लाराजकीय स्वातंत्र्यगडावर केला असतां तो विशेष फायदेशीर होणार आहे. कारण या दुर्गांच्या तटावर रक्षणासाठीं ठेवलेल्या शिपायांत सुधारकांना अनुकूल अशी कांहीं मंडळी आहेत. ...(दुसऱ्या) दुर्गासंबंधानें अशा प्रकारची आंतून मदत होण्याची मुळींच आशा नाहीं. या

दुर्गाच्या कोटांत आम्हांस अनुकूल असा एकही इसम नाहीं. त्यामुळें तो सर करण्यास आम्हांस बरीच वर्षें खटपट केली पाहिजे. ... राजकीय प्रकरणीं वादांत तर्काचें बरेंच प्राबल्य चालतें, सामाजिक किंवा धार्मिक वादांत तो अगदीं कुंठित होतो. पहिल्या वादांत बुद्धीवर प्रहार होत असतात. दुसऱ्या वादांत मनोविकार दुखविले जातात....वर्तमानपत्रें लोकशिक्षणाचीं बलवत्तर साधनें आहेत....राजकीय वादास त्यांच्याप्रमाणें दुसऱ्या कोणाकडूनही सहाय्य होत नाहीं. तथापि त्यांनीं होताहोईतो सामाजिक विषयांच्या वाटाघाटींत किंवा धर्मवादांत पडूं नये असें माझें मत आहे. वर्तमानपत्रांत असल्या विषयांची चर्चा होऊं लागल्यानें लोकांचे दुराग्रह अधिकाधिक बळकट होत जातात व त्या मानानें सामाजिक सुधारणेचें काम दुष्कर होत जातें. राजकीय विषयांची तशी गोष्ट नाहीं. त्यांत फारसा मतभेद नाहीं, निदान इंग्रजांच्या अंमलाखालीं सर्वांस एकच स्थिति प्राप्त झालेल्या आम्हां हिंदुस्थानांतील लोकांत तो होण्याचा संभव नसल्यामुळें पारशी, मुसलमान, मराठे, गुजराथी, सिंधी, बंगाली, मद्राशी वगैरेंची राजकीय मतें सारखीं पडतात.... सामाजिक सुधारणेकडे मुळींच लक्ष देऊं नये असें माझें म्हणणें नाहीं. कांहींनीं तिकडेही लक्ष दिलें पाहिजे. तथापि सर्वांनींच या मार्गाकडे वळण्याची गरज नाहीं. आ० रा० ब० म० गो० रानडे यांच्यासारखी बुद्धिमत्ता फारच थोड्यांच्या अंगीं असते, यामुळें सर्व कामें सारख्या रीतीनें उठविणारा त्यांच्यासारखा पुरुष फारच विरळा असतो. बहुतेक लोकांचें बुद्धिसामर्थ्य फार माफक असतें. यामुळें त्याचा व्यय फार जपून केला पाहिजे. सध्यांच्या आमच्या देशस्थितींत विद्वान् लोकांच्या बुद्धिसामर्थ्याचा बराच भाग राजकीय सुधारणेकडे व कांहीं मात्र सामाजिक सुधारणेकडे लागला पाहिजे, असा माझा एकंदरींत ग्रह झाला आहे."[३३]

न्यायमूर्ती रानडे यांच्यासंबंधीचे उतारे १९०१ सालच्या टिळकांनी लिहिलेल्या मृत्युलेखावरून घेतले आहेत. न्यायमूर्ती तेलंग यांच्या भाषणाचा सारांश हा १८८६ सालच्या भाषणाचा सारांश आहे. १८८५ साली राष्ट्रसभेची स्थापना झाली. तेलंग राष्ट्रसभेचे पहिले चिटणीस होते. त्यांच्या भूमिकेचा अर्थ लावताना काही अंशी राजकीय स्वातंत्र्याबरोबर, काही अंशी ते प्राप्त झाल्यानंतर सामाजिक सुधारणा होईल असे टिळकांनी म्हटले. यासंबंधी आगरकरांचे म्हणणे काय होते? "काही अंशी नष्ट झालेले राजकीय स्वातंत्र्य फिरून संपादणें अवघड आहे, कारण ते हिरावणारा शत्रू परका असतो...सामाजिक व धार्मिक गुलामगिरीची तशी गोष्ट नाहीं...सुधारणेचा आरंभ होणें तो राजविषयक सुधारणेपासून झाला पाहिजे. ... स्वातंत्र्य हें सर्वांस प्रिय आहे. आमची राजकीय सुधारणा म्हणजे आमच्या नष्ट झालेल्या स्वातंत्र्याच्या पुनःप्राप्तीसाठीं प्रयत्न करणें होय. ही गोष्ट जितकी आम्हां महाराष्ट्रीयांस तितकीच वंगवाश्यांस, गुर्जरस्थांस, तेलंगणस्थांस, कर्नाटकीयांस, पारसीकांस, महंमदीयांस व इतरांस इष्ट असणें स्वाभाविक आहे, व म्हणून त्यांचें एकीकरण होणें शक्य आहे, व तें तसें होऊं लागलें आहे.

राष्ट्रीय ग्रंथ संग्रहालय, बाग. स्वतंत्र
क्रमांक...१९३५ दि. ...

सामाजिक व धार्मिक सुधारणांचें तसें नाहीं. त्यांच्या योगानें निष्कारण असंतोष व कलह निर्माण होतात...सामाजिक व धार्मिक गोष्टींविषयीं तंटे उपस्थित केल्यामुळें, राजकीय गोष्टींत एकदिलानें कामगिरी दुरापास्त झालें आहे."[३४] असा सर्वथैव न्याय्य रीतीने पूर्वपक्ष मांडल्यानंतर आगरकर विचारतात, "इंग्रज लोकांनीं तुम्हांस जिंकलें त्या वेळेस तुम्हांत कोणत्याही प्रकारचे सामाजिक किंवा धार्मिक तंटे नव्हते. त्या वेळेस राजकीय सत्ता तुमच्या हातीं असून, सामाजिक व धार्मिक प्रकरणांत तुमचें पूर्ण ऐक्यमत्य होतें. असें असून परशत्रूस तुम्हीं हार कां गेला? सैन्यबल, द्रव्यबल, संख्याबल इत्यादि यशाचीं बाह्योपकरणें तुमच्या हातीं असून, व धार्मिक व सामाजिक गोष्टींत तुम्हांत द्वैत माजलेलें नसून, तुमची अशी दाणादाण कां झाली?...आम्हांस असें वाटतें कीं, पेशवाईचा जो मोड झाला तो आमची सामाजिक व धार्मिक स्थिति जशी पाहिजे होती तशी नव्हती म्हणून झाला. आणि येथून पुढेंही आम्हांस सुदशा प्राप्त होण्यास व ती कायम राहण्यास, आम्हीं आपली गृहस्थिति व धर्माचार सुधारण्याचा प्रयत्न प्रथम केला पाहिजे, व तो करण्यास अत्यंत अनुकूल काल सांप्रतकाल आहे."[३५] आगरकरांच्या या विधानात एक अत्यंत मोठे व मौलिक सत्य प्रकटलेले होते. ते केवळ त्या काळीच नव्हे तर अजूनही, स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही, मार्गदर्शक होऊ शकेल असे आहे. ते पुनः म्हणतात, "कोणी राजकीय, कोणी धार्मिक व कोणी सामाजिक आचारांस प्रमुखत्व देऊन, बाकीच्यांस तदनुषंगी करतात. थोड्या वर्षांपूर्वी आ० का० त्रिं० तेलंग यांनीं मुंबईस जें एक सुरस व्याख्यान दिलें, व जें त्या वेळीं लोकांस अत्यंत प्रिय झालें, त्यांत त्यांनीं सामाजिक सुधारणेच्या अगोदर राजकीय सुधारणा झाली पाहिजे व बहुशः होते अशा मताचें प्रतिपादन केल्याचें स्मरतें व हेंच मत ज्यांस मान्य आहे असे युरोपांत पुष्कळ विद्वान् व विचारी लोक आहेत. उलट, धर्मसुधारणा झाल्याखेरीज दुसरी कोणतीही सुधारणा होणें शक्य नाहीं, असें प्रतिपादणारेही तिकडे पुष्कळ विद्वान् आहेत. हे विद्वान् नेहमी असें म्हणतात कीं, आज जी युरोपांत असामान्य सुधारणा दृष्टीस पडत आहे ती त्या खंडांत १६ व्या शतकांत जी प्रचंड धर्मक्रांति झाली तिचें फळ होय."[३६] अशा प्रकारे दोन्ही भूमिका विशद करून आगरकर म्हणतात, "राजकीय सुधारणा आधीं होते किंवा सामाजिक सुधारणा आधीं होते, हें जरी निश्चयानें सांगतां आलें नाहीं, तरी येवढें म्हणण्यास हरकत नाहीं कीं, सामाजिक सुधारणा करण्यास आजमितीस आम्हांस जितकी अनुकूल वेळ आली आहे तितकी पूर्वी कधींही आली नव्हती. समाजाच्या प्राथमिक स्थितींत राजकीय, सामाजिक व धार्मिक विचार व क्रिया एकमेकांत गुंतलेल्या असतात, व उत्तरोत्तर त्यांचें पृथक्करण व विश्लेषण होत जातें हें मागें सांगितलेंच आहे. तशा प्रकारचा भेद येथें बराच झाला आहे. निदान राजकीय विषय सामाजिक व धार्मिक विषयांपासून स्पष्टपणें निराळे झाले असून, त्यांची व्यवस्था आमच्या

सरकारनें आपल्या शिरावर घेतली आहे, व बाकी राहिलेले दोन भाग आम्हांकडे ठेविले आहेत....सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यास सांप्रतकाल फार अनुकूल आहे.[३७]...जे लोक राजकीय प्रकरणांत स्वतंत्र असतात ते सामाजिक व धार्मिक प्रकरणांत स्वतंत्र असतातच, असा नियम नाहीं.[३८]...राष्ट्रसभा ज्या विद्येचें फळ आहे त्याच विद्येचें फळ सामाजिक परिषद आहे. ज्या ज्ञानामुळें तेलंग आणि रानडे यांस आमची राजकीय सुधारणा व्हावी असें वाटतें त्याच ज्ञानामुळें त्यांस आमची सामाजिक सुधारणा व्हावी असें वाटतें व ज्या कारणामुळें त्यांचे राजकीय विचार आम्हांस मान्य होतात आणि ते व्यक्तिदृष्टीनें पूज्य वाटतात, त्याच कारणामुळें त्यांचे सामाजिक विचारही आम्हांस मान्य होऊन व्यक्तिदृष्टीनें ते आम्हांस पूज्य झाले पाहिजेत."[३९]

आधी राजकीय की सामाजिक या प्रश्नाचा स्पष्ट निर्णय करणे आगरकरांनाही कठीण वाटत होते. तथापि राजकीय बदल करवून आणण्यापेक्षा सामाजिक बदल करणे तत्कालीन परिस्थितीत अधिक सुलभ आहे असे त्यांचे मत होते. परिस्थिती या कार्याला अनुकूल आहे असे त्यांचे म्हणणे होते. त्याबरोबरच सामाजिक सुधारणेवाचून राजकीय बदल एक तर शक्यच होणार नाही, आणि झालाच तर तो धोक्याचा ठरेल, अशी सूचनाही त्यांच्या विचारांत आढळते. तथापि राजकीय प्रश्न आगरकरांना सामाजिक सुधारणेइतकाच जिव्हाळ्याचा वाटे. "राजकीय विषयाची व्यवस्था आमच्या सरकारनें आपल्याकडे घेतली आहे" याचा अर्थ तो विषय कमी तातडीचा किंवा त्यासंबंधी काहीच करता यायचे नाही, असा नव्हे. उलट, आगरकरांनी त्या प्रश्नाचा सतत पाठपुरावा केला असून प्रसंगी त्याचे प्राथम्यही मान्य केले आहे, आणि तो सरकारने तातडीने सोडवला पाहिजे, असा आग्रहही धरला आहे.[४०]

तात्पर्य, सामाजिक व धार्मिक प्रश्नांकडे, ते सोडविण्यास वातावरण अत्यंत अनुकूल आहे या दृष्टीने आगरकर पाहात होते. उलट, राजकीय प्रश्न सोडवणे अधिक सोपे आहे, असे टिळकांचे तेलंगांप्रमाणे मत होते. यामुळे एका दृष्टीने हा वाद ध्येयप्राप्तीसाठी कोणता मार्ग स्वीकारायचा याबद्दलचा लढाईतील डावपेचांचा वाद होता, असे म्हणता येते. तथापि, एकदा मार्ग भिन्न होऊ लागले की, हळूहळू दुरावा निर्माण होतो, साधने हीच साध्याचे स्वरूप घेऊ लागतात, मतभेदांची तीव्रता वाढू लागते, हे सारे स्वाभाविक आहे. तोच प्रकार येथे झाला, असे म्हणता येईल.

सामाजिक सुधारणा प्रथम केली पाहिजे ही भूमिका राज्यकर्तेही घेत होते. राष्ट्रसभेची स्थापना करताना ती सामाजिक प्रश्नांचा विचार करण्यासाठी हवी अशी ह्यूम यांची भूमिका होती, आणि इतर अनेकांचेही तसेच मत होते. लॉर्ड डफरिन यांच्या सूचनेवरून तिला राजकीय स्वरूप प्राप्त झाले असले तरी आरंभी राष्ट्रसभेच्या कार्याविषयी विशेष उत्साह नव्हता हे ह्यूम यांच्या 'सर्क्युलर'वरून

स्पष्ट होते. तात्पर्य, राजकीय सुधारणेचे म्हणजे स्वातंत्र्याचे ध्येय साध्य होणे सोपे नाही, आणि त्या फंदात पडल्यास सरकारचा गैरसमज होण्याचाच संभव अधिक, अशीच बहुतेक सर्वांची समजूत होती.

आगरकरांची भूमिका 'विवेकनिष्ठ' होती हे म्हणणे रास्त होईल, परंतु त्याबरोबरच श्री० जावडेकरांनी केलेले टिळकांच्या भूमिकेचे 'स्वाभिमानी' हे वर्णन पटण्यासारखे नाही. स्वाभिमान व विवेक ही एकमेकांपासून भिन्न होण्याचे कारण नाही. नाही तर टिळकांच्या भूमिकेत स्वाभिमान फारच मर्यादित किंबहुना संकुचित अर्थाने आढळतो असे म्हणावे लागेल. या दोन्ही भूमिका 'राष्ट्रवादी' होत्या असे म्हणणे म्हणजे राष्ट्रवाद या कल्पनेबद्दल गोंधळ निर्माण करणे होय. मूळ फरक याहून अगदी भिन्न होता, असे म्हणता येईल. आगरकरांना राजकीय सुधारणा हवी होती, प्रसंगी तिचे प्राथम्य मान्य करण्याचीही त्यांची तयारी होती.[४१] *परंतु हे सारे व्यापक सामाजिक बदलाचा वा स्थित्यंतराचा एक भाग म्हणून.* राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, अशा सर्वच क्षेत्रांत क्रमाक्रमाने सुधारणा होत गेली पाहिजे असा त्यांच्या म्हणण्याचा एकंदरीने अर्थ होतो. तथापि हे सारे प्रश्न एकमेकांशी निगडित असले तरी राजकीय प्रश्न आता सामाजिक व धार्मिक प्रश्नांहून अलग झाला आहे, तो सरकारने आपणाकडे घेतला आहे, असे आगरकरांचे म्हणणे. राज्यकर्त्यांची सांस्कृतिक व वैचारिक पार्श्वभूमी ध्यानात घेता सामाजिक व धार्मिक प्रश्न सोडविण्यासाठी त्यांचे सहकार्य मिळेल असे वाटणे स्वाभाविक होते. यामुळे ते प्रश्न सोडवणे अधिक सुलभ होईल या भूमिकेतून आगरकरांनी त्या प्रश्नांवर आपले लक्ष केंद्रित केले; आणि ते शिक्षणक्षेत्रातच राहिले. आगरकरांच्या या भूमिकेत सामाजिक व धार्मिक प्रश्न सोडविण्यासाठी अनुकूल राज्यसत्ता गृहीत धरलेली आहे; राज्यसत्तेचे साहाय्य अभिप्रेत आहे. अर्थात हे सर्व मर्यादित अर्थानेच. परकीय सत्ता येथे प्रस्थापित होण्यात 'ईश्वरी संकेत' आगरकरांनी पाहिला नाही, किंवा ती सामाजिक सुधारणेला सतत अनुकूल राहील असेही सूचित केले नाही. किंबहुना, जेव्हा जेव्हा राज्यसत्तेचे वर्तन अपेक्षेनुसार नव्हते तेव्हा तेव्हा तिच्यावर आगरकरांनी कडक टीकाही केली आहे. काही वेळा कायद्यानेही सुधारणा आवश्यक असते हे मान्य करणारे आगरकर राजकीय सुधारणेचे प्राथम्य सर्वस्वी नाकारीत नव्हते. उलट, परिस्थित्यनुसार हे प्राथम्य यांना मान्य होते. या मान्यतेमध्ये आगरकरांचा विवेकनिष्ठ व अनाग्रही दृष्टिकोण व्यक्त झाला आहे.

टिळकांची भूमिका याहून भिन्न होती. इंग्रज येथे परोपकारासाठी आला नसून स्वतःच्या फायद्यासाठी आला आहे असे मानणारे टिळक आमचे प्रश्न उकलण्यासाठी तो साहाय्यभूत होऊ शकतो ही कल्पना स्वीकारू शकत नव्हते. देशात परकीय राज्य असल्यामुळे राजकीय प्रश्न सामाजिक व आर्थिक प्रश्नांपासून

अलग झाला आहे हे त्यांनाही मान्य होते. आणि तो सोडविण्याचा प्रथम प्रयत्न केला पाहिजे असे त्यांचे म्हणणे होते. अशा प्रकारे टिळकांच्या विचारांतील राजकीय सुधारणांचे प्राथम्य हे कालक्रमानुसारी प्राथम्य होते असे म्हणावे लागेल. यामुळे प्रत्यक्ष कार्याला प्रेरणा देण्याचे सामर्थ्य त्यात होते. शिक्षणक्षेत्रातून बाहेर पडल्यानंतर टिळकांनी राजकीय प्रश्नांवर लक्ष केंद्रित केले ते या वैचारिक भूमिकेतून. पारतंत्र्यामुळे राजकीय प्रश्न 'राष्ट्रवादी' भूमिकेच्या आधाराने सोडवणे शक्य होते. तो राष्ट्रवाद लढाऊ पाहिजे. त्याच्यामागे लोकांच्या पाठिंब्याचे बळ उभे केले पाहिजे. तसे करण्याच्या आड कोणी येत असेल तर त्याच्याशी झगडले पाहिजे, त्यासाठी जिद्द पाहिजे, असा तो दृष्टिकोन होता असे वाटते. यामुळे 'विवेकनिष्ठ' आणि 'राष्ट्रवादी' अशा या आगरकर-टिळकांच्या भूमिका होत्या असे म्हणता येईल. 'राष्ट्रवादी' म्हणजे अविवेकी असे समीकरण मांडण्याची मुळीच गरज नाही. परंतु लढाऊ भूमिका स्वीकारली म्हणजे विवेकाला मर्यादा पडतात हे नाकारता येणे कठीण आहे. तो प्रामुख्याने कार्यप्रवणतेचा, जिद्दीचा, इच्छाशक्तीचा प्रश्न बनतो हे ध्यानात ठेवले पाहिजे.

आगरकर जर राजकीय सुधारणेचे महत्त्व मानीत तर टिळकांनी सामाजिक व धार्मिक सुधारणांना महत्त्व का देऊ नये? याचा अर्थ जावडेकरांनी म्हटल्याप्रमाणे टिळकांचा पक्ष "जहाल राष्ट्रीय पण सामाजिक व धार्मिक सुधारणांत मागासलेला किंवा नेमस्त"[४२] होता असाच नव्हे काय? टिळकांना सामाजिक वा धार्मिक क्षेत्रांत प्रतिगामी किंवा निदान परंपरावादी का म्हणू नये? 'सुसंगत सर्वांगीण नेमस्त' म्हणजे रानडे, 'सुसंगत सर्वांगीण जहाल' म्हणजे आगरकर, हे जावडेकरांचे निष्कर्ष येथे तपासता यायचे नाहीत. परंतु टिळकांच्या भूमिकेचा मात्र थोडासा अधिक विचार केला पाहिजे. पारतंत्र्यामुळे राजकीय क्षेत्र सामाजिक व धार्मिक क्षेत्रांपासून अलग करण्याच्या शक्यतेचा विचार यापूर्वीच केला आहे. ही गोष्ट आगरकरांनाही मान्य आहे. आता यापुढे जाऊन आणखी एक मुद्दा ध्यानात घेणे जरूर आहे. आगरकरांनी "मनुष्य-सुधारणेच्या मुख्य तत्त्वांची कोणती दिशा आहे" हे दाखवताना क्षीरपथाची (मिल्की वे) उपमा वापरली आहे. ते म्हणतात, "अशा रीतीनें क्षीरपथाचें अवलोकन ज्यानें एकवार केलें आहे तो या विश्वांतील कोणत्याही गोष्टीचा अंत आपणास स्पष्टपणें दिसून आला आहे असें म्हणण्यास धजणार नाही...ज्याप्रमाणें अंधारांत सगळ्या रंगांचा लोप होतो त्याप्रमाणें फार दूरच्या भविष्यकालाविषयीं विद्वान् आणि अविद्वान् यांचें सारखेंच अज्ञान असतें. तथापि ज्याप्रमाणें दुर्बिणवाल्यास त्या यंत्राच्या सहाय्यामुळें दूरस्थ तारकासमूहाविषयीं दुसरें कांहीं समजलें नाहीं, तरी त्याच्या अनंतत्वाविषयीं खात्री होते, त्याप्रमाणें विद्यारूप दुर्बिण ज्या विद्वानास प्राप्त झाली आहे त्याच्या ज्ञानचक्षूंस फार दूरची मनुष्यावस्था नीट रीतीनें न्याहाळतां आली नाहीं तरी तिच्या उन्नतीला सीमा नाहीं येवढें पक्कें दिसून येतें.

...स्थित्यंतराचें रहाटगाडगें सदा फिरत राहाणार. त्याच्या गतीस कोणीही प्रत्यवाय करूं शकत नाहीं." [४३] सुधारणेविषयीचा हा अनंतत्वाचा सिद्धांत मान्य होण्यासारखा आहे. तो अगदी स्पष्ट असला तरी अर्थात एखाद्या विशिष्ट सुधारणे-विषयी, उदाहरणार्थ बालविवाहप्रतिबंधाविषयी, बोलताना तो लागू पडत नाही हे उघड आहे. अनंत मार्गावर पुढे जाताना असे टप्पे गाठायचे असतात; ते साध्य करून पुढे जायचे असते; प्रवास मात्र सतत चालणार हे ध्यानात ठेवायचे असते. तथापि इंग्रजांचे राज्य घालवणे हा या प्रवासातील एक टप्पा होऊ शकतो. ते काही अनंत ध्येय नव्हे. ते एक सान्त उद्दिष्ट आहे. आगरकर-टिळक वाद हा अशा प्रकारे सुधारणेचा कधीही न संपणारा अनंत मार्ग आणि परकीय राज्य घालविण्याचा विशिष्ट क्षणी साध्य होणारा सान्त उद्देश यांतील वाद आहे. कधीही न संपणाऱ्या अनंत मार्गाने प्रवास करताना नजिकच्या वाटा शोधायचे कारणच नसते. शुद्ध वैचारिक भूमिका घेणेच योग्य ठरते. अनंताचा छोटासा कण जरी हाती आला, एखादे पाऊल जरी पुढे पडले, तरी ते 'अनंत' कार्य झाले असे म्हणता येते. उलट, विशिष्ट उद्देशावर स्थिर दृष्टी ठेऊन ते गाठायचे म्हटले म्हणजे जो जो मार्ग तिकडे लवकर नेऊ शकेल तो तो ग्राह्य होय असेच म्हणता येते. जितके झपाट्याने, वेगाने पुढे जाता येईल तितके गेले पाहिजे. मिळतील त्या मार्गांचा, आडवाटांचादेखील पूर्ण उपयोग केला पाहिजे. राष्ट्रीय स्वातंत्र्याचे उद्दिष्ट हे अशा प्रकारचे उद्दिष्ट आहे. ते राष्ट्रवादाचे मूलभूत उद्दिष्ट होते. टिळकांनी ते साध्य करण्याचे ठरविले याबद्दल आम्ही त्यांचे कायमचे ऋणी राहू यात तिळमात्र संशय नाही. तो आगरकरांच्या अनंत मार्गावर पुढे नेणारा टप्पा ठरेल की नाही हा टिळकांचा नव्हे तर आमचा प्रश्न आहे. त्याचे उत्तर आम्हांस अजून द्यायचे आहे.

सामाजिक सुधारणा हा कधीही न संपणारा प्रवास आहे. राजकीय सुधारणा हा त्याचाच एक भाग होय. उलट, राजकीय स्वातंत्र्य हे ताबडतोबीने गाठायचे ध्येय होते. पहिल्यात एक जीवनदृष्टी व्यक्त होते, दुसऱ्यात ध्येयपरायणता प्रत्ययास येते. दोन भिन्न पातळ्यांवरील हे दृष्टिकोण आहेत. यामुळे अमूक योग्य व तमूक चुकीचे, यांचा जय आणि त्यांचा पराजय अशा प्रकारचे वर्णन येथे गैरलागू ठरेल अशी माझी समजूत आहे. आता अनंत मार्गाने प्रवासास निघालेले आगरकर हे ढगात चालत होते असे मात्र नाही. अनंत लहानसहान गोष्टींचे मिळून बनणारे अनंतत्व आहे हे ते जाणीत आणि यामुळेच क्षीरपथा-पासून हजाम व हजामती, स्नान व आंघोळ अशांसारख्या विषयांपर्यंत ते विचारपूर्वक व मोकळेपणाने लिहीत. साध्याही विषयात महान आशय पाहा-ण्याचे सामर्थ्य त्यांच्या ठिकाणी होते. त्यांनी अनेकांना स्फूर्ती दिली; कार्याला दिशा दाखवली. उलट, राष्ट्रीय जीवनाचा सतत सर्वांगीण विकास व्हावा म्हणून आवश्यक व अपरिहार्य पूर्वतयारी म्हणजे राष्ट्रीय स्वातंत्र्य होय. ते गाठण्यासाठी

टिळक घोडदौडीने निघाले. यामुळे वाटेतील इतर गोष्टींकडे त्यांना लक्ष देता आले नाही.

टिळकांची ही ध्येयपरायणता आणि तिचे परिणाम यांचा विचार यथावकाश करू. तूर्त एकच गोष्ट सांगावीशी वाटते ती ही की, आगरकर आणि टिळक यांचे कितीही मतभेद झाले असले तरी त्यांचा परस्परांविषयीचा आदर त्या योगाने मुळीच कमी झाला नाही. 'स्वार्थो यस्य परार्थ एव स पुमानेकः सतामग्रणीः' हे भर्तृहरीचे वचन आगरकरांच्या बाबतीत यथार्थतेने उद्धृत करून, आगरकर कालवश होऊन २१ वर्षे लोटली आहेत अशा वेळी, ते "पक्के स्वराज्यवादी" असल्याचा टिळक आग्रहपूर्वक उल्लेख करतात.[४४] उलट आगरकर, जुन्यांनी टिळकांना जवळजवळ घेरले असताना, "हे तुमचे पुढारी नव्हत" असा खणखणीत इषारा देतात, आणि म्हणतात, "रा० रा० बाळ गंगाधर टिळक हे प्रसंग पडल्यास प्रो० जिन्सिवाले यांच्यापुढें जातील इतकेंच नाहीं, तर जातिबाहुल्यामुळें अगोदरच जेरीस आलेल्या या हतभाग्य देशांत अधिक जाती होऊं नयेत, म्हणून कायद्यानें किंवा लोकमतानें जेवढ्या सुधारणा साऱ्या लोकांस ग्राह्य होतील अशाच करण्याचे हे दिवस आहेत, असें म्हणणाऱ्या आमच्यासारख्यांपुढेंही दोन पावलें जाण्यास हे डगमगणारे नाहींत. ... हें थोड्या दिवसांपूर्वी प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या स्वदस्तुरच्या विनंतिपत्रावरून कोणाच्याही लक्षांत येण्यासारखें आहे. या लेखकाच्या मतांत आणि रा० टिळक यांच्या मतांत, कांहीं लोक म्हणतात त्याप्रमाणें, जमीनअस्मानाचें अंतर असतें, तर नोकरीचा मार्ग सोडून सामान्य देशकार्यासाठीं आम्हीं एके ठिकाणीं कधींच आलों नसतों, व बऱ्याबाईट रीतीनें गेलीं दहा वर्षें आमच्या हातून एकत्र निघालीं नसतीं. पण वारंवार होतें काय कीं, जसजसें वय वाढत जातें तसतसा मताभिमान आणि आग्रह वाढत जातो म्हणून म्हणा, किंवा कोणत्याही दोन व्यक्तींत केवढेंही मतसादृश्य असलें तरी तीं मतें अमलांत आणण्यासाठीं ज्या उपायांची योजना करावयाची त्याविषयीं त्यांत जो मतभेद उत्पन्न होतो तो कधींकधीं मूळ मतांच्या सादृश्याहून प्रबलतर होऊन बसतो म्हणून म्हणा, जे एकदां सामान्य संकल्प करून स्वार्थाचें किंवा परमार्थाचें कांहीं कृत्य हातीं घेतात त्यांचा पुढें बेबनाव होऊं लागतो व शेवटीं त्यांची फाटाफूट होण्याचाही प्रसंग येतो. ज्या 'केसरी'साठीं या लेखकास कारागृहवास सोसावा लागला, व जो त्यानें उदार महाराष्ट्रीयांच्या गुणग्राहित्वामुळें व समदुःखित्वामुळें आनंदानें साहिला, त्या पत्राचा व याचा वियोग होऊन, हा नवीन 'सुधारक' अस्तित्वांत येण्यास, किंवा येथें बऱ्याच प्रतिष्ठेस आलेल्या एका लोकोपयोगी संस्थेच्या मुख्य चालकांपैकीं दोघां गृहस्थांनीं, विशेषतः रा० टिळकांनीं, आपल्या कामाचा राजीनामा देण्यास, अशा प्रकारचा साधनसंबंधक मतभेद कारण झाला आहे, दुसरें कांहींही नाहीं."[४५]

धार्मिक व सामाजिक सुधारणांप्रमाणेच राजकीय सुधारणांचा मार्गही अनंत


असला तरी राजकीय ध्येय म्हणून स्वातंत्र्यप्राप्तीसंबंधी असे म्हणता येत नाही. टिळकांच्या भूमिकेत या ध्येयाचे प्राथम्य प्रकट होते. आगरकर जेव्हा प्राथम्याच्या या प्रश्नाबद्दल निश्चित उत्तर देणे कठीण आहे असे म्हणतात किंवा राजकीय सुधारणेस प्रसंगी प्राथम्यही देतात तेव्हा व्यापक सामाजिक स्थित्यंतराचा भाग म्हणून राजकीय स्थित्यंतराचा ते विचार करीत असल्याचे दिसते. हे स्थित्यंतर म्हणजे एक सतत चाललेली विकासाची प्रक्रिया होय. टिळक-आगरकरांच्या भूमिकांचे हे वैशिष्ट्य आरंभापासून स्पष्ट झाले होते असे नाही; परंतु कालांतराने त्यांना हे स्वरूप प्राप्त झाले, असे म्हणता येते.

या दिशेने टिळकांच्या भूमिकेचा होत असलेला विकास हा येथे ध्यानात घ्यायचा आहे. राजकीय ध्येयप्राप्तीसाठी सशस्त्र बंडाचा मार्ग अव्यवहार्य म्हणून वर्ज्य केल्यानंतर साहजिकच लोकमत निर्माण करणे हाच पर्याय टिळकांपुढे शिल्लक होता. शिक्षण हे या मार्गाचेच एक साधन होय ही टिळकांची भूमिका. परंतु प्रस्थापित व्यवस्थेतच सरकारी अनुदान स्वीकारून आपणास अपेक्षित असलेले कार्य शिक्षणसंस्थांकडून होणे शक्य नाही असे दिसू लागताच ते शिक्षण-क्षेत्रातून बाहेर पडले. त्याचप्रमाणे सामाजिक प्रश्नांबाबतही त्यांनी वेळोवेळी काढलेले उद्‌गार किंवा घेतलेली भूमिका ही त्यांच्या राजकीय ध्येयसिद्धीसाठी केलेल्या प्रयत्नांचाच एक भाग होय, असे दिसते.

यांतील एक महत्त्वाची आणि वादग्रस्त घटना म्हणजे संमतिवयाचा कायदा ही होय. विवाहित मुलीशी नवऱ्याने करायच्या संभोगाची किमान वयोमर्यादा कायद्याने १० व्या वर्षावरून १२ व्या वर्षापर्यंत वाढवावी ही भूमिका १८८४ साली मलबारीशेटजींनी घेतल्यापासून हा वाद धुमसत होता. १८८६ साली यासंबंधी आंदोलन झाले. पुढील वर्षी हा प्रयत्न थोडासा गारठला. पुनः दोनतीन वर्षांनी तो वर येऊ लागला. सुधारक व सनातनी यांच्यातील हा वाद होता. उभयपक्षी सभा भरविणे, आपापल्या भूमिका पुढे मांडणे, त्यांना निरनिराळ्या स्वरूपांत पाठिंबा मिळवणे याबाबतचे प्रयत्न सुरू होते. या वादाचा विस्ताराने ऊहापोह करण्याचे कारण नाही. "या वादाचा सरकारशी संबंध येत नव्हता, तो एक आपापसातील वाद होता", असे टिळकांचे चरित्रकार केळकर यांनी सूचित केले आहे.[४६] सकृद्दर्शनी हे विधान जरी मान्य होण्यासारखे दिसले तरी ते अपूर्ण आहे. कायद्याने सुधारणा व्हावी की होऊ नये ही वादातील मध्यवर्ती कल्पना 'सरकार' या संस्थेविषयीची भूमिका किंवा दृष्टिकोण निश्चित करणारी होती हे उघड आहे.

या वादातील दोन्ही बाजूंच्या भूमिका वाटतात तितक्या परस्परविरोधी नव्हत्या असे एका अर्थी म्हणता येईल. एक तर त्या अर्धसत्यावर आधारलेल्या होत्या. लोकमत व कायदा या दोहोंचीही सामाजिक सुधारणेला गरज असते. कायद्यावाचून लोकमत प्रभावी होऊ शकत नाही; लोकमताचा आधार नसल्यास कायद्याने होणारी

सुधारणा कित्येकदा केवळ कागदावरच राहाते. सुधारकांना याविषयी पूर्ण जाणीव होती. आगरकर म्हणतात, "आजमितीस जितक्या म्हणून सुधारणा आम्हांस इष्ट किंवा आवश्यक वाटतात त्या सर्व कायद्याच्या मदतीनें सुसाध्य आहेत असें आमचें म्हणणें नाहीं किंवा ह्यांपैकी कांहीं कायद्यानें सुसाध्य असल्या तथापि त्या सर्वांवर कायद्याची अंमलबजावणी करावी असेंही आम्ही इच्छित नाही. परंतु याचें कारण आमचें सरकार परकें आहे हें नव्हे, किंवा सामाजिक गोष्टींत सरकारने हात घालणें गैरशिस्त आहे अशा सामान्य सिद्धांताचा आम्ही अंगिकार करतों असेंही नव्हे. व्यक्तीच्या ज्या आचरणापासून समाजाचें प्रत्यक्ष अपरिमित नुकसान होत नसेल तें आचरण त्या व्यक्तीस घातक असलें तथापि त्यानें ते करूं नये अशी समाजानें सक्ती करण्याचा समाजास अधिकार नाहीं. व्यक्तिस्वातंत्र्य आणि समाज-बंधन या दोहोंसही मर्यादा आहेत."[४७] यावरून लोकमत तयार करण्याची म्हणजेच व्यक्तिस्वातंत्र्याची बूज राखण्याची कल्पना सुधारकांना अमान्य होती असे म्हणता येत नाही. सुधारणा विविध प्रकारच्या असू शकतात व काहींच्या बाबतीत कायदा करण्याची मुळी गरजच नाही. उलट, सतीच्या चालीसारखी चाल बंद करताना, लोकमत तयार करण्याची खटपट अनावश्यक आहे, ताबडतोब कायदा करणे हेच उचित ठरते. कायदाही विविध स्वरूपाचा असू शकतो. सतीची चाल किंवा बाल-विवाह याबाबतच्या कायद्याने बंधन निर्माण होते; विधवाविवाहास मान्यता देणाऱ्या कायद्याने विधवेवर विवाहाची सक्ती होत नाही, परंतु विवाह केल्यास संरक्षण मिळते. या सर्व गोष्टींची पूर्ण जाणीव आगरकरांच्या लेखनात आढळते. न्यायमूर्ती रानडे यांनीही कायद्याच्या आवश्यकतेचे उत्कृष्ट समर्थन आणि प्रतिपक्षीयांच्या भूमिकेचे खंडन आपल्या 'स्टेट लेजिस्लेशन इन सोशल मॅटर्स' या निबंधात केले आहे. तथापि रानड्यांची भूमिका आगरकरांपेक्षा काहीशी भिन्न होती. एका अर्थी टिळकांनीही कायदा होताच कामा नये, अशी भूमिका घेतली नव्हती. लोकमत प्रथम तयार करणे आवश्यक आहे अशी त्यांची भूमिका आहे आणि ती समजू शकते. तुळशीबागेतील सभेच्या वेळी त्यांनी लिहिलेल्या स्वदस्तुरच्या पत्रावरून हे स्पष्ट होते. त्या पत्रातील २०० सह्या मिळवण्याच्या अटीवरून तत्कालीन लोकमताविषयीचा त्यांचा अभिप्राय स्पष्ट होतो.



कायद्याने सुधारणा घडवून आणावी की नाही या सामान्य प्रश्नासंबंधी वाद होण्याचे कारण नव्हते. सुधारकांचे म्हणणे पाहाता केवळ संमतिवयाच्या प्रश्ना-पुरतेच वादाचे स्वरूप मर्यादित करता आले असते, आणि कायदा करूच नये अशी तात्त्विक भूमिका टिळकांचीही नव्हती. १८८१ सालीच त्यांनी "कोणतीही चाल प्रचारांत आणण्यापूर्वी, किंवा त्यासंबंधानें कायदा करण्यापूर्वी लोकमत फिरवण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. कायदा हा लोकमताचा पूरक असल्याकारणानें, जर त्यास लोकमताचें पाठबळ नसेल तर त्याचा कांहीं एक उपयोग होत नाहीं."[४८] असे मत व्यक्त केले होते. कायद्याची पूर्वतयारी व कायदा अमलात आणण्याचे

साधन या दोन्ही दृष्टींनी ते लोकमताकडे पाहात होते. असे असताना हा प्रश्न धसास का लागावा? वास्तविकपणे समाजसुधारणा करण्याचे एक प्रभावी साधन म्हणून कायद्याचा उपयोग त्यापूर्वी कित्येक वेळा झाला होता. १८२९ मध्ये सतीची चाल बंद करण्यात आली. १८३२ साली धर्मांतर करणारांना पूर्वधर्मातील आप्तस्वकीयांच्या इस्टेटीचा हिस्सा मिळण्याचा कायदा झाला. आरंभी हा कायदा बंगालपुरताच मर्यादित होता; १८५०मध्ये तो सर्व हिंदुस्थानभर लागू करण्यात आला. शिवाय जगन्नाथाच्या संस्थानातील अव्यवस्थितपणा घालविणारा कायदा, गुलामांचा व्यापार बंद करणारा कायदा[४९] अशी कितीतरी उदाहरणे देता येतील. तथापि एक तर ही बहुतेक उदाहरणे १८५८ सालापूर्वीची होती, आणि दुसरे म्हणजे सामाजिक सुधारणेपेक्षा राजकीय ध्येय अधिक तातडीचे व आवश्यक मानल्यानंतर ते गाठण्याच्या दिशेने प्रयत्नशील होण्याची गरज होती. सुधारकांची सर्वसामान्य भूमिका आपण राजकीय हक्कांना अजून लायक नसल्याची पर्यायाने कबुली देणारी होती, आणि यामुळे ती मान्य होणे अशक्य होते. यामुळे कायद्याने सुधारणा करण्यास विरोध हा स्वाभाविकच होता असे म्हणता येईल.

ही विरोधाची भूमिका टिळकांनी घेतली या घटनेचा आगरकरांनी 'मतभेदाचा एक मुद्दा' अशा प्रकारे उल्लेख केला आहे, आणि टिळक हे जुन्यांचे पुढारी किंवा सनातनी वृत्तीचे गृहस्थ असे म्हटले नाही, हे विसरता कामा नये. टिळकांसंबंधीच्या इतर कोणत्याही वर्णनापेक्षा आगरकरांचे वर्णन हे अधिक महत्त्वाचे मानावे लागते. परंतु एकदा कायद्याला विरोध करायचे ठरविले की, त्याचे परिणाम ओघाने आलेच. संमतिवयाची मर्यादा दहाव्या वर्षावरून बाराव्या वर्षावर नेणे म्हणजे पर्यायाने मुलीच्या लग्नाची किमान वयोमर्यादाच वाढविणे होय; कायद्याच्या कल्पनेबद्दल असा संशय असणारे अनेक परंपरावादी होते. त्या सर्वांना एरवी हात चोळीत बसावे लागले असते; परंतु आता त्यांना नेता मिळाला. मोठमोठ्या सभा होऊ लागल्या. राजकीय ध्येयासाठी लोकमत तयार करण्याचा हा नजिकचा मार्ग होता. विवाद्य विषयांपेक्षा परकीय राज्यकर्त्यांनी आमच्या चालीरीतींत ढवळाढवळ करू नये हा मुद्दा राजकीय दृष्ट्या अधिक लोकप्रिय होणे स्वाभाविक होते, आणि टिळकांनी त्यावरच जोर दिला. परंपरावादाचा व राष्ट्रीय आंदोलनातील एका महत्त्वाच्या विचारसरणीचा संबंध जडला, हा या निर्णयाचा एक महत्त्वाचा परिणाम होय.

ही घटना टिळकांच्या भावी कार्याची आणि भारतीय राष्ट्रवादाच्या विकासाची दिशा ठरविण्याच्या दृष्टीने बरीच निर्णायक स्वरूपाची ठरली असे मला वाटते. टिळक स्वतः सनातनी वृत्तीचे असल्यामुळे त्यांनी हा निर्णय घेतला की राजकीय ध्येयप्रवणतेमुळे तो घेतला गेला आणि त्या योगाने पुढे त्याला पूरक भूमिका त्यांना घ्यावी लागली, या प्रश्नाचा निर्णय मला या संदर्भात अप्रस्तुत वाटतो.

"कित्येक गोष्टी अशा आहेत कीं, त्या सर्वांस माहीत असतां व त्यांची आवश्यकता

प्रत्येक दिवशीं सर्वांच्या अनुभवास येत असतां, त्याबद्दल कोणी कोणाशीं बोलत नाहीं. याचें कारण असें आहे कीं, त्या गोष्टी पुरातन जनरूढीविरुद्ध आहेत. सर्व भयांमध्यें लोकापवादाचें भय मोठें प्रबल. यापुढें सुधारणेचा झेंडा लावणाऱ्या महावीरांच्या कंबरा बसतात. असें जरी आहे तरी ज्या गोष्टींपासून सतत नुकसान होत आहे असें वाटतें, अशा कोणी तरी (भीत भीत कां होईना) लोकांच्या विचारांपुढें आणिल्याच पाहिजेत."[५०] ही भूमिका 'केसरी'त १८८१ साली लिहिलेल्या पहिल्याच लेखात टिळकांनी मांडलेली आहे. सामाजिक सुधारणेबाबत त्यांचे विचार विशेष पुढारलेले नसतीलही. परंतु टिळकांना स्वभावाने वा वर्तनाने सनातनी किंवा निर्भेळ परंपरावादी म्हणता येईल की नाही याबद्दल मला शंका वाटते. त्यांची सामाजिक प्रश्नावरील भूमिका ही त्यांनी स्वीकारलेल्या राजकीय कार्याच्या गरजा ध्यानात घेऊन घेतली होती, ही या बाबतीत खरी महत्त्वाची वस्तुस्थिती आहे.

कायद्याने सुधारणा होता कामा नये हा आग्रह टिळकांनी ज्याप्रमाणे सुधारकांविरुद्ध धरला त्याचप्रमाणे असा कायदा करून आमच्या धार्मिक चालीरीतींत ढवळाढवळ न करण्याचे तुम्ही आश्वासन दिले आहे, त्याला जागा, असा इषारा ते राज्यकर्त्यांना देऊ लागले. क्रॉफर्ड-प्रकरणात मामलेदारांची बाजू घेऊन, सरकारच्या वचनावर कोणी विश्वास ठेवावा की नाही असा प्रश्न त्यांनी विचारला. "उत्साह, ओज, साहस, योजना वगैरे गुणांची जेथें जेथें जरूर आहे त्या सर्व जागा राज्यकर्त्यांनीं आपल्या हातीं ठेवून आम्हांस त्यांच्या हुकमतीखालीं केवळ मानवी यंत्रें बनविलीं आहेत...अशी स्थिति आल्यावर जो वरिष्ठ येईल त्याप्रमाणेंच आम्ही बनल्यास आमचा काय दोष?" असा नेटिव कामगारांच्या नीतिमत्तेबद्दल त्यांनी खुलासा केला. तुम्ही आपल्या शब्दास, वचनास जागले पाहिजे, असा इषारा टिळक राज्यकर्त्यांना क्रॉफर्ड-प्रकरणात व नंतरही सतत देताना आढळतात. आणि हे वचन कोणते, तर राणीचा जाहीरनामा.

१८५८ सालच्या जाहिरनाम्यानुसार राणीने ईस्ट इंडिया कंपनीकडून भारताचा राज्यकारभार आपल्या हाती घेताना काही निश्चित आश्वासने दिली होती. राणीने या जाहिरनाम्यान्वये कंपनीच्या व अन्य सर्व नोकरांना कायम केले; संस्थानिकांशी केलेले करारनामे आणि तह मान्य करून, राज्याचा मुलूख वाढविण्याची आपली इच्छा नसल्याचे स्पष्ट केले; शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित झाल्याकारणाने संस्थानिकांना इतःपर आपले राज्य निर्बंधपणे उपभोगता येईल, सर्व धर्मीयांना सारखेच धार्मिक स्वातंत्र्य दिले जाईल, लायकीप्रमाणे नोकरी दिली जाईल व ती देताना पक्षपात केला जाणार नाही, कायद्याने राज्य करताना जमिनीचे हक्क, प्राचीन हक्क, परंपरा व रूढी यांना योग्य तो सर्व मान दिला जाईल, अशी आश्वासने दिली. ही आश्वासने आधारभूत घेऊन टिळकांनी सरकारी अधिकाऱ्यांच्या वर्तनावर टीकास्त्र सोडले. राज्याचे उद्देश कितीही चांगले असले तरी अधिकाऱ्यांनी जर त्यांचा योग्य अंमल केला नाही तर ते निष्फळ होतात, असा ह्या टीकेचा रोख होता.

क्रॉफर्ड-प्रकरणाने नोकरानोकरांत पक्षपात न करण्याचे राणीचे आश्वासन फोल ठरले. आय० सी० एस० ची परीक्षा हिंदुस्तानात न घेतल्याने नोकरीबाबतच्या

समान संधीच्या घोषणेला हरताळ फासला गेला. हिंदु-मुसलमानांच्या दंग्यांत सर्व धर्मीयांना सारखेच धार्मिक स्वातंत्र्य देण्याच्या कल्पनेची वासलात लागली. प्राचीन हक्क, परंपरा व रूढी त्या दंग्यांच्या निमित्ताने निकालात निघत होत्याच. शेतकरी कर्जबाजारी होतच होता; त्यातच भरमसाट सारावाढीची भर पडली आणि शेवटी तर मुंबई कौन्सिलपुढे आलेल्या जमीनमहसुलाचा कायदा सुधारण्याच्या बिलामुळे (१९०१) जमिनीच्या मालकीहक्कावरच गदा आली. होळकरप्रकरणाने संस्थानिकांच्या हक्कांचा फोलपणा सिद्ध केला. अशा प्रकारे राणीच्या जाहिरनाम्यातील सर्व आश्वासने फोल ठरली आहेत हे प्रत्यक्ष घडत असलेल्या घटनांवरून दाखविण्याचा टिळकांनी सतत प्रयत्न केला. ही त्यांच्या राजकीय कार्याची एक महत्त्वाची पूर्वतयारी होती असे म्हणता येईल.

राणीच्या जाहिरनाम्यावर टिळकांचा मोठा विश्वास असावा असे म्हणता येत नाही. विष्णुशास्त्र्यांनी तर "आमच्या राज्यकर्त्यांची नाटकी भाषा ज्यास कळली नाहीं त्यास मात्र राणीसाहेबांचा जाहीरनामा किंवा फ्रियरसाहेबांची खिस्तभक्ती ही फसवूं शकतील."[२] असे स्पष्टच म्हटले होते. परंतु धार्मिक स्वातंत्र्याच्या, म्हणजेच धार्मिक चालीरीतींत ढवळाढवळ न करण्याच्या, संदर्भात टिळकांनी जाहीरनाम्याचा उपयोग केला. १९०१च्या जानेवारीत व्हिक्टोरिया-राणीच्या निधनानिमित्त लिहिलेल्या लेखात, "हा जाहीरनामा म्हणजे हिंदुस्थानांतील प्रजेच्या हक्काची मुख्य व महत्त्वाची सनद होय; व तिचा अंमल होण्यास जरी विलंब लागला तरी आज नाहीं उद्यां तरी अखेरीस हे हक्क आम्हां हिंदुस्थानवासी जनांस राणीसरकारच्या इच्छेप्रमाणें मिळालेच पाहिजेत...कोणी कांहींही म्हणो, ही सनद जोंपर्यंत कायम आहे तोंपर्यंत आपल्या राजकीय हक्कासंबंधीच्या मागण्या केवळ कायदेशीरच नव्हे तर त्या ईश्वरी व बादशाही संकेताच्या आहेत, अर्थात् सर्व प्रकारें योग्य व न्यायाच्या आहेत, यास दुसऱ्या प्रमाणाची जरूर नाहीं."[३] असे टिळकांनी म्हटले आहे. कर्झनच्या कारकीर्दीत, व विशेषतः राजपुत्राच्या भेटीच्या वेळी, हा जाहिरनाम्याचा विषय पुनः पुढे आला. जाहिरनाम्याचे 'प्रजेच्या हक्काची सनद' म्हणून वर्णन केल्यानंतर अवघ्या तीन महिन्यांच्या आतच कर्झनच्या कार्याचा आढावा घेताना ते म्हणतात, "विलायतेहून गव्हर्नर-जनरल होऊन जे कोणी बडे मुत्सद्दी इकडे येतात—मग ते लिबरल असोत किंवा कॉंझरव्हेटिव असोत—त्यांच्या डोक्यांत हा प्रश्न नेहमीं घोळत असल्यास त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. हिंदुस्थानांतील रयतेस ज्याप्रमाणें आपणांस पोटभर भाकरी कशी मिळेल याची नेहमी काळजी वाटत असून तोच प्रश्न नेहमीं महत्त्वाचा वाटतो, त्याप्रमाणें राज्यकर्त्यांसही आपलें राज्य अधिकाधिक चिरस्थायी कसें होईल व तें होण्यास कोणकोणते नवीन उपाय योजले पाहिजेत हे प्रश्न आधीं सुचतात. आम्हीं हिंदुस्थानांतील गरीब प्रजेनें कितीही राजनिष्ठपणा दाखविला तरी राज्यरक्षण करण्यास यापेक्षां अन्य उपायांची योजना

केली पाहिजे असें आम्हांस निःशस्त्र केलेल्या राज्यकर्त्यांस वाटणें स्वाभाविकच आहे. 'प्रजेचा संतोष तेंच आमचें सामर्थ्य' असे जे अष्टावनच्या जाहीरनाम्यांत शब्द आहेत ते समरांगणांत इंग्रज सरकार विजयी झाल्यावरचे आहेत हें लक्षांत ठेविलें पाहिजे."[४] १९०५ साली कर्झनच्या कारकीर्दीचा आढावा घेताना "वरिष्ठ प्रतीच्या सरकारी नोकरींत नेटिव्हांचा अधिकाधिक प्रवेश होणें अशक्य आहे" असे स्पष्टपणे सांगून कर्झनने राणीच्या जाहिरनाम्याचा 'उघड उपमर्द' केला आहे अशी टिळकांनी टीका केली[५] आणि त्यानंतर १९०७ च्या ५ मार्चच्या लेखात या मुद्यावर पडदा टाकला आहे. या लेखात टिळक म्हणतात, "सन १८५८ सालीं राणीसाहेबांनीं जो जाहीरनामा प्रसिद्ध केला त्यास हिंदुस्थानची सनद असें आम्ही मोठ्या डौलाने म्हणत असतों खरें; पण हा निव्वळ अर्थवाद आहे. जाहीरनामा ही खरी सनद नव्हे, त्यामुळें हिंदुस्थानांतील राज्यसत्ता कोणत्याही प्रकारें मर्यादित झालेली नाहीं. सन १८५७ च्या बंडानंतर लोक शांत व्हावे म्हणून राणीनें प्रजेस जो गोड आशिर्वाद दिला तो या जाहीरनाम्यांत आहे....या जाहीरनाम्याच्या ठिकाणीं सनदेचा आभास आहे; ही खरी सनद नव्हे."[६]

राणीच्या जाहिरनाम्यावरील विश्वास टिळकांनी ज्याप्रमाणे नाहीसा केला त्याचप्रमाणे ब्रिटिश पार्लमेंटवरील विश्वासही नष्ट करण्याचा त्यांनी प्रयत्न केला; मात्र तो सफल झाला असे म्हणता येईल की नाही याबद्दल शंका वाटते. आपल्या मागण्यांसंबंधी विलायतेत लोकमत जागृत करणे व पार्लमेंटसभेचे मन वळविणे हे कार्य त्या काळात अत्यंत महत्त्वाचे मानले जाई. विशेषतः दादाभाई नौरोजींना फिन्सबरीच्या मतदारांनी कॉमन्ससभेत निवडून दिल्यामुळे तर काही काळ ही आशा अत्यंत बळावली. जे लोक कर भरतात त्यांचा कायदे करण्याच्या कामी सल्ला घेतला जावा याबद्दलची सर्व खटपट १८९२ च्या इंडियन कौन्सिल ॲक्टप्रमाणे निष्फळ ठरली. लोकनियुक्त प्रतिनिधी कौन्सिलवर घेण्याची डफरिन, ब्राडलॉ यांना मान्य झालेली व स्वतः ग्लॅडस्टन यांनी एके काळी पुरस्कारलेली कल्पना पुढे त्यांनी धसास लावली नाही; व या नव्या कायद्यामुळे सभासदसंख्येत वाढ होण्याव्यतिरिक्त अन्य कोठलाही विशेष लाभ पदरात पडला नाही. "पार्लमेंटसभेकडून आमच्या तक्रारी व दुःखें कशी व किती निवारण होतील याचाही या बिलाच्या हकीकतीवरून थोडाबहुत अदमास करतां येईल."[७] असा सूचक अभिप्राय टिळकांनी व्यक्त केला होता. तथापि दादाभाईंची निवडणूक झाल्याचे समजताच पुनः नवी आशा निर्माण झाली. "इंग्रज लोकांतही मनानें सर्वच लोक काळे असतात असें नाहीं,"[८] असा त्या निवडणुकीचा अर्थ लावून ते म्हणतात, "आतां कित्येक अशी शंका काढतील कीं, आयर्लंडचे ऐंशी सभासद पार्लमेंटसभेंत असतांही जर आयर्लंडास हवे ते हक्क अद्याप मिळत नाहींत तर एकटे दादाभाई पार्लमेंटसभेंत गेल्यानें त्यापासून आमचा कितपतसा फायदा होणार आहे?

आमच्या मतें ही शंका अगदीं निर्मूल, चुकीची आणि अविचाराची आहे..... विलायतेंतील कांहीं मत देणाऱ्या लोकांस घटकाभर स्ववर्णाभिमान एकीकडे ठेवण्यास लावून त्यांच्या औदार्याचा प्रवाह जर अठ्ठावीस कोट मूक प्रजेकडे वळवितां येतो, तर त्याच लोकांसाठीं याहूनही कमी महत्त्वाच्या गोष्टी त्यांच्या हातून आपणांस करून घेतां येतील याबद्दल संशय घेण्यास आतां जागा राहिली नाहीं....हिंदुस्थानांतील दुराग्रही इंग्रज लोकांकडून आम्हांस सहसा न्याय मिळणार नाहीं हें उघड आहे. परंतु इंग्रजी राज्याची रचनाच अशी कांहीं चमत्कारिक आहे कीं, सर्व विधायक सत्तेची किल्ली ज्यांचे हातांत आहे त्यांचीं मनें असल्या दुराग्रहापासून प्रायः अलिप्त असतात. निदान हिंदुस्थानसंबंधीं तरी असा प्रकार असण्यास हरकत नाहीं."[९] तथापि हा आशावाद फार काळ टिकला नाही. हिंदुस्थानातील प्रजेकडून करांच्या रूपाने गोळा होणारा पैसा देशाबाहेरील कामांसाठी खर्च होता कामा नये, ही न्याय्य मागणी धुडकावून लावण्यात आली. पार्लमेंटसभेत इजिप्तच्या मोहिमेचा खर्च हिंदुस्थानावर लादण्यास २५२ अनुकूल व १०६ प्रतिकूल असे मतदान झाले. याचा उल्लेख करून टिळक म्हणतात, "पार्लमेंटसभेकडून आम्हांस न्याय मिळेल अशी आशा बाळगणें म्हणजे बहुतेक दगडास पाझर फुटण्याची आशा करण्यासारखेंच आहे. मग तेथें आमचा एक मेंबर असो कीं दहा असोत. आयर्लंडचे ऐशी लोक पार्लमेंटमधें आहेत. पण त्यांस अद्याप दाद मिळाली आहे काय? नाहीं. बरें, पार्लमेंटसभेचा नाद क्षणभर सोडून दिला तर सेक्रेटरी ऑफ स्टेट आणि व्हाइसरॉय असे जे खालील दोन अधिकारी राहातात, त्यांची तरी स्थिति यापेक्षां बरी आहे काय? नाहीं. मागें एकदां समकालीन परीक्षेचा पार्लमेंटसभेनें आम्हांस अनुकूल असा ठराव केला होता, पण तो हिंदुस्थान सरकारानें हाणून पाडला. व आतां हिंदुस्थान सरकार अनुकूल आहे तर पार्लमेंटसभा विरुद्ध. एवंच बाकी पुनः शून्य ती शून्यच!"[१०] अर्थात या सर्व लेखनाचा ब्रिटनमधील राष्ट्रसभेच्या प्रचारकार्याशी संबंध नव्हता हे उघड आहे.

हाच दृष्टिकोण पुढे लिबरल पक्ष अधिकारारूढ झाल्यानंतर मोर्ले हिंदुस्थानातील लोकांना अधिक हक्क देतील असा आशावाद बाळगणाऱ्यांना उत्तर देतांना टिळकांनी पुढे मांडला. "राजनीति पहिल्यानें स्वार्थास ओळखते, आणि मग तर्कशास्त्र तदनुकूल असेल तर त्याकडे वळते....कोणत्याही स्वाभिमानी राष्ट्राची स्थिति स्वभावतःच अशी असते कीं, कोठेंतरी फटकारा बसल्याखेरीज त्याच्या डोळ्यावरील अभिमानाचें पटल दूर होऊन त्यास अत्यंत सयुक्तिक गोष्टीहि दिसत नसतात. इंग्लंड कांहीं या नियमास अपवाद नाहीं."[११] असे म्हणून इंग्लंडमधील पक्षोपपक्ष वा नेते यांच्याकडे आशाळभूतपणे पाहाण्याच्या प्रवृत्तींची त्यांनी "लोंचटपणा व पोंचटपणा" या शब्दांनी संभावना केली, हे प्रसिद्ध आहे.

या पूर्वतयारीचा आणखी एक महत्त्वाचा भाग म्हणजे राष्ट्रीय सभा सामाजिक

परिषदेपासून अलग करणे हा होय. राष्ट्रीय सभा स्थापन करण्याची कल्पना प्रथम जेव्हा ह्यूम यांना सुचली त्या वेळी ती राजकीय संघटना असावी अशी त्यांची योजना नव्हती. कलकत्ता, मुंबई, मद्रास, पुणे इत्यादी ठिकाणी राजकीय संघटना त्यापूर्वीच प्रस्थापित झाल्या होत्या; आणि त्यांचे महत्त्व कमी व्हावे असे कोणाचेही मत नव्हते. प्रमुख राजकीय नेत्यांनी सामाजिक प्रश्नांवर विचार-विनिमय करण्यासाठी वर्षातून एकदा एकत्र यावे अशी ह्यूम यांची कल्पना होती. ह्यूमनी ही कल्पना त्या वेळचे व्हाइसरॉय लॉर्ड डफरिन यांना १८८५ साली सांगितली. तथापि डफरिन यांनी अशा प्रकारची संघटना विशेष उपयुक्त ठरणार नाही, उलट येथे ब्रिटनसारखा विरोधी पक्ष नाही ही खरी अडचण आहे, असे मत दिले. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे वृत्तपत्रे लोकमत व्यक्त करीत असली तरी ती विशेष विश्वास निर्माण करीत नाहीत. यामुळे देशातील राजकीय नेत्यांनी वर्षातून एकदा एकत्र येऊन शासनात कोणत्या उणिवा आहेत व त्या कशा सुधारता येतील याबद्दल आपले मत प्रकट करावे. ह्यूम यांच्या कल्पनेप्रमाणे अशा मेळाव्याचा त्या प्रांतातील गव्हर्नर हा अध्यक्ष असावा असे होते; पण चर्चा मोकळेपणाने व्हावी यासाठी असे करू नये असे डफरिन यांनी सुचविले. ह्यूम यांनी काही नेत्यांना निमंत्रण देऊन एकत्र बोलावले आणि त्यांच्यापुढे दोन्ही योजना मांडल्या. सर्वांना डफरिन यांची योजना पसंत पडली. आपण देशात असेपर्यंत आपले नाव प्रकट करू नये अशी डफरिन यांनी अट घातली होती, ती अत्यंत कसोशीने पाळण्यात आली. काँग्रेसच्या स्थापनेसंबंधीची ही हकीकत काँग्रेसचे पहिले अध्यक्ष उमेशचंद्र बानर्जी यांनी आपल्या 'इंडियन पॉलिटिक्स' या ग्रंथात दिली आहे. सनदी नोकरांसंबंधीची मागणी, इल्बर्ट बिलाचा वाद, इत्यादी घटनांमुळे देशात सर्वत्र सारखीच उद्दिष्टे असल्याचे स्पष्ट झाले होते. गाऱ्हाणी सारखीच होती आणि आकांक्षादेखील. यामुळे राष्ट्रीय पातळीवरून नेत्यांचा विचारविनिमय सुरू झाला.

राजकीय संघटना म्हणून जरी काँग्रेसची स्थापना झाली असली तरी सामाजिक सुधारणेबाबत विचारविनिमय करण्याची कल्पनाही कायम होती; आणि काँग्रेसचे अधिवेशन संपल्यानंतर तेथेच सामाजिक परिषदेचे अधिवेशन भरवले जाई. हा जणू प्रघात पडला होता. तथापि यासंबंधी दुसऱ्या, म्हणजे १८८६ सालच्या, अधिवेशनात दादाभाई नौरोजी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणातच शंका व्यक्त केली होती. दादाभाई म्हणाले : काँग्रेसनें सामाजिक सुधारणेच्या कार्यांत भाग घ्यावा असें म्हटलें जातें व आम्ही तसें करीत नाहीं म्हणून आम्हांस दोषही दिला जातो...परंतु प्रत्येक गोष्टीस योग्य काळ, योग्य परिस्थिति, योग्य व्यक्ती, योग्य ठिकाण यांची गरज असतेच. आम्ही राज्यकर्त्यांना आमच्या राजकीय आकांक्षा समजाव्यात यासाठीं राजकीय संघटना म्हणून एकत्र आलों आहोंत; सामाजिक सुधारणांचा विचार करण्याचा आमचा मुळीं हेतूच नाहीं; अशा

अवस्थेंत आम्हीं त्यासंबंधीं चर्चा करीत नाहीं याबद्दल दोष देणें योग्य नव्हे. ...सर्व जातींचे हिंदू येथें आहेत; तसेंच मुसल्मान, ख्रिश्चन, पारशी, शिख, ब्राह्मो इत्यादि सगळे आहेत. अशी ही सभा प्रत्येक विशिष्ट गटांत कोणत्या सुधारणा आवश्यक आहेत याची चर्चा कशी करणार? यामुळें हा प्रश्न इथें काढणें योग्य नव्हे. राष्ट्रीय सभा केवळ राष्ट्रीय स्वरूपाच्या प्रश्नांचा विचार करूं शकेल. अन्य सारे प्रश्न त्या त्या सामाजिक गटांच्या सभांकडेच सोंपविले पाहिजेत. दादाभाईंनी हा इषारा अगदी स्पष्ट शब्दांत दिला होता. तथापि कॉंग्रेसच्या अधिवेशनानंतर सामाजिक सुधारणा परिषदेचे अधिवेशन भरविण्याची प्रथा कायम होती. निरनिराळ्या सामाजिक गटांचे, धर्मांचे, जातींचे लोक जो जो कॉंग्रेसच्या अधिवेशनासाठी हजर राहू लागले तो तो हा प्रश्न अधिक तीव्र स्वरूप धारण करू लागला. टिळकांनी हा प्रश्न धसाला लावून १८९५ साली पुण्यात भरलेल्या राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनाच्या वेळी त्याच मंडपात सामाजिक सुधारणा परिषदेचे अधिवेशन होऊ दिले नाही आणि अशा प्रकारे या दोन कार्यांतील दुवा नाहीसा केला, हा इतिहास प्रसिद्धच आहे.

१८८९ साली टिळक प्रथम राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनास हजर राहिले. गोखले व लाला लजपतराय हेही त्याच अधिवेशनात प्रथम हजर होते. तेव्हापासून सहा वर्षांच्या काळात वर उल्लेख केलेला बदल घडून आला. राष्ट्रीय सभेला राजकीय स्वरूप प्राप्त झाल्यामुळे अधिकारी वर्ग तिच्याविषयी चारपाच वर्षांच्या काळातच साशंक झाला होता. त्यांनी विविध दिशांनी विरोध करायला आरंभ केला. सरकारी नोकर, पेन्शनर, सरकारी वकील इत्यादींना राष्ट्रीय सभेच्या अधिवेशनास हजर राहाण्यास मनाई करण्याचे प्रयत्न सुरू झाले. औधबिहारीलाल या नावाच्या एका गृहस्थाची, ते राष्ट्रीय सभेचे कार्य करीत होते या कारणास्तव, डेप्युटी कलेक्टरच्या जागेवर झालेली नेमणूक रद्द करण्यात आली. या घटनेस उद्देशून लिहिलेल्या एका लेखात टिळक म्हणतात, "'कोणत्याही मोठ्या चळवळीच्या उत्कर्षाला तिच्या उत्पादकापेक्षां तिचे शत्रूच अधिक अंशानें कारण होतात' ही म्हण अक्षरशः खरी आहे. राष्ट्रीय सभेच्या शत्रूंनीं चोहोंकडून तिजवर प्रहार करण्याचा क्रम सतत चालू ठेवला नसता तर तिजविषयीं लोकांना जी इतकी कळकळ वाटूं लागली आहे ती खचित वाटली नसती."[१२] सरकारचा मनाई करण्याचा हा उपक्रम हळूहळू सरकारी ग्रँट स्वीकारणाऱ्या शिक्षणसंस्था व त्यांतील शिक्षक व विद्यार्थी इत्यादी इतर घटकांकडेही वळला हे प्रसिद्ध आहे. दुसऱ्या दृष्टीने विचार केल्यास राष्ट्रीय सभेच्या कार्यावर राजकारणात उघडपणे न पडू इच्छिणारांचे वजन पडेनासे झाले आणि तिच्या राजकीय स्वरूपास हळूहळू महत्त्व प्राप्त होऊ लागले.

ही पूर्वतयारी होत असतानाच आवश्यक लोकमत तयार करण्यासाठी विशिष्ट दिशेने टिळक प्रयत्नशील असल्याचे स्पष्ट झाले. एक म्हणजे सरकारच्या

निर्णयासंबंधी टीका करून असंतोष निर्माण करण्याचे कार्य; दुसरे म्हणजे धर्मभावनेचा व ऐतिहासिक परंपरेचा लाभ घेऊन लोकजागृती करण्याचे कार्य. पहिल्यात शेतसाऱ्याची वाढ व शेतकऱ्यांचे इतर प्रश्न, ज्युरी-प्रकरण, कायद्यांचे व सरकारी नियंत्रणांचे वाढते प्रस्थ, प्लेगची लस टोचण्याचे प्रकरण, दुष्काळनिवारणाचे प्रयत्न इत्यादी गोष्टींचा आरंभीच्या, म्हणजे पहिला राजद्रोहाचा खटला होईपर्यंतच्या, काळात उल्लेख करता येईल. दुसऱ्यात गोरक्षणाची चळवळ, गणेशोत्सव, शिवाजी-उत्सव यांची आणि सामाजिक सुधारणेस त्यांनी केलेल्या विरोधाची गणना करावी लागेल. या प्रश्नांचा थोडक्यात उल्लेख करणे आवश्यक आहे.

शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंबंधी लिहिताना टिळक एके ठिकाणी म्हणतात, "यासंबंधानें विचार करावयाचा तिघांचा—शेतकरी, सावकार, आणि सरकार. कोणत्याही व्यवस्थेनें ह्या तिघांचें हित होईल तर ती उत्तम. पण हल्लीं तिघांचेंही नुकसान होत आहे." असे म्हणून येथे कायमधारा-पद्धती आणण्याची कल्पना त्यांनी उचलून धरली होती.[१३] त्याचप्रमाणे त्यांनी जमीनदारांची बाजू काही वेळा उचलून धरल्याचेही आढळून येते. याचा अर्थ आजचे सामाजिक वा वर्गकलहाचे प्रश्न त्या वेळी प्रामुख्याने त्यांच्यापुढे नव्हते असा आहे. त्या दृष्टीने फारसा विचार होऊ लागला नव्हता. राष्ट्रीय दृष्टिकोणातून विचार करताना संस्थानिक, राजेमहाराजे, जमीनदार इत्यादी लोक परके वाटायचे कारण नव्हते. याचा अर्थ टिळकांना शेतकऱ्यांच्या परिस्थितीची वा दारिद्र्याची जाणीव नव्हती असा मात्र नव्हे. "आमच्या सरकारास रशियाचें भय नसेल, नेटिव्ह राजांपैकीं कोणीही आपलें डोकें वर उचलण्याजोगा राहिला नाहीं व इंग्रजी शिक्षणानें जी नवी मंडळी तयार होत आहे तीही इंग्रजी राज्याचें मनापासून चिरस्थायित्व इच्छिणारी आहे; परंतु या सर्व गोष्टी अनुकूल असल्या तरी प्रतिवर्षी वाढत जाणाऱ्या शेतकरी लोकांची पुढें काय स्थिति होणार या भयंकर प्रश्नाचा त्यानें कांहीं निकाल लागत नाहीं हिंदुस्थान सरकारास किंबहुना इंग्रजी अंमलास जीं कांहीं भारी संकटें आहेत त्यांपैकीं हें पहिल्या नंबरचें होय."[१४] तत्कालीन शेतकऱ्यांच्या परिस्थितीचे टिळकांनी केलेले वर्णन अत्यंत मार्मिक आहे यात शंका नाही. टिळक म्हणतात, "गरीब बिचारा कुणबी, ज्यास पूर्वी आपल्या गांवांत हवें तें करण्याची मोकळीक होती, त्यासच आतां घराबाहेर पाऊल पडलें म्हणजे मी कोणत्या खात्याच्या तडाक्यांत सांपडतों अशी धास्ती वाटूं लागली आहे....निरनिराळ्या खात्यांचे मुख्य अधिकारी व त्यांच्या हाताखालील छोट्या अधिकाऱ्यांच्या पलटणी यांस आपले विचार रुचावयाचे नाहींत, असें सर वेडरबर्नसाहेब यांनीं स्पष्ट लिहिलें आहे. पण सदर अधिकाऱ्यांच्या हितापेक्षां रयतेचें हित ज्या पद्धतीनें होईल तीच पद्धत सरकारास स्वीकारली पाहिजे. एकाद्या आधाशी राजाप्रमाणें लोकांचें सर्व स्वातंत्र्य व अधिकार सरकारचीं

निरनिराळीं खातीं पूर्णपणें बळकावून बसलीं आहेत. या राक्षसी खात्यांच्या जुल्मांतून रयतेची सुटका होईल अशी योजना करणें हें विलायतेंतील लोकांचें पहिलें कर्तव्य आहे."[१५]

ज्युरी-प्रकरणाचा राजकीय हक्क या नात्याने विचार केला पाहिजे असा टिळकांचा आग्रह होता. या संदर्भात त्यांनी न्यायमूर्ती तेलंगांवर केलेली टीका प्रसिद्ध आहे. दुष्काळनिवारणाच्या संदर्भात तर त्यांनी सार्वजनिक सभेच्या वतीने गावोगाव प्रचारक पाठवून सरकारी निर्णयानुसार लोकांना कोणते हक्क प्राप्त झाले आहेत व ते त्यांनी कसे बजावले पाहिजेत यासंबंधी शेतकऱ्यांना माहिती देण्याचा उपक्रम सुरू केला. या संदर्भात, "हें राज्य कायद्याचें आहे, दांडगाईचें नव्हे; भांडणें झालीं तरी कायदेशीर भांडावयास पाहिजे; तसें आपण भांडूं तेव्हांच आपणांस कांहीं हक्क मिळतील,"[१६] असे सांगून "अशा वेळीं जर तुम्हांस हक्कानें मिळण्यासारखी सरकारी मदत तुम्ही मागून घेतली नाहींत, तर तुम्ही जगलेत काय आणि मेलेत काय सारखेंच, असें इतर देशांतील लोक तुम्हांस म्हणतील हेंही विसरूं नका. सारांश, मुकाट्यानें बसण्याचे हे दिवस नव्हेत."[१७] असा स्पष्ट इषारा त्यांनी दिला. पुढाऱ्यांनी दुष्काळाच्या संदर्भात काय करावयास हवे यासंबंधी तपशीलवार मार्गदर्शन करून, "हीं कामें थोडींबहुत करण्याचा उद्योग करील त्यावर अधिकाऱ्यांची थोडीबहुत गैरमर्जी होईल, व जुन्नरास परवा एका शहाण्या असिस्टंट कलेक्टरानें ज्याप्रमाणें कांहीं जणांवर फिर्याद केली तशीही फिर्याद करण्यास कांहीं अधिकारी मागेंपुढें पाहणार नाहींत. पण असल्या गोष्टीस आतां भिऊन उपयोगाचें नाहीं; किंबहुना योग्य रीतीनें रयतेच्या पोटाकरितां भांडत असतां एखाद्यास तुरुंगांत जाण्याचा जरी प्रसंग आला तरी हरकत नाहीं, पण ठिकठिकाणच्या पुढाऱ्यांनीं या वेळीं मनापासून झटलेंच पाहिजे असें त्यांस आग्रहपूर्वक आमचें सांगणें आहे. हें राज्य कायद्याचें व ओरडीचें आहे. कायदा सरकारनें केला आहे. ओरड करण्याचें काम आमचें आहे."[१८]

एकीकडे अशा प्रकारे असंतोष निर्माण करण्याचे काम करीत असतानाच दुसरीकडे हिंदूंच्या धर्मभावनेचा आश्रय घेऊन लोकांना अधिकाधिक संख्येने राष्ट्रकार्यासाठी एकत्र जमविण्याचा टिळकांचा प्रयत्न होता. गोरक्षणचळवळ आणि गणेशोत्सव व शिवाजी-उत्सव यांना त्यांनी दिलेले व्यापक सार्वजनिक स्वरूप ही त्याची उदाहरणे होत. यासंबंधीही विस्ताराने विवेचन करण्याचे कारण नाही. तथापि एकदोन गोष्टींचा मात्र उल्लेख करणे आवश्यक आहे. धार्मिक भावनेचा व ऐतिहासिक परंपरेचा आश्रय घेण्याच्या व सामान्य शेतकऱ्यांमध्ये व मध्यम वर्गीयांमध्ये असंतोष निर्माण करण्याच्या या तंत्राचा टिळकांनी अवलंब केल्यामुळे राज्यकर्त्यांच्या मनात त्यांच्याविषयी संशय निर्माण होऊ लागला. कारण, धार्मिक भावना दुखावल्या गेल्यास त्याचे परिणाम काय होतात याची थोडीशी चुणूक १८५७ च्या बंडात राज्यकर्त्यांना दिसली होती. धार्मिक भावनेच्या आधारावर

हिंदू व मुसलमान एकत्र आल्याचे ते अखेरचे महत्त्वाचे उदाहरण होते. यासंबंधी चर्चा पुढे येईलच. तथापि यामुळे, धर्मभावना प्रबळ असल्यामुळे तिच्या आधारावर दोनही जमातींना एकत्र येऊ देता कामा नये, हे इंग्रजांच्या राजकीय धोरणाचे एक महत्त्वाचे सूत्र बनले. यामुळे भारतीय राजकीय आंदोलन एका अडचणीच्या प्रसंगात सापडले यात संशय नाही.

१८९३ साली व त्यानंतर झालेले हिंदु-मुसलमानांचे दंगे सरकारी अधिकाऱ्यांच्या प्रेरणेने वा उत्तेजनाने झाले की काय हा एक स्वतंत्र प्रश्न आहे. पण प्रेरणा नसली तरी उत्तेजन असावे असे म्हणण्यास हरकत नाही. याच वेळी राष्ट्रीय सभेची लोकप्रियता वाढत असली तरी तिच्यात मुसलमानांना फारसे प्रतिनिधित्व नाही असा प्रचार राज्यकर्ते व अँग्लो-इंडियन पत्रे यांच्याकडून सुरूच होता. त्याचप्रमाणे हिंदू लोकांत शिक्षण अधिक, त्यांना नोकऱ्या चांगल्या, यामुळे साहजिकच मुसलमानांत असंतोष पसरला आहे, ते दंग्यास प्रवृत्त होतात ते याच कारणास्तव;—अशा प्रकारे दंग्यांच्या कारणपरंपरेचे स्पष्टीकरण करण्यात येई. टिळकांना हे मान्य नव्हते. राष्ट्रीय सभा ही कोणत्याही एका गटाची नसून ती सर्वांची आहे, म्हणूनच तेथे एखाद्या विशिष्ट समाजाचे अंतर्गत सुधारणेचे प्रश्न काढण्याचे कारण नाही, ही भूमिका त्यांनी घेतली होती, हे यापूर्वी सांगितलेच आहे. "आमच्या सुधारकांच्या मज्जातंतूंवर इंग्रजी विद्येचा जो संस्कार घडलेला आहे तोच आमच्यावरही घडलेला आहे हें त्यांनीं विसरतां कामा नये. आपली, आपल्या कुटुंबाची व आपल्या देशाची उन्नति होणें हेंच जर सुधारणेचें बीज असेल तर तें नको आहे असें म्हणणारा कोणी सांपडेल असें आम्हांस वाटत नाहीं....राष्ट्रीय सभेच्या मंडपांत सामाजिक परिषद भरवूं नये असें म्हणणारे लोक समाजसुधारणेचे द्वेष्टे आहेत असें म्हणणें जितकें खोटें तितकेंच सदर मंडपांत सामाजिक परिषद भरलीच पाहिजे असें म्हणणारे लोक समाजसुधारणेचे खरे पुरस्कर्ते आहेत असें म्हणणें हें होय. ...राष्ट्रीय सभा ही सर्व जातींच्या, धर्मांच्या व मतांच्या लोकांची आहे."[१९] ही भूमिका घेत असतानाच दुसरीकडे टिळक हिंदू समाजापुरताच विचार करताना आणि त्याला एकत्र जमवताना आढळतात, हे ध्यानात घेतले पाहिजे.

राष्ट्रीय सभा ही केवळ राजकीय कार्याचे साधन बनल्यानंतर त्या कार्याला उठाव आणण्याच्या दृष्टीने टिळकांनी नवीनवी साधने हाताळण्यास आरंभ केला. या नंतरच्या काळात सुधारक 'लिबरल' किंवा राजकीय संदर्भात 'नेमस्त' या रूपात दिसू लागले. 'सार्वजनिक सभा' टिळकपंथीयांच्या हाती गेल्यानंतर आपली मते व्यक्त करण्यासाठी नेमस्तांनी 'डेक्कन सभा' काढली. गोखले यांची वेल्बी कमिशनपुढे झालेली साक्ष डेक्कन सभेचे चिटणीस या नात्याने झाली. या घटनेवर टिळक खूप संतापलेले दिसतात.[२०] काहींनी आपणांस नेमस्त म्हणून घ्यायचे म्हणजे दुसरे जहाल आहेत असे सूचित करायचेच नव्हे काय?—असा

त्यांचा आक्षेप होता. रँडच्या खुनानंतर खुनाशी प्रत्यक्ष संबंध जोडता न आल्यामुळे सरकारने टिळकांवर राजद्रोहाचा खटला केला, व त्यात टिळकांना दुसऱ्यांदा तुरुंगवास पत्करावा लागला. तो भारतातील राजद्रोहाचा पहिलाच खटला होता, व त्यात टिळकांना दीड वर्षांची शिक्षा झाली. हे घडण्याची जबाबदारी टिळकांनी मॉडरेट्सवरच टाकली.[२१] आणि पुनः या भेदात फारसे तथ्य नाही असे म्हणावयास आरंभ केला. "सुधारक गैरसुधारक या सामाजिक भेदापासून मॉडेरेशन ऊर्फ नेमस्तपणा आणि एक्स्ट्रीम अथवा जहाल जाणारे हा जो भेद करण्याचा कित्येकांनीं प्रयत्न केला होता त्याची गेल्या दोन वर्षांत काय वाट झाली हें दोन्ही पक्षांनीं लक्षांत आणावें" अशी सूचना १८९९ तील, तुरुंगातून सुटून आल्यानंतर लिहिलेल्या 'पुनश्च हरिः ॐ' या लेखात टिळकांनी केली.[२२] "...आम्ही आपल्याला मॉडरेशनिस्टस् म्हणविल्यानें सरकारच्या दृष्टीनें मॉडरेशनिस्टस् होत नसतों....इंग्रजी राज्यांत सरकारकडून प्रजेस जे हक्क मिळाले पाहिजेत त्याबद्दल कोणाचाच मतभेद नाही. हे हक्क कोणते हें लोकांस समजावून देण्याची व त्याप्रमाणें त्यांस सरकारास मागणी करण्यास सांगण्याचीही आवश्यकता आहे, याबद्दलहि मतभेद नाहीं. इतकें झाल्यावर नेमस्तपणा आणि जहालपणा तो कशांत राहाणार? बोलण्याची आणि लिहिण्याची इयत्ता जी कायद्यानें ठरली जाईल ती दोघांसही मान्य केली पाहिजे....कायद्याप्रमाणें जितकी मोकळीक दिलेली असेल तिचा पूर्ण फायदा घेऊन लोकमत जागृत करण्याचें व सरकारापाशीं आम्हीं मागत असलेल्या हक्कांचें समर्थन करण्याचें जें काम आम्हीं पत्करलें आहे तें काम निर्भयपणें चालवणें आम्हांस जरूर आहे. आम्हांस दिलेली मोकळीक आधींच कमी झालेली आहे; आणि त्यांत नेमस्त आणि जहाल असे भेद करणें म्हणजे आज जी पेज पिण्यास आपणांस मिळत आहे, तींतही आणखी पाणी ओतून 'वाः काय ही गुळचट झाली आहे' असें म्हणून मिटक्या मारीत बसण्यासारखें आहे."[२३]

'नेमस्त' किंवा 'मवाळ' आणि 'जहाल' यांच्यांतील भेदाचा हा मुद्दा टिळकांनी वेळोवेळी उपस्थित केला असून हा भेद विशेष महत्त्वाचा नाही असे उत्तर दिले आहे. हा भेद कळकळीच्या कमीजास्तपणाबद्दल नाही, "तो केवळ स्वभावाचा आणि विचारसरणीचा भेद आहे." असे टिळकांनी त्यासंबंधी स्पष्टीकरण करताना एके ठिकाणी म्हटले आहे,[२४] आणि राजकीय हक्कांसंबंधी जी चळवळ करायची तिच्या स्वरूपाचे विवेचन केले आहे. ही चळवळ 'सनदशीर' मार्गानेच झाली पाहिजे, असे ना० गोखले यांचे मत असल्याचे सांगून टिळक म्हणतात, "नवीन पक्षाचें म्हणणें असें आहे कीं, गेलीं २१ वर्षें राष्ट्रीय सभेनें राजकीय चळवळीची जी दिशा पत्करली ती चुकीची होती. ह्या एकवीस वर्षांतील राष्ट्रीय सभेच्या चळवळीला कॉन्स्टिट्यूशनल ऊर्फ सनदशीर चळवळ असें नांव प्राप्त झालें आहे....आमचें म्हणणें असें आहे कीं, हिंदुस्थानच्या राजकीय चळवळीसंबंधानें कॉन्स्टिट्यूशनल किंवा सनदशीर हे शब्द वापरणेंच चुकीचें

आहे....लोकमतावर इंग्लंडांतील राज्यव्यवस्था अवलंबून असल्यानें लोकमत जागृत करून लोकांचें मताधिक्य आपल्या बाजूचें करून घेतल्यानें इंग्लंडांत कार्यसिद्धि होते. लोकमत जागृत करणें व मताधिक्य आपल्या बाजूचें करून घेणें ह्याला इंग्लंडांत कॉन्स्टिट्यूशनल किंवा सनदशीर चळवळ असें म्हणतात. ...हिंदुस्थानांत वरील तऱ्हेची सनद किंवा कॉन्स्टिट्यूशन नाहीं, पण तशी निरर्थक चळवळ मात्र आहे....कॉन्स्टिट्यूशनल चळवळ करा, या शब्दांनीं जर पीनल कोडांतील सरकारच्या आज्ञा मोडून शिक्षा भोगूं नका, एवढाच उपदेश करावयाचा असेल तर ह्या उपदेशासंबंधानें नवीन पक्षाकडून कांहीं हरकत येईल असें वाटत नाहीं."[२५]

"हिंदुस्थानांतील राजसत्ता सनदशीर नाहीं, अनियंत्रित आहे...विलायतेंतील लोक ज्याप्रमाणें आपल्या प्रतिनिधींमार्फत राजाच्या सत्तेस आळा घालूं शकतात तसा हिंदी प्रजेस अधिकार नाहीं...हिंदुस्थानांतील राजसत्ता अनियंत्रित किंवा बेसनदशीर अथवा 'नॉन-कॉन्स्टिट्यूशनल' आहे,"[२६] हा फरक नेमस्त व जहाल या संदर्भात टिळकांनी वेळोवेळी स्पष्टपणे मांडला आहे. ही भूमिका मान्य केली म्हणजे कायदा पाळण्याचे बंधन तरी कितपत समर्थनीय ठरते हा एक प्रश्नच आहे. अनियंत्रित वा बेसनदशीर राजसत्तेचे कायदे न पाळणे अव्यवहार्य असेल, पण ते चुकीचे ठरू शकणार नाही. टिळकांनाही कायदेशीर आंदोलनाचा मार्ग स्वीकार्य म्हणून ठरविताना याबाबत जाणीव होती हे उघड आहे. ते म्हणतात, "हल्लीचे स्थितींत कायदा करणें आमच्या हातचें नाहीं. तेव्हां आमचे प्रयत्न इतिहासास, मामूल वहिवाटीस, प्रजेच्या नैसर्गिक हक्कांस धरून नीतिदृष्ट्या जरी योग्य असले तरी ते 'कायदेशीर' किंवा 'बेकायदेशीर' ठरविणें ही केवळ सरकारच्या इच्छेची गोष्ट आहे. आमचे योग्य प्रयत्नही एखादे वेळीं यांच्या कायद्यानें बेकायदेशीर होऊं शकतील. अशा वेळीं आमचे प्रयत्न बेकायदेशीर असें म्हणण्यापेक्षां कायदा जुलमी असें म्हणणें भाग पडेल. अशा स्थितींत 'कायदेशीर' किंवा 'बेकायदेशीर' हे शब्द आमच्या चळवळीस किंवा प्रयत्नास लागतात कीं नाहीं याची आम्ही चिंता करीत बसण्यांत कांहीं हंशील नाहीं. न्याय, नीति, ऐतिहासिक परंपरा किंवा प्रगति यांचा आधार आपणास आहे कीं नाहीं, एवढेंच आम्हीं पाहिलें पाहिजे. आणि यांचा आम्हांस पाठिंबा असला म्हणजे मग आमचे प्रयत्न कायद्याचे मर्यादेंत येतात कीं बाहेर पडतात, याची आम्हीं पर्वा करून उपयोगी नाहीं; कारण कायदा परक्यांचे हातांत आहे. आतां येवढें खरें कीं, कायदा मोडला गेला तर शिक्षा होणार. परंतु कायदा जुलमी असेल तर ही शिक्षा सोसूनच त्याचा प्रतिकार केला पाहिजे; एरवीं इलाज नाहीं. नीति आणि कायदा यांची जेव्हां फारकत होते तेव्हां असे प्रकार घडून यावयाचेच."[२७] अशा प्रकारे 'सनदशीर' ही कल्पना टाकून टिळकांच्या विचारांनी कायदेभंगापर्यंत मजल मारली होती. 'नेमस्त' किंवा 'मवाळ' आणि 'जहाल' यांच्यातील फरक ध्यानात घेतांना हा दृष्टिकोण महत्त्वाचा आहे.

"आमच्या राजकर्त्यांच्या अंगीं क्षत्रिय आणि वैश्य या दोनही वृत्तींचा समावेश झाला असल्यामुळें त्यांपैकीं वैश्य वृत्तीचा तरी विरोध करून त्यांस ताळ्यावर आणावें. चिनी लोकांनीं अमेरिकन लोकांस ताळ्यावर आणण्यास हीच युक्ति योजिली आहे, व हिंदुस्थानांतील लोकांस ती कां साधू नये, हें आम्हांस समजत नाहीं."[२८] अशा प्रकारे स्वदेशी माल वापरण्याच्या कल्पनेचा राजकीय शस्त्र म्हणून वापर करण्याची कल्पना टिळकांनी पुढे मांडली. स्वदेशीच्या पुरस्काराची ही कल्पना जुनीच असली तरी तिचा राजकीय शस्त्र म्हणून उपयोग करण्याचा विचार नवा होता. नेमस्तांचा स्वदेशी मालाचा वापर करण्यास विरोध नव्हता; परंतु जोवर देशात पुरेसे उत्पादन होत नाही तोवर या बाबतीत सबुरीने पुढे जाणेच त्यांना योग्य वाटत होते. उलट राजकीय शस्त्र म्हणून ही कल्पना वापरायची म्हटली म्हणजे हा मुद्दा अगदीच गैरलागू होता. कारण, त्या विचारसरणीत स्वदेशीचा इंग्लिश मालाच्या बहिष्काराशी संबंध जोडणे आवश्यक व अपरिहार्य होते. स्वदेशीच्या कल्पनेत देश आणि इतर सारे जग हा भेद पडतो. तो मान्य करायचाच; पण त्यापुढे जाऊन इंग्लंड आणि अन्य जग हाही भेद स्वीकारायचा आणि त्यावर आधारलेली बहिष्काराची कल्पना मान्य करायची; असा हा जहाल मार्ग होता. म्हणून शक्य तेथे देशातील मालच वापरावा, शक्य न झाल्यास अन्य देशीचा वापरावा; पण इंग्लंडमध्ये तयार झालेला माल मुळीच वापरू नये, तो बहिष्कृत समजावा, असा हा जहाल आंदोलनाचा मार्ग होता. राजकीय हेतूसाठी या शस्त्राचा उपयोग बंगभंगाच्या चळवळीच्या वेळी बंगालमध्ये केला गेला होता. "बहिष्कार, स्वदेशी चळवळ, पुढारी कैदेंत जाईपर्यंत हल्लीं होत असलेल्या जुलमाविरुद्ध ओरड, शाळेंतील विद्यार्थ्यांपासून तो तहत वृद्ध पुढाऱ्यापर्यंत सरकारी कृत्यांचा प्रत्यहीं चाललेला निषेध, निरनिराळ्या लोकांचे संप, आणि जुलमी राज्यकर्त्यांची सांपडतील तेव्हां व भेटतील तेथें कायदेशीर मानहानी असल्या प्रकारच्या तीव्र शस्त्रांचा जेव्हा सतत प्रयोग व्हावा तेव्हां कोठें एकाद्या जुलमी लेफ्टनंट गव्हर्नरास राजीनामा देण्याचा योग येणार. या मानानें पाहिलें तर बंगालची फाळणी रद्द होण्यास काय व किती खटपट लागेल याचा वाचकांनींच विचार करावा."[२९] अशा शब्दांत त्यांनी बंगभंगाच्या आंदोलनाचा अर्थ विशद केला आहे. बहिष्काराची कल्पना जुनीच होती. १८८१ साली लिहिलेला यासंबंधीचा टिळकांचा एक लेख आहे.[३०] त्यात हे तंत्र आयरिश लँडलीगच्या आंदोलनात ज्याप्रमाणे जमीनदारांविरुद्ध वापरले गेले त्याचप्रमाणे येथेही वापरण्याची आवश्यकता प्रतिपादन केली आहे. तथापि त्याचा संदर्भ प्रामुख्याने धार्मिक होता. पुढे हा विचार आर्थिक क्षेत्रात रूपांतरित करण्यात आला. याचे विवेचन वर केले आहे. नंतर तो राजकीय क्षेत्राकडेही वळला, हे प्रसिद्ध आहे.

यात आणखी एका शस्त्राची भर टिळकांनी घातली. ते म्हणजे राष्ट्रीय शिक्षण होय. खाजगी शिक्षणसंस्था स्वतंत्र ठेवण्याची व त्यातून, प्रसंगी सरकारऐवजी

लोकांकडून मदत मिळवून, योग्य शिक्षण देण्याची आवश्यकता त्यांनी प्रस्थापित केली. प्रो० विजापूरकरांच्या 'समर्थ विद्यालया'चे त्यांनी अभिनंदन केले. "सरकारपाशीं फारखत करून अशा रीतीनें स्वतंत्र शाळा चालविली तर युनिव्हर्सिटीच्या परीक्षेस या शाळेंतील विद्यार्थी घेणार नाहींत ही गोष्ट खरी आहे. व त्यामुळें नव्या रीतीनें चाललेल्या खाजगी शाळांत विद्यार्थ्यांचा मोठा भरणाही पहिल्यानें व्हावयाचा नाहीं."[३१] हे मान्य करून बंगाल्यातील 'नॅशनल कौन्सिल ऑफ एज्युकेशन'च्या अनुभवावरून त्यांनी आशावाद प्रकट केला. सुदैवाने २२ व्या राष्ट्रीय सभेत राष्ट्रीय शिक्षणाबाबतचा ठराव वाद न होता मंजूर झाला. हे शिक्षण व्यापक केले पाहिजे; त्याला धंदेशिक्षणाची जोड दिली पाहिजे; आणि ते स्वतंत्र रीत्या देण्यात आले पाहिजे; असे झाले तरच पाश्चात्य विद्या ही मदिरा ठरण्याऐवजी अमृतमय ठरू शकेल;—असे त्यांचे म्हणणे होते, आणि त्याच्या समर्थनार्थ त्यांनी जपानचे उदाहरणही दिले.

१९०६ साली २२ व्या राष्ट्रीय सभेच्या वेळी अध्यक्षपदावरून बोलताना दादाभाईंनी स्वराज्याची ध्येय म्हणून घोषणा केली होती. ही घोषणा सर्वांनी मान्य केली. अशा प्रकारे जहाल राजकारणाची स्वदेशी, बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षण व स्वराज्य ही चतुःसूत्री बनली हे प्रसिद्ध आहे. तथापि नेमस्त व जहाल यांच्यातील मतभेद हा प्रामुख्याने यांतील स्वदेशी व बहिष्कार यांसंबंधीच होता, असे दिसते.

टिळकांच्या जहाल राजकारणाची तयारी या चतुःसूत्रीपेक्षा कितीतरी व्यापक स्वरूपात झाली होती हे ध्यानात घेतले पाहिजे. राज्यकर्त्यांच्या आश्वासनावरील विश्वास त्यांनी नाहीसा केला. इंग्रज लोकांत एखादादुसरा चांगला माणूस आढळेल, नाही असे नाही. तथापि इंग्लंडमधील एखादा पक्ष किंवा एखादी अधिकारारूढ व्यक्ती किंवा पार्लमेंटसभेत निवडून गेलेला आमचा एखादादुसरा प्रतिनिधी आमचे प्रश्न सोडवू शकेल, हीही आशा त्यांनी नाहीशी केली. राष्ट्रीय सभा सामाजिक परिषदेपासून अलग करून तिला शुद्ध राजकीय स्वरूप दिले. सुधारकांशी त्यांनी विरोध केला. त्यामुळे जुन्या विचारसरणीच्या लोकांनी त्यांना पाठिंबा देण्यास आरंभ केला. निरनिराळ्या प्रश्नांवर पद्धतशीरपणे असंतोष निर्माण करण्यास त्यांनी आरंभ केला. आणि त्याबरोबर धार्मिक भावनेच्या साहाय्याने अधिकाधिक लोकांना एकत्र आणण्याचेही प्रयत्न केले. कायद्याने दिलेल्या सवलतीचा पुरेपूर फायदा घेऊन त्यांनी राजकीय हक्कांच्या मागणीचा पाठपुरावा सुरू केला. सनदशीर मार्ग अशक्य असून केवळ कायद्याची चौकट सांभाळून चळवळ करता येईल अशी भूमिका घेतली, व त्या संदर्भात इंग्रजांचे हिंदुस्थानातील राज्य हेच मुळी बेसनदशीर आहे असे आग्रहाने प्रतिपादन केले. त्या राज्याकडून राजकीय हक्क तरी कायदेशीररीत्या कितपत मिळवता येतील याबद्दल शंका व्यक्त करून कायदा व नीती यांची फारकत होते

तेव्हा कायदा मोडणे हेही प्रसंगी अपरिहार्य व आवश्यक बनते अशी भूमिका पुढे मांडली. पुढच्या सत्याग्रहाचा हा पायाच होता. यानंतर इंग्रजांशी लढा देण्याची साधने म्हणून स्वदेशी, बहिष्कार व राष्ट्रीय शिक्षण ही शस्त्रे पुढे आली आणि स्वराज्य हे या राजकारणाचे ध्येय बनले. ध्येयासंबंधी एकवाक्यता होती हे टिळकांनीही मान्य केले आहे. ज्या स्वरूपाचे स्वराज्य जहालांना अभिप्रेत होते त्याच स्वरूपाचे नेमस्तांनाही. परंतु आपणांस राजकीय हक्क क्रमाक्रमाने मिळू शकतील; त्यासाठी आततायीपणा करण्याचे कारण नाही; स्वदेशीचे आंदोलन ठीक आहे, पण बहिष्काराची कल्पना आपण आपल्या हितासाठी काढलेली नसून इतरांचे नुकसान करण्यासाठी काढली आहे; या विचारांचा राजकीय शस्त्र म्हणून उपयोग केल्याने आपण अकारण गैरसमज निर्माण करतो; इंग्लंडमध्ये लिबरल पक्ष अधिकारारूढ झाल्यास आपले कार्य पुढे जाईल; मोर्लेसारखी माणसे आपणांस मदत करतील; त्यांच्या सदसद्विवेकबुद्धीला आवाहन केले पाहिजे; त्यासाठी त्यांना येथील परिस्थिती समजावून सांगितली पाहिजे; इत्यादी, इत्यादी, अशी नेमस्तांची भूमिका होती.

सुधारकांचे नेमस्त झाले; गैरसुधारकांचे (हा टिळकांचा शब्द आहे) स्वराज्याच्या ध्येयप्राप्तीसाठी एकनिष्ठेने कार्यप्रवण झालेले जहाल बनले. नेमस्तांना किंवा मवाळांना इंग्रजांच्या संस्कृतीचे दर्शन झाले होते; जहालांना इंग्रजांच्या राज्याचा अनुभव मोलाचा वाटत होता. इंग्रजी विद्या व राज्यपद्धती यांच्या परिचयामुळे भारताचा राजकीय विकासदेखील इंग्लंडप्रमाणेच होत जाईल, असा नेमस्तांचा विश्वास होता. तसे न झाल्यास काय यासंबंधी स्पष्टपणे विचार करण्याची त्यांची तयारी नव्हती. इंग्रजाने येथील राज्य तलवारीच्या जोरावर मिळवले आहे; ते परोपकारासाठी मिळविले नसून स्वहितासाठी मिळवले आहे; आणि त्या हिताला धक्का बसल्यावाचून आपणांस काहीही मिळायचे नाही ही जहालांची भूमिका. त्यासाठी केवळ स्वदेशीचा पुरस्कार करून चालेल असे नाही. बहिष्काराचे शस्त्रही उपसावे लागेल, आणि तेही केवळ आर्थिक क्षेत्रापुरते नव्हे. आपल्या पक्षाची भूमिका स्पष्ट करताना १९०७ च्या जानेवारीत कलकत्ता येथे केलेल्या एका भाषणात टिळक म्हणाले, "आमच्याजवळ शस्त्रे नाहींत; आणि शस्त्रांची गरजही नाहीं. आमच्याजवळ एक अधिक प्रभावी शस्त्र, राजकीय शस्त्र, आहे. तें म्हणजे बहिष्कार. एक गोष्ट आम्हांस स्पष्ट दिसते आहे. या देशाचा सारा शासनव्यवहार मूठभर इंग्रज आमच्या सहाय्यानें चालवतात. सर्व कनिष्ठ नोकऱ्या आमच्याकडे आहेत. सारें सरकार आमच्या सहाय्यानें चाललें आहे. पण आम्हीं आपसांत सहकार्य केल्यास जे आज आम्हीच चालवतों तें आम्हीं आपल्या हातीं घेऊं शकतों ह्या आमच्या सामर्थ्याबद्दल आम्हांस अज्ञानांत ठेवण्यांत आलें आहे. सर्व ताबा आमच्याकडे आला पाहिजे. आम्हांला शासन चालवायचें आहे, केवळ कारकून व्हायचें

आणि राहायचें नाहीं....आपण या देशांत मूठभरच आहोंत हें प्रत्येक इंग्रज माणसाला माहीत आहे. यामुळें, 'तुम्ही दुर्बळ आहांत आणि ते शक्तिमान आहेत' या गोष्टीवर तुम्ही विश्वास ठेवावा अशा रीतीनें तो तुम्हांला बनवीत असतो. हें राजकारण आहे. आम्ही असे बरेच दिवस फसत आलों. आतां, तुमचें भवितव्य सर्वस्वीं तुमच्याच हातांत आहे याची तुम्हांला जाणीव करून देणें हें नव्या पक्षाचें धोरण आहे. तुम्हांला स्वतंत्र व्हायचें असल्यास तुम्ही स्वतंत्र होऊं शकतां."[३२] ही बहिष्काराची कल्पना भावी सत्याग्रहकार्यांची नांदीच होती असे म्हणता येईल.

आपल्या भूमिकेविषयी आग्रहाचा पण अत्यंत वास्तव स्वरूपाचा टिळकांचा दृष्टिकोण होता. 'मवाळ' आणि 'जहाल' हे कालसापेक्ष शब्द आहेत. आजचे जहाल हे उद्याचे मवाळ होतील, कारण आजचे नेमस्त हे कालचे जहाल होत. राष्ट्रीय सभा स्थापन होण्याच्या वेळी दादाभाईंना जहाल समजत असत; आता ते नेमस्त आहेत असे म्हणू लागले आहेत. 'जहाल' हे प्रगतीचे सूचक नाव आहे. "आज आम्हांला जहाल म्हणतात; पण आमचीं मुलेंबाळें उद्यां आम्हांला नेमस्त म्हणतील आणि स्वतःस जहाल म्हणूं लागतील, हें ध्यानांत ठेवलें पाहिजे."[३३] असा स्पष्ट इषारा त्यांनी त्याच भाषणात दिला होता. उर्वरित काळात मवाळांचा काल आता संपला आहे असे वेळोवेळी टिळक सुचवतात; परंतु त्याबरोबरच मवाळांनी राष्ट्रीय सभा सोडून जाण्याचे कारण नाही; वास्तविक तसे फारसे मतभेद नाहीतच; आणि असले म्हणून काय झाले?—असेही ते विचारतात. "राष्ट्रीय सभा—हल्लीं आहे तशीच कां होईना—ही एक अमक्या पक्षाची वतनदारीची संस्था आहे अशा रीतीनें लोकांचा गैरसमज करण्याचा जेव्हां प्रयत्न करण्यांत येतो तेव्हां काँग्रेसच्या व लोकांच्या हिताकरितां दोन शब्द लिहून तो गैरसमज दूर करणें हें आमचें कर्तव्य होय. इंग्लंडचा मुख्य प्रधान कोणी व्हावें असा तंटा चालला असतां पार्लमेंटसभा ही काँझरवेटिव्ह, लिबरल किंवा रॅडिकल यांपैकीं एकाच पक्षाची आहे, दुसऱ्या पक्षास वर्चस्व पाहिजे असल्यास त्यानें निराळी पार्लमेंट काढावी, असें जर विलायतेंत कोणी प्रतिपादन करू लागला तर तेथील लोक त्यास 'स वै मूर्खोऽथवा पशुः' या कोटींत ओढल्याखेरीज राहाणार नाहींत. आमच्याकडील काँग्रेस किंवा राष्ट्रीय सभा या संस्थेसही हाच न्याय लागू आहे."[३४] अशा प्रकारे काँग्रेसला पार्लमेंटची उपमा त्यांनी दिली. दुसऱ्या एका प्रसंगी तिला हिंदुधर्माची उपमा देऊन हिंदुधर्मात ज्याप्रमाणे अनेक विचारांचे गट आढळतात तसे ते काँग्रेसमध्येही आढळणारच असे म्हटले आहे.[३५] राष्ट्रीय सभेचे हे स्वरूप पुढे सतत अजूनपर्यंत कायमच राहिले हे ध्यानात घेतले पाहिजे. कालांतराने मवाळ राष्ट्रीय सभेतून बाहेर गेले. पुढे स्वतःस टिळकांचे अनुयायी म्हणविणारेही बाहेर पडले. तथापि राष्ट्रीय सभेचे हे स्वरूप मात्र त्या योगाने बदलले नाही. "दोघांच्या कृतींत फरक असला तरी हेतु एकच असल्यामुळें दोघांनींही

सलोख्यानें वागलें पाहिजे; आणि हाच न्याय राजकीय बाबतींत सध्या चळवळ करणाऱ्या जुन्यानव्या पक्षांस लागू केला पाहिजे."[३६] असा टिळकांचा आग्रह होता.

१९०८ साली टिळकांवर दुसरा राजद्रोहाचा खटला झाला; आणि सहा वर्षांचा तुरुंगवास पुरा करून १९१४ च्या जूनअखेरीस ते मंडालेहून सुटून पुण्यास आले. या वेळेपर्यंत दरम्यानच्या काळात राष्ट्रीय पक्षाची मंडळी काँग्रेसमधून बाहेर पडण्याच्या बेतात होती. मवाळांच्या प्रयत्नांमुळे १९१४ च्या काँग्रेसच्या अधिवेशनाचे लजपतराय अध्यक्ष होऊ शकले नाहीत. यामुळे त्या मद्रास काँग्रेसच्या अधिवेशनास पंजाबमधून एकही प्रतिनिधी हजर नव्हता. मवाळांनी इतरांना आत येऊच द्यायचे नाही असा पवित्रा घेतला त्यास उद्देशून टिळकांनी, "ज्यांत दुसऱ्या पक्षाचा समावेश होऊं शकत नाहीं अशा मजलसीस राष्ट्रीय म्हणणें गैरशिस्त होय असें उघड होतें"[३७] असे म्हटले. राष्ट्रीय म्हणजे सर्व प्रकारचे विचार असणारांचा प्रातिनिधिक समुदाय अशी सर्वसंग्राहक कल्पना पुनः एकदा प्रकट झाली.

टिळक आणि गोखले यांच्यात समेट घडवून आणण्याचे प्रयत्न बेझंटबाईंनी केले, पण ते यशस्वी झाले नाहीत. या संदर्भात गोखल्यांनी लिहिलेल्या एका पत्रात समेट होण्याच्या मार्गातील एक अडचण म्हणून टिळक हे "सरकारला बहिष्कार टाकणारे" आहेत असे म्हटले होते. या पत्राविषयी बराच वाद झाला. कारण, आपण सरकारला बहिष्कार टाकावा असे कधीच म्हटले नाही, असे उत्तर बेझंटबाईंनी खुलासा विचारला असता टिळकांनी दिले. या विधानासंबंधीच वाद होता; आणि तो शब्दांच्या मोघम उपयोगामुळे वाढला. परंतु टिळकांच्या राजकीय कार्यासंबंधी विचार करताना त्याचे महत्त्व मर्यादित आहे. या वादात सरकारवरील बहिष्काराच्या १९०७ सालच्या मुद्याचा पुनरुच्चार झाल्याकारणाने आपली भूमिका स्पष्ट करण्यासाठी टिळकांनी 'हिंदी स्वराज्य संघ' ही एक लेखमाला लिहिली. या लेखनाचा सारांश असा : स्वराज्य म्हणजे इंग्रजनिरपेक्ष स्वराज्य नसून...स्वराज्यातील अंतर्व्यवस्था लोकांच्या तंत्राने चालावी हे त्यातील बीज होय. त्यासाठी हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थेचे इंपिरियल आणि प्रॉव्हिन्शियल—बादशाही आणि प्रांतिक—असे दोन भाग सुचवून प्रांतांतील अंतर्व्यवस्था लोकमताने चालवावी असे त्यांनी सुचविले. हिंदुस्थान हा साम्राज्याचा एक भाग आहे व हा संबंध कायम राहाणारच. तथापि, त्यासाठी सेक्रेटरी ऑफ स्टेट आणि त्यांचे कौन्सिल यांचे स्वरूप बदलले पाहिजे. हे कौन्सिल सध्या दोन प्रकारची कामे करते : (१) हिंदुस्थानची आणि साम्राज्याची साखळी जोडणे, आणि (२) हिंदुस्थानच्या कारभाराचे धोरण ठरविणे. यांपैकी दुसरे कार्य हिंदुस्थानातच लोकमताच्या आधाराने व्हावे, अशी त्यांची सूचना होती. प्रांतिक व्यवस्थेच्या बाबतीत गव्हर्नर व अधिकारी वर्ग यांचे अधिकार काढून लोकांस

दिले पाहिजेत, कारण "स्वराज्याची मागणी म्हणजेच अधिकारी वर्गाची सत्ता कमी करणे होय." प्रांतिक कारभार लोकमतानुसार चालणे हे स्वराज्याचे एक मुख्य अंग आहे. आणि त्याबरोबरच हिंदुस्थानच्या कारभाराचे धोरण ठरविण्याची जबाबदारी हिंदुस्थानच्या कार्यकारी कौन्सिलवर टाकून त्यांतील निम्मे सभासद तरी लोकनियुक्त असले पाहिजेत, असा कायद्यान्वये निर्बंध घालण्यात यावा. त्याबरोबर हिंदुस्थानचे कायदेकौन्सिल मात्र सर्वस्वी लोकनियुक्त करून त्याकडे बजेट मंजूर करण्याचा अधिकार देण्यात यावा. या लेखमालेत आणखी काही प्रश्न काढण्यात आले. एक म्हणजे प्रांताप्रांतांचे विभाग हल्ली आहेत तसेच ठेवावे किंवा लोक जी भाषा बोलतात तिच्या अनुरोधाने निराळे भाग पाडावे हा; आणि दुसरा प्रश्न ग्रामसंस्थांचे पुनरुज्जीवन आणि जिल्ह्याजिल्ह्यासाठी स्वतंत्र कौन्सिले नेमणे हा होय. "पण आमच्या मतें हे दोन्ही प्रश्न हिंदी स्वराज्याच्या घटनेच्या कायद्यांत येऊं शकत नाहींत. हिंदुस्थानांतील प्रांतांच्या मर्यादा ठरविण्याचा अधिकार हल्लींच हिंदुस्थान सरकारकडे आहे व पुढेंही अर्थातच तो त्याजकडेच राहील. त्याकरितां निराळा कायदा नको आहे."[३८] स्वतंत्र भारताच्या राज्यघटनेत नेमकी हीच भूमिका घेण्यात आली आहे, हा टिळकांच्या राजकीय द्रष्टेपणाचा एक उत्कृष्ट पुरावा होय.

१९१७-१८च्या सुमारास बव्हंशी होमरूल-चळवळीमुळे काँग्रेसमध्ये पुनः जहाल पक्षाची सरशी होऊ लागताच मवाळांनी काँग्रेसबाहेर पडण्याचा निर्णय घेतला. ह्या घटनेस अनुलक्षून टिळक लिहितात, "सर्वस्वीं एकमताच्या माणसांनीं एकजुटीनें काम करण्यास समेटाची कांहीं अपेक्षा नाहीं. समेट घडून यावयाचा तो मुख्यतः ध्येय एक असून, इतर बाबतींत ज्यांचा मतभेद असतो त्यांचाच होय. व्यक्ति तितक्या प्रकृती ही म्हण प्रसिद्धच आहे. पण अनेक प्रकृतींच्या अनेक व्यक्तींनीं एका कार्यासाठी एकत्र होऊन जेव्हां कांहीं गोष्ट ठरवायची असते तेव्हां त्यासाठीं कांहीं तरी नियम किंवा निर्बंध सर्वांसच पाळावा लागत असतो. हल्लींच्या राजकीय पद्धतीप्रमाणें 'बहुमताचा स्वीकार' हाच तो निर्बंध होय; व हा मान्य करून सर्वांनीं आपल्या सामान्य ध्येयाच्या सिद्ध्यर्थ एकत्र व्हावें. आणि कोणत्याही प्रकारचे खाजगी मनोविकार बाजूला ठेवून सर्वांस एकसारख्या प्रिय असलेल्या गोष्टींचा विचार करावा हें राजकीय बाबतींतल्या समेटाचें खरें तत्त्व आहे."[३९] तात्पर्य, या वेळीही पूर्वीप्रमाणेच टिळकांची भूमिका उदार आणि सहिष्णू होती, हे त्यांचे या प्रश्नाबाबतचे लेखन पाहिले म्हणजे स्पष्ट होते.

पहिल्या महायुद्धामुळे प्राप्त झालेल्या संधीचा फायदा, एक म्हणजे लष्करात शिरून युद्धाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्यासाठी, आणि दुसरे म्हणजे राजकीय हक्कांची एकमुखाने मागणी करण्यासाठी, करून घ्यावा असे टिळकांचे आग्रहाचे म्हणणे होते. स्वराज्य-संघाने 'निकरानें एकमुखी मागणी' झाली पाहिजे अशी

भूमिका घेऊन हा प्रश्न 'बहुमताचा नसून एकमताचा' आहे असे त्यांनी बजावले. "स्वराज्य पाहिजे का नको या प्रश्नाच्या उत्तरावर ३१ कोटी लोकांचें कल्याण अवलंबून आहे आणि ते कल्याण साधण्यास सर्वांनीं एकमुखानें, 'स्वराज्य हा आमचा जन्मसिद्ध हक्क आणि तो आम्हांस मिळालाच पाहिजे.' असेंच स्पष्ट उत्तर देणें जरूर आहे."[४०] तथापि मवाळांनी एकत्र राहाण्याचा व एकमुखाने मागणी करण्याचा सल्ला न ऐकल्यामुळे अखेरीस टिळकांना आता "मवाळांचा काल" संपला आहे, यापुढे "नवी विटी, नवें राज्य" हाच दृष्टिकोण ध्यावयास पाहिजे, असे स्पष्ट रीतीने म्हणावे लागले.

पाश्चात्य संस्कृतीच्या व लोकशाही तत्त्वज्ञानाच्या उदारतेचे दर्शन नेमस्तांना झाले होते. राजकीय हक्कांसाठी आपण आपली योग्यता वाढविली पाहिजे, तसे केल्याने इंग्लंडप्रमाणेच येथेही क्रमाक्रमाने राजकीय विकास होऊ शकेल, आपले राजकीय ध्येय आपणांस कोणताही आततायी आंदोलनाचा मार्ग न स्वीकारता गाठता येईल, असा त्यांना विश्वास वाटे. आणि टिळकांच्या राजकीय कर्तृत्वाच्या काळातील जवळजवळ अखेरपर्यंत या विचारसरणीचा पगडा राष्ट्रीय सभेवर होता. तथापि या विचारांची व तत्कालीन राजकीय पार्श्वभूमीची काही वैशिष्ट्ये महत्त्वाची आहेत. एक तर खुद्द ब्रिटनमधील राजकीय विकास कलहावाचून झाला ही समजूत ऐतिहासिक सत्यावर आधारलेली नव्हती. दुसरे म्हणजे राजकीय हक्क मिळविण्यासाठी जर स्वदेशातील प्रस्थापित हितसंबंधांविरुद्धदेखील कित्येक वेळा कलह अपरिहार्य ठरतो तर परकीय राज्यकर्त्यांच्या बाबतीत तर तो कितीतरी अधिक प्रमाणात अटळ ठरणे स्वाभाविक होते. मवाळांच्या ठिकाणी ही जाणीव नव्हती असे नाही; काहींना तरी हे पूर्ण अवगत होते. "सुनियंत्रित परराज्यापेक्षां अव्यवस्थित स्वराज्य बरें" असे गोखले यांचे उद्‌गार प्रसिद्ध आहेत. यामुळे एका अर्थाने टिळक म्हणत त्याप्रमाणे हा भेद स्वभावाचा किंवा साधनांचा होता.

तर मग तो विकोपास का जावा? या प्रश्नाचे उत्तर शोधताना मवाळ-जहालमतभेद म्हणजे गोखले-टिळक-मतभेद या समजुतीतून बाहेर पडले पाहिजे, असे वाटते. इंग्रज राज्यकर्त्यांच्या तत्कालीन धोरणात ते उत्तर काही अंशी सापडू शकेल. निरनिराळ्या धार्मिक, भाषिक, प्रादेशिक, जातीय, आर्थिक इत्यादी गटांत विभागल्या गेलेल्या समाजावर इंग्रज राज्य करीत होता. त्या समाजात राजकीय हक्क मिळविण्याची जाणीव निर्माण होऊ लागताच सरळ निवडणुकीच्या तत्त्वाला मान्यता देऊन लोकप्रतिनिधींना हक्क देण्याऐवजी निरनिराळ्या गटांना अनुकूल करून घेण्याचे धोरण राज्यकर्त्यांनी स्वीकारले. आणि याच धोरणाचा पाठपुरावा त्यांनी १९१७ पर्यंत केला. या धोरणामुळे उच्च व्यावसायिक, जमीनदार, अधिकारी, संस्थानिक या सर्वांना राज्यकर्ते आपल्या म्हणण्याला प्रतिसाद देत आहेत असे वाटे, आणि त्यामुळे कोणतेही आंदोलन राज्यकर्त्यांच्या या धोरणास

बाधक ठरणारे नसावे असे वाटे. मवाळ राजकारणाच्या मुळाशी ब्रिटिश उदार-मतवादाचे आकलन व प्रेम हे जसे होते तसेच राज्यकर्त्यांशी मैत्रीचा सांधा जुळलेले हितसंबंधही होते. सुशिक्षितांच्या संख्येत जो जो वाढ होत गेली तो तो, आणि काही प्रमाणात बदलत्या परिस्थितीमुळेदेखील, असंतोष केवळ वाढत चालला इतकेच नव्हे, तर त्याचा प्रकटपणे आविष्कारही होऊ लागला; आणि यातून जहाल राजकारण फोफावू लागले. हितसंबंधीयांऐवजी हे राजकारण सामान्य जनतेकडे वळले. या राजकारणाचे सर्वश्रेष्ठ नेते म्हणजे टिळक होत. मवाळ-जहाल हा काही खरा महत्त्वाचा भेद नव्हे असे राष्ट्रवादी भूमिकेची जोपासना करण्यासाठी ते म्हणत; आणि त्याबरोबरच हितसंबंधांच्या संरक्षणासाठी राज्यकर्त्यांचा अनुनय करू पाहाणारांची ते प्रसंगी शेलक्या शब्दांनी पूजाही बांधीत.

"लोकमत म्हणजे काय? तें कोणाचें मत समजायचें?" हा सुधारक आणि टिळक यांच्यांतील जुनाच मतभेदाचा मुद्दा होता. तोच पुढे 'मवाळ' आणि 'जहाल' या राजकीय मतभेदांच्या संदर्भात कायम राहिला. टिळकांनी या मतभेदाचे स्वरूप "रावबहादूर रानडे व त्यांचे अनुयायी" या लेखात स्पष्ट केले आहे. ते म्हणतात, "राजकीय व सामाजिक प्रश्न इतके बिकट असतात कीं त्यासंबंधानें निरनिराळीं मतें असणें अगदीं संभवनीय आहे. इतकेंच नव्हे, तर कांहीं अंशीं जरूरही आहे. ईश्वरप्राप्तीचा अमुक एक मार्ग आहे असें सांगणें जितक्या धोक्याचें आहे तितकेंच एखाद्या बिकट राजकीय प्रश्नासंबंधानें अमुक व्यवस्था झाली तरच ती राष्ट्रास हितप्रद होईल असें म्हणणें हें होय...आमच्या सुधारकांस ही गोष्ट कळत नाहीं किंवा जाणूनबुजून तिचा ते अव्हेर करतात ही त्यांची चूक आहे. संख्येचा व अकलेचा जर कांहीं संबंध नाहीं व जर शाळेंतलीं पोरेंसोरें, तेलीतांबोळी, उदमीव्यापारी, भटेंभिक्षुकें व कांहीं खातेपिते आणि लिहिणारे व वाचणारे यांची आमच्या खर्डेघाशा, पोरेहाकू सुधारकांस कांहीं किंमत नाहीं; तर मग राष्ट्रीय सभेसारख्या मोठमोठ्या सभा तरी कशास पाहिजेत? कायदेकौन्सिलें, सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा, उदीमधंदे, शेतकी इत्यादि विषयांवर रावबहादूर रानडे वगैरे कांहीं थोर व हुशार गृहस्थ व त्यांचे अनुयायी यांच्या सहीचा एक अर्ज सरकारकडे पाठविला म्हणजे झालें. परंतु असा प्रकार जोंपर्यंत चालत नाहीं तोंपर्यंत खातेपिते लोकांचा अभिप्राय हीच आपल्या मताची प्रतीति पाहाण्याची कसोटी आहे हें प्रत्येकानें प्रांजलपणें कबूल केलें पाहिजे."[४१] ही भूमिका घेऊन टिळक राष्ट्रीय आंदोलन लोकाभिमुख करण्याचा प्रयत्न करीत होते. त्याचप्रमाणे कायदा व नीती ही एकमेकांपासून दूर गेल्यास प्रसंगी कायदा मोडावाही लागेल असे म्हणताना त्यांचा मूल्यविषयक दृष्टिकोण व्यक्त झाला होता. परकीय राजवटीविरुद्ध जहाल भूमिका घेताना मवाळांच्या भूमिकेतील मूल्यविचार टिळकांनी दुर्लक्षिला नाही, हे आम्ही विसरता कामा नये. टिळकांनी घालून दिलेल्या उदाहरणाचे व कसोटीचे आजही आपण पालन करीत आहोत,

व करणे इष्टही समजतो. आजही सार्वत्रिक मतदानाच्या हक्काची टीका करणारे किंवा त्याचे तात्कालिक दुष्परिणाम रंगवून सांगणारे आपणात नाहीतच असे नाही. परंतु या योगाने आजच्या लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास ढळता कामा नये. लोकमान्यांची ही एक महत्त्वाची शिकवण आहे व आजही ती मार्गदर्शन करू शकेल.

लोकमान्य टिळकांनी केवळ स्वराज्याची घोषणा केली, तो "माझा जन्मसिद्ध हक्क असून मी तें मिळविणारच" असा राष्ट्रीय स्वातंत्र्याचा मंत्र सर्वांना दिला आणि ते प्राप्त करण्यासाठी तीव्र आंदोलनाची पार्श्वभूमी तयार केली इतकेच नव्हे तर पुढील काळातील राष्ट्रीय आंदोलनाला आकार देणारे आणि राष्ट्रवादाचे स्वरूप निश्चित करणारे वैचारिक धनही त्यांनी निर्माण केले, असे म्हणता येईल. टिळकांच्या विपुल लेखनाचा थोडासा सूक्ष्मतेने विचार केल्यास त्यात एक निश्चित स्वरूपाची विचारसरणी आढळते. भारतीय राष्ट्रवादाचे स्वरूप तिच्यामुळे बरेचसे घडले गेले आहे. या विचारसरणीचे स्थूल विवेचन आता करायचे आहे.

टिळकांनी राष्ट्रीय आंदोलनाला लोकाभिमुख केले हे त्यांच्या जहाल भूमिकेचे एक वैशिष्ट्य होते. देशातील बहुसंख्य लोक अज्ञानी व जात, धर्म, प्रदेश, भाषा इत्यादींच्या मर्यादित चौकटीत राहाणारे, अनेक निरनिराळ्या गटांत विभागलेले. अशा परिस्थितीत सर्वांना एका सामान्य हेतूसाठी एकत्र आणणे ही पहिली महत्त्वाची गरज होती. हे इंग्रजी राज्यामुळे शक्य झाले आहे ही गोष्ट टिळकांनी ओळखली होती. ते म्हणतात, "हिंदुस्थानांत ज्या कांहीं लढाऊ जाती होत्या त्यांच्यामध्यें ऐक्य नसल्यामुळें, अथवा दुसऱ्या कांहीं कारणांनीं, आज हिंदुस्थानांत एका मोठ्या शहाण्या व प्रबळ राष्ट्राची सत्ता स्थापन झाली आहे. हें राज्य स्थापण्यास सुरवात झाल्यापासून कित्येक ठिकाणीं शंभर तर कित्येक ठिकाणीं पाऊणशें वर्षें इंग्रजी मुत्सद्यांनीं त्याचें दृढीकरण करण्यांत घालविलीं. आजमितीस सर्व हिंदुस्थानवर इंग्रजांची जी सार्वभौम सत्ता चालू आहे ती या प्रयत्नांचें फळ होय. मराठे, रजपूत, मुसल्मान, शीख, बंगाली आणि मद्रासी इत्यादि सर्व जाती एका राज्यकर्त्यांच्या अंमलाखालीं आतां बहुतेक मोकळ्या मनानें व्यवहार करूं लागल्या आहेत. निरनिराळ्या जाती जिंकल्यानें इंग्रज सरकारचें काम झालें असें कोणी समजूं नये. त्या सर्व जाती एकवटून त्यांस एकराष्ट्रीयत्व यावें असा इंग्रज राज्यकर्त्यांचा अखेर हेतु आहे व ही गोष्ट हल्लींच्या राज्यांतच घडून येणें शक्य आहे."[१] त्या वेळचे हिंदुस्थानचे अंडर-सेक्रेटरी मिस्टर रसेल यांचे हे उद्‌गार टिळकांनी पूर्णपणे मान्य केले. हिंदुस्थानात राज्यकर्ते व प्रजा असे दोनच वर्ग टिळक पाहात. "पूर्वीच्या काळीं हिंदु, मुसल्मान, शीख ह्यांपैकीं कोणाच्याही मनांत असले (आमचें पुढें

काय होणार?) विचार आले असतां जो तो आपापल्या जातीपुरतें पाहात असे परंतु तसा विचार हल्लीं आपणांस करतां येत नाहीं—सर्व जातींच्या व धर्मांच्या लोकांस जें कांहीं करणें असेल तें त्यांनीं एकदिलानेंच केलें पाहिजे. मग कोणाचें सामर्थ्य कमी असो किंवा कोणाचें जास्त असो, तो भेद लक्षांत घ्यावयाचा नाहीं. इंग्रजी राज्यानें हिंदुस्थानांतील सर्व जातींच्या लोकांची एक मोळी केली आहे व त्या मोळीचे बंध तुटून पुन्हां त्यांतील लांकडें निरनिराळीं होऊं नयेत अशी व्यवस्था करण्याचें सामर्थ्यही त्यांच्यांत आहे."[२]

१८५७ च्या बंडानंतर "अंग, वंग, मद्र, महाराष्ट्र इत्यादि छप्पन्न देशांचे लोक एका राज्यचक्रामध्यें सांपडले आहेत. या सर्वांवर प्रायः एकाच शिस्तीचा अंमल होत आहे; राज्यकारभाराची शिस्त एकाच प्रकारची आहे; विद्येचें वळण एकाच धाटणीचें आहे. थोड्याबहुतानें आपण सर्वजण—ज्यांस विचार प्रकट करण्याची, नमूद करण्याची व समजून घेण्याची धारणाशक्ती आली आहे असे लोक—एकाच भाषेमध्ये आपले विचार प्रकट करूं लागलों आहोंत. रीतीभातीही एकस्वरूप होऊं पहात आहेत. सारांश, एका अकबराखेरीजकरून मोंगलांचे मनांत ज्याचा विचार कधींही आला नाहीं व पेशव्यांस जें साधलें नाहीं त्या एकराष्ट्रीयत्वाचें बीज आमच्या फलद्रूपी आर्यमनोभूमीवर परकीयांच्या श्रमानें रुजविलें जात आहे."[३]

इंग्रजांच्या ह्या कामाचा गौरवपूर्वक उल्लेख करीत असतानाच टिळकांनी आत्मनिरीक्षण करून आमच्या दोषाचाही स्पष्ट उल्लेख केला. "पाश्चिमात्य राष्ट्रांतील प्रजेप्रमाणें हिंदुस्थानांतील लोक एकराष्ट्रीयत्वाच्या कल्पनेनें प्रेरित होऊन आपापल्या हक्कासाठीं जर एकीनें भांडणारे असते तर इंग्रज सरकारचें राज्यही या देशावर झालें नसतें आणि कॉंग्रेसची पण जरूर पडती ना! निरनिराळ्या प्रांतांत किंवा जातींत व्यक्तिशः विद्वान, कर्ते आणि समंजस पुरुष आमच्यांत उत्पन्न झाले नाहींत किंवा होत नाहींत असें नाहीं; परंतु कांहीं कारणामुळें एकराष्ट्रीयत्वाची कल्पना सर्वांच्या मनांत जितक्या जोरानें जागृत असावी तितकी अद्याप असूं लागली नाहीं, आणि या दोषापासून कॉंग्रेसचे पुढारीही सामान्यतः अगदीं अलिप्त आहेत असें नाहीं."[४] तथापि हा दोष दिसत असला तरी त्यावर टिळकांना उपाय दिसत नव्हता. "कांहीं कारणामुळें" एकराष्ट्रीयत्वाची कल्पना रुजत नाही असे त्यांचे म्हणणे. ते कारण दिसत नव्हते. असे का व्हावे? याचे उत्तर सामाजिक सुधारणेचा मार्ग त्यांनी त्याज्य ठरविला हे होय. सुधारणा तूर्त नको असे म्हणणे म्हणजे सामाजिक समीक्षा तूर्त नको असे होते. त्यामुळे टिळकांच्या विचारांना स्वाभाविकच मर्यादा निर्माण झाल्या आणि त्यांच्या सुसंगतीला तडा गेला.

सामाजिक समीक्षेचा मार्ग सोडला तरी दुसरा मार्ग शोधणे आवश्यक होतेच. या संदर्भात इंग्रजी राज्य या देशावर का झाले या प्रश्नाचे उत्तर शोधण्याऐवजी

ते कसे घालविता येईल याचा विचार सुरू झाला. ते घालविणे किंवा राजकीय हक्क प्राप्त करून घेणे हे सर्व भेदाभेद तात्पुरते विसरून किंवा बाजूला ठेवून सर्वांचे सामान्य उद्दिष्ट बनले पाहिजे असा तो मार्ग होता. राष्ट्रीय सभा हेच या मार्गाचे साधन आहे. हिंदुस्थानातील सर्व जातींच्या, सर्व धर्मांच्या व सर्व प्रांतांतल्या लोकांस एकदिलाचे आणि एकविचाराचे करणे हे राष्ट्रीय सभेचे मुख्य कर्तव्य होय, असे टिळकांचे म्हणणे होते. आपण सर्व सारखेच बद्ध आहोत, गुलाम आहोत; आमचे सारे जीवनच राज्यकर्त्यांनी जखडून टाकले आहे; यामुळे आम्ही आता एकत्र येऊन एकमुखाने हक्कांची मागणी केली पाहिजे, त्यासाठी आंदोलन उभारले पाहिजे;—हा विचार साहजिकच निघाला. आज प्रत्यक्षात असलेले भेदाभेद इष्ट की अनिष्ट, ते ठेवावेत की नाहीसे करावेत, हा मुद्दा गौण झाला. ते नाहीसे करून लोकांना एकत्र आणण्याऐवजी ते असले तरी राजकीय हक्कांसाठी सर्वांना एकत्र आणणे अधिक सुलभ आहे, असा युक्तिवाद करण्यात येऊ लागला.[५] अशा प्रकारे सर्व प्रकारचे भेदाभेद कायम राहून केवळ सामान्य उद्दिष्ट गाठण्यासाठी एकत्र येणे हे भारतीय राष्ट्रवादाचे एक महत्त्वाचे वैशिष्ट्य बनले. कालांतराने या कल्पनेचाच विकास होऊ लागला, आणि या वैशिष्ट्याला सामान्य शत्रूमुळे पक्केपणा आला. टिळकांनी अशा प्रकारे भारतीय राष्ट्रवादी विचारसरणीचा पाया घातला.

तथापि अशा प्रकारचे ऐक्य घडवून आणणे सोपे नव्हते. अशा ऐक्याचे एका अर्थाने १८५७ सालानंतर कोणतेही उदाहरण दिसत नव्हते. उलट, त्यानंतर हिंदू व मुसल्मान या दोघांनीही राजनिष्ठेची भूमिका घेतल्याने त्यांना शक्य तो एकत्र येऊ न देणे हे राज्यकर्त्यांचे प्रमुख धोरण बनले होते. नवे शिक्षण प्राप्त करण्यात हिंदूंनी आघाडी मारली. सरकारी नोकऱ्या, जमीनमहसूल गोळा करणे, न्यायदानाच्या वा शासकीय क्षेत्रांतील महत्त्वाची स्थाने आणि लष्करी हुद्द्याच्या जागा इत्यादी सर्व क्षेत्रांत मुसल्मान समाज हिंदूंच्या मानाने मागे पडू लागला. आपणही या भूमीचे जेते आहोत, एके काळी येथे राज्य केले आहे, ही जाणीव मुसल्मानांत असल्यामुळे त्यांचा अभिमान नव्या परिस्थितीत दुखावला होता. परंतु सामाजिक जीवनाच्या व राजकीय संघटनेच्या ज्या नव्या कल्पना इंग्रजी शिक्षणामुळे येथे येत होत्या त्यांच्या संदर्भात लोकसंख्येच्या अवघे ३१ टक्के असलेल्या मुसल्मानांत सुरक्षिततेची भावना निर्माण होणे कठीण होते. यामुळे त्यांच्यांत आत्मनिरीक्षणाची भावना जागृत होऊ शकली असती; नाही असे नाही. परंतु इंग्रजांनी दिलेल्या संरक्षणामुळे वा उत्तेजनामुळे तो संभव नाहीसा होऊन त्याची जागा स्वत्वाच्या जाणीवेने व अभिमानाने घेतली. आणि त्याबरोबरच हिंदूंशी सुरू असलेल्या स्पर्धेत निभाव लागावा म्हणून मुसल्मानांत आधुनिक शिक्षणाचा प्रसार होण्यासही आरंभ झाला. मुसल्मानांनी राष्ट्रीय सभेत सामील होण्याची गरज नाही, तशीच निराळी संघटना काढण्याचीही गरज नाही;

युरोपियन लोकांचे साहाय्याने त्यांनी आपल्या हक्कांसाठी मागणी करावी आणि हिंदू लोकांविरुद्ध सरकारास साहाय्य करावे;—असा सल्ला त्यांना अलिगढच्या मुस्लिम कॉलेजच्या प्रिन्सिपॉलांनी दिला. इंग्रज मुसलमानांचा कसा उपयोग करीत याचे हे एक नमुनेदार उदाहारण होते. पण त्यासंबंधी टिळकांनी "राज्यकर्ते व प्रजा हा मुख्य भेद आहे, व त्याच्यापुढें हिंदु-मुसलमानादि सर्व भेद रद्द होत." अशी टीका केली व चाणाक्ष मुसलमानांच्या हे सहज लक्षांत येईल अशी आशा व्यक्त केली.[६]

ही भूमिका तत्कालीन परिस्थितीतसुद्धा कितपत समाधानकारक होती हा एक प्रश्नच आहे. बेक यांच्या भाषणावरील टिळकांचा लेख हा १८९४ सालचा आहे. तत्पूर्वी सय्यद अहमद खान यांनी मुसलमानांसाठी आधुनिक शिक्षणाचा पुरस्कार केला होता. राजनिष्ठेची भूमिका निःसंदिग्धपणे घेतली होती. १८८३ साली स्थानिक-स्वराज्यासंबंधीच्या बिलाबाबत प्रतिक्रिया व्यक्त करताना त्यांनी निवडणुकीच्या तत्त्वावरच हल्ला चढविला होता. जिथे एकाच वंशाचे किंवा धर्माचे लोक राहातात तिथे बहुमताचे राज्य ही निवडणुकीच्या तत्त्वावर आधारलेली कल्पना ठीक आहे. परंतु जेथे जातिभेद कायम आहेत, धार्मिक भेदाभेद हिंसक स्वरूप धारण करतात, निरनिराळे सामाजिक गट एकजीव झालेले नाहीत, सर्व गटात शिक्षण सारखेच पसरलेले नाही किंवा सर्वांची सारखीच प्रगती झालेली नाही, अशा समाजात निवडणुकीच्या तत्त्वाचा शुद्ध स्वरूपात आश्रय केल्याने अनेक दुष्परिणाम होऊ शकतात. मोठी जमात लहान जमातीच्या हितसंबंधांकडे दुर्लक्ष करील, आणि जातीजातींत वैमनस्य निर्माण करणारे कायदे सरकार करते म्हणून सरकारविरुद्ध असंतोष पसरेल, असे त्यांचे म्हणणे होते. १८८५ साली राष्ट्रीय सभा स्थापन झाली. त्याच वर्षी नॅशनल मोहमेडन असोसिएशनच्या एका अर्जाला उत्तर देताना, शिक्षणाकडे दुर्लक्ष केल्यामुळे मुसलमान चढाओढीच्या परीक्षांत मागे पडतात व त्यांचे नोकऱ्यांतील प्रमाण कमी होते; यावर त्यांना खास सवलती देणे हा उपाय नसून त्यांनी आपला शैक्षणिक दर्जा सुधारणे हाच खरा मार्ग होय, असे सरकारने म्हटले. १८८७ साली सय्यद अहमद खान यांनी राष्ट्रसभेवर टीका करून चढाओढीच्या परीक्षा घेऊन नोकऱ्या देण्याची पद्धती अन्याय्य ठरेल असा इषारा दिला, आणि निवडणुकीच्या कल्पनेवर पुन्हा हल्ला चढविला. "हिंदूंना चार मतें तर आम्हांला एकच आहे" ही त्यांची मुख्य भीती होती. म्हणून व्हाइसरॉय यांच्या कार्यकारी मंडळाची पुनर्घटना करायची झाल्यास, निम्मे सभासद मुसलमान आणि निम्मे हिंदू असावेत असा नियम करावा आणि मुसलमान व हिंदू यांनी आपापले प्रतिनिधी निवडावेत असे त्यांनी सुचविले. आणि १८८८ साली तर हिंदुस्थानात दोन राष्ट्रे आहेत; ही दोन्ही इंग्रज गेल्यास अधिकारपदावर येऊ शकणार नाहीत; एका राष्ट्रास दुसऱ्यावर विजय मिळवावा लागेल; असा आपापसातील लढा सुरू झाला की तिसरे प्रबळ राष्ट्र या भूमीवर

हल्ला करील; म्हणून इंग्रजच येथे कायमचादेखील राहाणे इष्ट होय;—असा अभिप्राय त्यांनी व्यक्त केला होता.[७]

टिळकांची या विचारसरणीला काय प्रतिक्रिया होती हे आता थोडक्यात पाहू. मुंबईचे लॉर्ड बिशप यांच्या एका भाषणाच्या संदर्भात १९०१ साली लिहिताना टिळक म्हणतात की, राष्ट्रीयत्वाची कल्पना, तिचा प्रसार व सिद्धी यांत "स्वधर्म, स्वभाषा, स्वदेशाभिमान व पूर्वेतिहासस्मरण" यांचा समावेश होतो. "तथापि समानहितत्व हे राष्ट्रीयत्वाची कल्पना सिद्ध होण्याचे प्रत्यक्ष कारण होय; व स्वधर्मप्रीति वगैरे दुय्यम प्रकारची होत...म्हणजे हिंदुस्थानांतील निरनिराळ्या जातींतील लोकांमध्यें जर यापुढें केव्हां राष्ट्रीयत्वाची कल्पना उत्पन्न होऊन ती प्रबल होण्याचा संभव असेल तर महाराष्ट्रीयांनीं त्याचप्रमाणें इतर लोकांनीं स्वधर्म, स्वभाषा व आपला पूर्वेतिहास वगैरेंविषयींची प्रीति बाळगून सर्वांस समान असे जे राजकीय हक्क ते मिळवण्यास उद्युक्त झालें पाहिजे....हिंदुस्थानांतील लोकांस अंगीं राष्ट्रीयत्व येण्यास पाहिजे असेल तर त्यांनीं स्वधर्मप्रीति बाळगावयाची सोडून वरती धर्मांतरही केलें पाहिजे असें सांगणारे कोणी विद्वान् गृहस्थ कधीं निपजतील असें आमच्या स्वप्नींही आलें नव्हतें."[८] हे शेवटचे वाक्य मुंबईच्या खिस्ती धर्मगुरूंना उद्देशून त्यांनी लिहिले आहे; कारण त्यांनी "हिंदुस्थानांतील लोक मनानें खिस्ती असूनही बाप्तिस्मा घेत नाहींत याचें कारण धर्म व राष्ट्रीयत्व यांचा संबंध हें होय," असे म्हटले होते. या संदर्भात, "हिंदु आणि मुसल्मान लोकांस आपल्या राष्ट्रीयत्वाचा पाया आपापल्या धर्मांवरच रचला गेला पाहिजे असें वाटतें हें खरें आहे."[९] अशी मान्यताही टिळकांनी दिली.

असे जर आहे तर एक जमात दुसरीला जिंकण्याचा, तिच्यावर वर्चस्व गाजविण्याचा प्रयत्न करील, यादवी माजेल; इंग्रजाला घालविण्याचा प्रयत्न केल्यास दुसऱ्या कोणातरी परक्याचे फावेल त्याचे काय?—या प्रश्नाचे उत्तर अंशतः "समानहितत्व हें राष्ट्रीयत्वाची कल्पना सिद्ध होण्याचें प्रत्यक्ष कारण होय व स्वधर्मप्रीति वगैरे दुय्यम प्रकारचीं होत." या टिळकांच्या विधानात आढळते. तथापि समानहितत्वापुढे धर्म दुय्यम मानावा हे अंशतःच ठीक होते. आणि इंग्रजी राज्य घालविणे हेच मुळी मुसलमानांना हिताचे वाटत नव्हते याचे काय? या प्रश्नाचे उत्तर टिळकांनी दोन वर्षांपूर्वी म्हणजे १८९९ साली दिले होते. स्थानिक स्वराज्याबाबत निवडणुकीच्या तत्त्वाला मुसल्मानांकरवी होणाऱ्या विरोधाला हे उत्तर असले तरी त्याला अगदी उघड व्यापक अर्थ होता. "स्थानिक कमिट्यांतून मुसल्मान लोक हिंदू लोकांकडून निवडून येत नाहींत ही गोष्ट खरी आहे. पण त्यास खरा उपाय म्हटला म्हणजे मुसल्मान लोकांची जेथें बरीच वस्ती आहे तेथें त्यांच्या संख्येच्या मानानें त्यांस आपला मेंबर निवडून देण्याचा हक्क देणें हाच होय."[१०] अशा प्रकारे खास प्रतिनिधित्वाला किंवा विभक्त मतदारसंघांच्या मागणीला टिळकांनी १८९९ सालीच पर्यायाने मान्यता दिली होती, असे

म्हणण्यास प्रत्यवाय नसावा.

पण यामुळेही कार्यभाग पुरा होत नव्हता. विभक्त व खास मतदारसंघांतून प्रतिनिधी निवडले तरी त्यांची संख्या ही अखेरीस लोकसंख्येच्या प्रमाणाहून फारशी भिन्न असणे शक्य नव्हते. सय्यद अहमद खान यांनी ५० : ५० टक्क्यांचा उपाय सुचविला होता. तो मान्य होणे उचित नव्हते. तथापि याच विचारसरणीतून पुढे लखनौ-करारातील प्रांताप्रांतामधील टक्केवारीची प्रमाणे निघाली, आणि टिळकांना तो करार मान्य होता. परंतु आरंभी हा प्रश्न सोडवणे जवळजवळ अशक्यच वाटावे अशी स्थिती होती; आणि शेवटी ते अशक्य झालेही. अर्थात या दोन्ही विधानांची पार्श्वभूमी म्हणजे एकराष्ट्रीयत्वाच्या संदर्भात निवडणुकीच्या तत्त्वावर राज्यव्यवस्थेची उभारणी करणे ही होय, हे विसरता कामा नये. म्हणून या बाबतीत टिळकांनी, वेगळ्याच म्हणजे राज्यव्यवस्थेच्या आराखड्याऐवजी प्रत्यक्ष कार्यपद्धतीच्या संदर्भात, मौलिक विचार मांडले आहेत. आजही ते मार्गदर्शक ठरू शकतात, असे मला सुचवायचे आहे.

गोरक्षणाची चळवळ जातीय म्हणजे हिंदु-मुसलमानांच्या दंग्याला जबाबदार आहे, असा एक आक्षेप मुंबईच्या दंग्याबाबत 'टाइम्स ऑफ इंडिया'ने घेतला होता. त्यास उत्तर देताना टिळकांनी राज्यकर्ते व लोक दोहोंनाही वर्तनाचे काही मौलिक नियम सांगितले आहेत. ते केवळ त्या काळीच महत्त्वाचे होते असे नाही; अजूनही त्यापासून आवश्यक व उपयुक्त मार्गदर्शन मिळू शकेल असे वाटते. टिळक म्हणतात, "मोंगलाईंत अगर पेशवाईत ज्याप्रमाणें अनुक्रमें मुसल्मानधर्माची व हिंदूधर्माची सरशी होण्यास मुसलमान अगर हिंदू लोक प्रयत्न करीत असत तसे दिवस आतां राहिले नाहींत हें दोन्ही धर्मांतील लोकांस आतां पूर्णपणें समजलें आहे....प्रस्तुतचे राज्यकर्ते हे हिंदूहि नाहींत व मुसलमानहि नाहींत, करितां त्यांस धर्मांसंबंधाने औदासीन्य स्वीकारणें भाग पडलें आहे व हें औदासीन्य धरल्यामुळेंच त्यांच्या राज्याचा गाडा आतां पाऊणशेंऐशीं वर्षें सुरळीत चालला आहे. सारांश, धारवाडी काट्यांत घातल्याप्रमाणें समतोल एका मापानें हिंदू-मुसलमानांस जेव्हां न्याय मिळूं लागेल तेव्हांच दोन्ही जातींतील वैमनस्य नाहींसें होऊन त्या सुखानें नांदूं लागतील."[११] "हिंदू व मुसलमान यांतील तंटे जर मिटवावयाचे असतील तर दोन्ही लोकांचे सणवार व उत्सव त्यांस निर्विघ्नपणें करूं देण्यास मदत केली पाहिजे. मुसलमान लोकांनीं हिंदू लोकांच्या मोहोल्ल्यांत गायी मारल्या तर मुसल्मानांस शिक्षा झालीच पाहिजे, व कोणीही हिंदू मुसलमान खाटकाच्या घरांत शिरून दंगा करून गाय सोडवून आणील तर तोही शिक्षेस पात्र धरला पाहिजे."[१२] आणि ही भूमिका घेत असतानाच टिळकांनी दंग्या-बाबत एक अत्यंत महत्त्वाचे सूत्रही सांगितले. हिंदु-मुसलमान दंग्यांत वरवर पाहाता दोनच पक्ष आहेत असा समज होतो. तथापि तो चुकीचा आहे. "प्रत्येक विचारी मनुष्यास असें आढळून येईल कीं हिंदू, मुसलमान आणि सरकार असे तीन

पक्ष घेतल्याखेरीज दंग्याच्या कारणाची नीट उपपत्ति लागत नाहीं."[१३] सरकार या संज्ञेत प्रत्यक्ष दंग्याच्या वेळी शांतता प्रस्थापित करणारी यंत्रणा अभिप्रेत नसून शांततेच्या काळात या दोन पक्षांना सारखाच न्याय देणारी व कोणाही एकाच्या बाजूने कसलाही पक्षपात न करणारी नित्याची राज्ययंत्रणा त्यांना अभिप्रेत होती हे उघड आहे. ही जर निःपक्षपाती राहायची असेल तर ती कोणत्याही विशिष्ट धर्मांविषयी औदासीन्य असलेली व सर्व धर्मांना समान वागणूक देणारी राज्ययंत्रणा हवी. संपूर्ण निःपक्षपातीपणामुळे दोन्ही जमाती सुखाने नांदू शकतात, आणि राज्यही सुरळीत चालू शकते. निःपक्षपाती राज्ययंत्रणा म्हटली की राज्यकर्त्यांचा धर्म ही एक अप्रस्तुत बाब बनते आणि लोकांचे धर्म ही खाजगी बाब होते. यातूनच लोकांच्या वर्तनाबद्दलचा टिळकांनी घालून दिलेला नियम उद्भवतो. धर्म ज्याचा त्याने पाळावा व सर्वांनी तो प्रत्येकास पाळू द्यावा, त्याविषयी आदरबुद्धी व सहिष्णुता बाळगावी, कोणीही कोणाची धार्मिक दृष्ट्या आगळीक करू नये, हा तो नियम. आणि गोरक्षणाचा पुरस्कार करीत असताना गोहत्येचेच उदाहरण घेऊन त्यांनी तो स्पष्ट केला ही गोष्ट त्यांच्या मनाच्या मोठेपणाची एक निश्चित खूण आहे यात शंका नाही. राज्यकर्त्यांचा निःपक्षपातीपणा आणि लोकांची सहिष्णुता व परस्परांच्या धर्मांविषयीची आदरबुद्धी या एकाच नाण्याच्या दोन बाजू होत; एकीवाचून दुसरी परिणामकारक होणे कठीण आहे. टिळकांच्या विवेचनातील ही सूत्रेच आजच्या 'निधर्मी राज्या'ची आधारभूत सूत्रे होत असे का म्हणू नये हा एक प्रश्न आहे.

परंतु टिळकांच्या विचारांतील द्रष्टेपणा याहूनही पुढे गेलेला आढळतो. हिंदु-मुसलमान-प्रश्नाबाबत एके ठिकाणी ते लिहितात, "हिंदूंप्रमाणें मुसलमानांतही परधर्मसहिष्णुता येणें आवश्यक आहे. हिंदू-मुसलमानांत रोटीबेटीव्यवहार होण्याइतकें धर्मौदासीन्य किंवा धर्मौदार्य निदान कधींही होईल असें आमच्या बुद्धीस तरी वाटत नाहीं. निदान हजारपांचशें वर्षें तरी ही गोष्ट होण्यासारखी नाहीं. आणि हजारपाचशें वर्षांपलीकडल्या स्थितीचा आज विचार करीत बसलों म्हणजे मनांत मांडे खात बसण्यासारखेंच आहे. करितां हिंदू-मुसलमान लोकांनीं ज्या नात्यानें एकत्र रहावयाचें तें कांही अंशीं अमेरिकेंत निरनिराळ्या जातींचे, निरनिराळ्या धर्मांचे लोक जसे एकत्र राहतात तशा प्रकारचेंच असले पाहिजे."[१४] तात्पर्य, रोटीबेटीव्यवहाराइतके धर्मौदासिन्य किंवा धर्मौदार्य हे त्यांना गर्हणीय वा आक्षेपार्ह वाटत होते असे नाही; ते त्यांना नजिकच्या भविष्यकाळात अशक्य वाटत होते. परंतु एकत्र राहाण्यासाठी हिंदू-मुसलमानांना त्यांनीं अमेरिकेचे उदाहरण दाखवावे हे फारच महत्त्वाचे विधान आहे. शेकडो वर्षांचा इतिहास असलेल्या व त्यात सतत एकमेकांशी लढलेल्या जमातींना, ज्यांना शेदोनशे वर्षांहून अधिक इतिहासच नाही आणि ज्यांचे वर्तमान अत्याधुनिक असून भावी आशाआकांक्षा हा ज्यांना एकत्र राखणारा दुवा आहे अशा जातीजमातींचा

आदर्श त्यांनी दाखवला आहे. "समानहितत्व हें प्रथम, धर्म दुय्यम" ही राष्ट्रीयत्वाची त्यांची कल्पना अर्थपूर्ण करण्यासाठी आधुनिकतेचा आश्रय करावा असा ह्या मार्गदर्शनाचा अर्थ आहे. दुसरीकडे सामाजिक, राजकीय, आर्थिक प्रगतीच्या बाबतीत जपानचे उदाहरण डोळ्यांपुढे ठेवण्याचा त्यांनी इषारा दिला आहे. टिळक म्हणतात, "धर्मसंबंधीं अथवा सामाजिक दुराग्रहास आम्हीं बळकट धरून बसलों व आम्हांस हितकर असणाऱ्या ज्ञानाचा आमच्या मनामध्यें आग्रहानें प्रवेश करूं दिला नाहीं तर आम्हांस उन्नतावस्था कधींहि येणार नाहीं. जपानी लोकांसारखा आम्हीं दुराग्रह सोडला, सावधपणानें वागलों व जेथें सांपडेल तेथें ज्ञानामृतपान केलें तर आमचे सर्व दोष नष्ट होऊन एका जुटीनें वागण्याची, अधिकारास मानण्याची, मनास इष्ट आळा घालण्याची, साहस व उद्योग करण्याची पात्रता आमचे अंगीं सहजच येणार आहे. युरोपियन राष्ट्रें ज्या मार्गानें आजपर्यंत चालत आलेलीं आहेत, त्या मार्गाचें इष्ट असेल तेथें अवलंबन केल्यास आमचा तरणोपाय आहे, असें प्रत्यक्ष नाहीं तरी परंपरेनें जपानी लोकांनीं आम्हांस दाखविलें आहे."[१५] तात्पर्य, आधुनिकतेचा आश्रय आम्हांस करावा लागेल, ज्ञान हा तिचा गाभा आहे, आधुनिक ज्ञानप्राप्तीवाचून तरणोपाय नाही, ही गोष्ट टिळकांनी ओळखली होती हे निर्विवाद आहे. तथापि ही भूमिका त्यांना याहून अधिक स्पष्ट करता आली नाही यात आश्चर्य नाही. टिळकांची दंग्यांविषयीची उपपत्ती आगरकरांनी मान्य केली नव्हती. हिंदु-मुसलमानांचे सामाजिक व सांस्कृतिक भेद फारच मोठे असल्याकारणाने दंगे होतात, व दोन्ही समाजांत बराच काळपर्यंत सुशिक्षण व सुनीती यांचा प्रसार झाल्याने त्यांच्यात मैत्री निर्माण होईल, असे आगरकरांनी म्हटले आहे.[१६]

हिंदु-मुसलमानांतील वैमनस्याचे दुसरे कारण म्हणजे चढाओढीच्या परीक्षांत हिंदू यशस्वी होत व नोकऱ्यांत त्यांचे प्रमाण लोकसंख्येपेक्षा अधिक होते हे होय. सिव्हिल सर्व्हिसची परीक्षा हिंदुस्थानातही घेण्यात यावी अशी मागणी होई, तिला विरोध करताना केवळ हिंदु-मुसलमानांपुरतेच नव्हे तर सर्व प्रादेशिक भेदांच्या संदर्भात अधिकाऱ्यांकरवी हे कारण देण्यात येई. टिळकांनी या बाबतीत सरकारनेही जे नाकारले ते करण्याची, म्हणजे चढाओढीच्या तत्त्वाला मुरड घालण्याची, तयारी दाखवली होती. "बाबूलोकांस मराठी अंमलदार आवडणार नाहींत, शिखांस बाबू पसंत पडायचे नाहींत, आणि मराठी लोक मुसलमान अंमलदारांचें ऐकावयाचे नाहींत, म्हणून सर्वांवर विलायतेंतून पास होऊन आलेल्या इंग्रज पोरांनींच अंमल करावा हें म्हणणें कितपत यथार्थ अगर न्याय्य आहे हें आम्हीं सांगावयास पाहिजे असें नाहीं...मि० पाल यांनीं असें सांगितलें कीं सिव्हिल सर्व्हिसच्या परीक्षेंत बाबूच फार येण्याची जर सरकारास भीति वाटत असेल तर त्याबद्दल कांहीं नियम करून उमेदवारांची प्रांताप्रमाणें वांटणी करतां येईल. परंतु तेवढ्यासाठीं हिंदुस्थानांत सिव्हिल सर्व्हिसची परीक्षाच घेऊं नये असें

दा. क्र. 90300

म्हणणें अगदीं गैरशिस्त आहे." हें स्पष्ट करून टिळक म्हणतात : "हिंदुस्थान हें एक मोठें खंडच आहे व त्यांत निरनिराळ्या जातींचे पुष्कळ लोक आहेत हें निर्विवाद आहे. पण त्यामुळें हिंदुस्थानांतील कोणत्याही जातीस अगर लोकांस वरिष्ठ प्रतीच्या अंमलदारीच्या जागा देण्यास सरकारनें होईल तितक्या अडचणी घालाव्यात हें अन्यायाचें व एका अर्थानें राजद्रोहीपणाचेंहि आहे असें म्हटलें तरी चालेल."[१७] टिळकांच्या दृष्टीने वरिष्ठ अधिकाराच्या जागा भारतीयांना खुल्या करणे ही खरी महत्त्वाची बाब होती; कोणाचे किती प्रमाण आहे हा प्रश्न दुय्यम होता; आणि अधिकारी वर्गाविरुद्धच त्यांनी लढा उभारला असल्याने राष्ट्रीय पातळीवरील हुद्यांची स्थाने हे राष्ट्रीय ऐक्याचे एक साधन आहे इकडे त्यांचे लक्ष जाऊ शकले नसावे.

सारांश, सामाजिक समीक्षेचा मार्ग सोडल्यानंतर शक्य तो लवकर राजकीय हक्क मिळावेत यासाठी सर्वांचे ऐक्य घडवून आणावे, यांतील संभाव्य कटकटी टाळाव्यात आणि देवाणघेवाणीच्या भूमिकेवरून त्यांच्यांत ऐक्य व सहकार्य निर्माण करावे, असा टिळकांचा प्रयत्न होता. शेवटीशेवटी तर ते या दिशेने पुष्कळच पुढे गेले होते. लखनौच्या राष्ट्रीय सभेनंतर त्यांनी लिहिले की, हिंदु-मुसलमानांचे आणि जहाल-मवाळांचे भांडण ही दोन्हीही "उगवत्या राष्ट्रीय बुद्धीच्या तेजामुळें" वितळून गेली आहेत..."सर्वच लोकांना आता हें निश्चित कळूं लागलें आहे कीं, हिंदी लोकांपैकी कोणत्याही वर्गाच्या हातीं सत्ता आल्यास ती एका दृष्टीनें आपल्याच हातीं आल्यासारखी आहे. अधिकाराच्या जागा वाटेल तर हिंदूंना द्या, वाटेल तर मुसलमानांना द्या, पण आमच्यापैकीं कोणाला तरी त्या द्या. मात्र तुम्हीं यापुढें त्या आपल्या हातीं ठेऊन घेऊं नका, असें ब्युरॉक्रसीला सांगण्याची स्पष्ट तयारी दोघांचीही झालेली आज दिसत आहे. राष्ट्रीय भावनेचें खरें बीज तें ह्यातच आहे, व हें बीज हिंदुस्थानच्या भूमींत आतां पुरतें रुजलें गेलें ह्याविषयीं सरकारासहि फारशी शंका उरेल असें आम्हांला वाटत नाहीं."[१८] राष्ट्रीय आंदोलनाच्या नेतृत्वावर नंतरच्या काळात मुसलमान-धार्जिणेपणाचा आक्षेप घेतला जावा हे आश्चर्य नव्हे काय ? टिळकांनी सांगितलेला 'धारवाडी काटा' राज्यकर्त्यांसाठी होता, हिंदूंसाठी नव्हे. आक्रमक हिंदुत्व ही टिळकांच्या विचारांशी प्रतारणाच नव्हे काय ? अशा आक्रमक भूमिकेची टिळक ही अधिष्ठात्री देवता बनू शकत नाही हे स्पष्ट नाही काय ?

हिंदु-मुसलमान-वादाप्रमाणेच राष्ट्रीय आंदोलनाच्या दृष्टीने दुसरा महत्त्वाचा प्रश्न म्हणजे प्रादेशिकतेचा. राष्ट्रवादाच्या उदयाच्या काळात या निरनिराळ्या प्रदेशांचे वर्णनही राष्ट्रे म्हणून काही वेळा केले जाई. उदाहरणार्थ, टिळकांनी मुंबई इलाख्याचे वर्णन "भिन्नभिन्न भाषा बोलणारे चार प्रकारचे लोक अगर लहान लहान राष्ट्रें" मिळून बनलेला इलाखा असे केले आहे.[१९] छपन्न देशचे लोक आता एकराष्ट्रीयत्वाच्या भावनेने एकत्र येत आहेत,[२०] असे त्यांचे

म्हणणे होते. तथापि याही बाबतीत या दोहोत विशेष भेद आहे हे त्यांना मान्य नव्हते. शिवाजीमहाराजांच्या उत्सवासंबंधी लिहिताना टिळक एके ठिकाणी म्हणतात, "शिवजयंतीचा उत्सव आज राष्ट्रीय नसला तरी तो लवकरच महाराष्ट्रीय होईल, व तो महाराष्ट्रीय झाला म्हणजे त्यास राष्ट्रीयत्वाचें स्वरूप देण्यास फारशी अडचण पडणार नाहीं अशी आमची समजूत आहे. पण यदाकदाचित तो राष्ट्रीय झाला नाहीं तरी महाराष्ट्रीय झाल्यास कांहीं लहान काम झालें असें नाहीं."[२१] प्रांतिकतेचा विचार टिळकांच्या लेखनात महत्त्व पावला होता याची आणखीही काही उदाहरणे देता येतील. प्रांताप्रांताचे वरिष्ठ नोकरीच्या वा हुद्यांच्या जागांबाबत ठराविक नियमानुसार प्रमाण ठरवावे ही त्यांनी मान्य केलेली कल्पना यापूर्वी नमूद केली आहेच. दुसऱ्या संदर्भात आपली स्वराज्याची मागणी निश्चित रूपाने पुढे मांडताना टिळक म्हणतात, "आम्ही जें स्वराज्य मागत आहोंत त्याचा संबंध हिंदुस्थान सरकारापेक्षां प्रांतिक सरकाराशीं विशेष आहे....हिंदुस्थान सरकाराचे हक्क, अधिकार किंवा संबंध लोकांच्या हातीं देणें सरकारास इष्ट वाटणार नाहीं व लोक मागतही नाहींत. स्वराज्याच्या मागणीचा मुख्य मुद्दा प्रांतिक सरकाराच्या अधिकारांबद्दलचा व व्यवस्थेबद्दलचा आहे... प्रांतिक व्यवस्था लोकांच्या हातांत देणें म्हणजेच स्वराज्याला खरी सुरवात करणें होय."[२२] मद्रासमधील आंध्रप्रांतीय व महाराष्ट्रीय यांनी दिलेल्या मानपत्राला उत्तर देताना टिळकांनी भाषावर प्रांतरचनेचा पुरस्कार केला होता, आणि त्यांचा मुख्य भर भारतीय भाषांच्या उपयोगावर होता. "आपण इंग्रजीपेक्षां आपल्या देशी भाषांतूनच लोकांचें मन अधिक चांगल्या रीतीनें वळवूं शकतों. इंग्रजी ही जनतेची भाषा कधींच होऊं शकणार नाहीं. लोकांना जें कांहीं पटवून द्यावयाचें तें त्यांच्या भाषेंतूनच सांगितलें पाहिजे. माझ्या जीवनांतील हें एक महत्त्वाचें कार्य आहे असें मी मानतों; आणि यामुळेंच मी इंग्रजी पत्रांपेक्षा 'केसरी'कडेच अधिक लक्ष दिलें आहे हें मला निक्षून सांगावेंसें वाटतें. परकी भाषा ही या देशाची भाषा कशी होऊं शकेल? देशाच्या निरनिराळ्या विभागांना जोडणारा दुवा म्हणून ती राहणें ठीक आहे...हिंदुस्थान हा कांहीं प्रमाणांत अमेरिकेसारखा होईल. सर्वच आपापल्या भाषांतून व्यवहार करणारीं राज्यें आणि एका भाषेनें सर्वांना जोडणारें संयुक्त राज्य असें त्याचें स्वरूप राहील."[२३]

हिंदू व मुसलमान यांनी जसे गोडीगुलाबीने, एकमेकांची आगळीक न करता, एकत्र राहावे असे टिळकांचे म्हणणे होते त्याचप्रमाणे प्रांतिकतेबद्दलही त्यांची विशिष्ट भूमिका होती. तथापि तिचा विचार करण्यापूर्वी एक गोष्ट मात्र स्पष्ट केली पाहिजे. राष्ट्रीय जाणीव निर्माण करण्याच्या मार्गांतील एक टप्पा म्हणून टिळक प्रांतिकतेचा उपयोग करीत, कारण राष्ट्रीयत्वाच्या आरंभाचा तो काळ होता. प्रांतिकतेचे हे विविध प्रवाह राष्ट्रीयत्वात एकरूप व्हावेत हेच त्यांचे उद्दिष्ट होते. प्रांतीय भावना हे व्यापक राष्ट्रीयत्वाची जाणीव निर्माण करण्याचे एक साधन

होते. ती जाणीव निर्माण होऊन तिचे ऐतिहासिक कार्य पुरे झाल्यानंतर, म्हणजेच स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, पुढे येणारी प्रांतीय भावना ही टिळकांच्या भावनेहून भिन्न आहे असे म्हणावे लागेल. "अंग, वंग, मद्र, महाराष्ट्र इत्यादि छपन्न देशचे लोक" एकत्र येण्याच्या इंग्रजी राज्यामुळे निर्माण झालेल्या सुवर्णसंधीचे टिळकांनी मनःपूर्वक स्वागत केले होते. "मोंगलांच्या मनांत ज्याचा विचार कधींही आला नाहीं आणि पेशव्यांस जें साधलें नाहीं" अशा शब्दांत टिळक या संधीचा उल्लेख करतात. सर्व प्रकारच्या धार्मिक, सामाजिक, भाषिक भेदाभेदांनी भरलेल्या या भूमीला ऐक्याची भावना ही अर्वाचीन इतिहासाची एक अमोल देणगी आहे. आणि आपापल्या प्रदेशांचा विकास साधत असताना ह्या मूलभूत ऐक्यभावनेला तडा जाणार नाही याची दक्षता बाळगणे ही आमची जबाबदारी आहे. टिळकांविषयींच्या कृतज्ञतेच्या भावनेचा तो एक महत्त्वाचा भाग आहे असे मला वाटते.

राजकीय हक्कांसाठी लढा उभारण्याच्या कार्यात गढलेल्या नेत्यांकडून ते हक्क म्हणजे 'स्वातंत्र्य' प्राप्त झाल्यानंतर काय करायचे याबद्दल तपशीलवार विवेचनाची अपेक्षा करणे योग्य होणार नाही. उलट, लढ्याचे नेतृत्व करीत असताना भावी काळाविषयी अशा नेत्यांना काहीच सांगण्याचे कारण पडणार नाही असेही नाही. एखादी अर्थपूर्ण कल्पना, मौल्यिक सूचना वा प्रसंगी अन्यवहार्य योजना किंवा भावी काळात अडचणी वा अनपेक्षित प्रश्न वा कलह निर्माण करणारा विचार ही त्यांच्या प्रतिपादनात येऊ शकतात. अशा वेळी काही गोष्टींस महत्त्व प्राप्त होऊन त्याचे दूरगामी स्वरूपाचे अनिष्ट परिणामही होऊ शकतात. काही वेळा साधने म्हणून उपयोगात आणलेल्या गोष्टी साध्याचे स्वरूप धारण करतात आणि ती साधने उपयोगात आणणारांविषयीच अपसमज निर्माण करू लागतात. टिळकांच्या संबंधीदेखील असे काही अपसमज निर्माण झालेले दिसतात, असे मला वाटते.

स्वराज्यसंपादनार्थ लोकमत तयार करायचे म्हटले की, सभोवतालच्या लोकांत प्रथम जागृती करणे हेच स्वाभाविकपणे इष्ट होते. राष्ट्रीय सभा हीदेखील अशाच जागृतीचा परिपाक होता. ती प्रत्यक्ष अस्तित्वात येण्यापूर्वी पुणे, मुंबई, कलकत्ता, मद्रास इत्यादी ठिकाणी निरनिराळ्या राजकीय संघटना अस्तित्वात आल्या होत्या. ठिकठिकाणच्या राजकीय नेत्यांना वर्षातून एकदा एकत्र आणण्याची कल्पना ही राष्ट्रीय सभेच्या स्थापनेस कारणीभूत झाली होती. या एकत्र येण्याला राजकीय दिशा आरंभापासूनच मिळाली होती. यामुळे अशा प्रसंगी होणाऱ्या विचारविनिमयात सामान्य गरजा, प्रश्न, अडचणी, मागण्या यांना स्थान प्राप्त होणे अपरिहार्य होते. राष्ट्रीयत्वाचा पाया व त्याच्या उदयासाठी अनुकूल वातावरण ही जरी परकीय राजवटीने निर्माण केली असली तरी त्याचा फायदा घेऊन त्या भावनेची जोपासना करणे ही जबाबदारी आमचीच होती. अर्जविनंत्या, मतप्रदर्शन,

आंदोलन इत्यादी मार्ग होतेच; पण त्यांच्या साहाय्याने राष्ट्रीयत्वाची भावना निर्माण करण्याचे साधन म्हणून राष्ट्रसभेची जोपासना झाली पाहिजे व त्या दिशेनेच ती अधिकाधिक कार्यक्षम बनवली पाहिजे, यासाठी सतत तीस वर्षे सर्व प्रकारच्या अडचणींशी सामना देऊन त्यागाने व निष्ठेने प्रयत्नशील राहिलेले नेते म्हणजे लोकमान्य टिळक हे होत. टिळकांनी राष्ट्रसभेला पंडिती तंत्रातून बाहेर काढून राजकीय क्षेत्रात आणले ही त्याची अत्यंत मोलाची कामगिरी आहे. यासंबंधीचे कांही विवेचन जहाल राजकारणाची चर्चा करताना केलेच आहे. आता राष्ट्रसभेच्या विकासाच्या दृष्टीने याबद्दल थोडासा विचार करू.

"आमच्या हिंदुस्थानांत पूर्वी छप्पन देश होते असा इतिहास आहे, पण इंग्रज सरकारच्या सार्वभौम सत्तेखालीं हे छप्पन देश मोडून त्यांचा एकजीव, किंबहुना एकराष्ट्र होण्याचा समय आला आहे, हें राष्ट्रीय सभेवरून जितकें पूर्णपणें व्यक्त होतें तितकें दुसरें कशावरूनही होत नाहीं."[२४] एकराष्ट्रीयत्वाची कल्पना अंमलात आणण्याचे साधन म्हणजे राष्ट्रीय सभा होय,[२५] ही भूमिका घेतल्यानंतर साहजिकच हे साधन प्रभावी करणे आवश्यक होते. आणि टिळक राष्ट्रीय सभेविषयी बोलताना या बाजूवर नेहमी भर देत. "अत्यंत आपमतलबी व चिकट अशा इंग्रज लोकांकडून आपला कार्यभाग साधून घ्यावयाचा असल्यामुळें त्याबद्दलची खटपट अहोरात्र व सर्व बाजूनें झाली पाहिजे हें आमच्या पुढाऱ्यांनीं अगोदर आपल्या मनांत बिंबवणें जरूर आहे....राष्ट्रीय सभेंत ऐकमत्य होण्यापूर्वी-प्रत्येक प्रांतांत, त्यापूर्वी प्रत्येक जिल्ह्यांत, व त्यापूर्वी प्रत्येक खेड्यांत तें झालें पाहिजे. ह्या नैसर्गिक क्रमानें ज्या दिवशीं आमचे प्रयत्न चालू लागतील तेव्हांच आम्हीं राजकीय हक्क भोगण्यास खरोखरच पात्र होऊं व सरकारही आमचें म्हणणें ऐकेल."[२६] आणि सरकारने ते ऐकावे यासाठी राष्ट्रीय सभेचे स्वरूप व कार्यपद्धती यांत बदल होणेही आवश्यक होते. टिळकांनी नेमस्तांच्या कार्यपद्धतीवर टीका करून राष्ट्रीय सभेचे स्वरूप बदलण्याची आवश्यकताही अगदी स्पष्ट रीतीने प्रतिपादन केली होती. १८९५ साली राष्ट्रीय सभेपासून सामाजिक परिषद वेगळी काढल्यानंतर १८९६ साली टिळक म्हणतात, "राष्ट्रीय सभेचे व प्रांतिक सभेचे वक्ते, भाषणें व ठराव आतां बहुतेक 'कायम ठशांचे' झाले आहेत. हे कायमचे ठसे बदलून धुळीच्या पाटीवर जेव्हां हे ठराव जातील तेव्हांच त्यांचा कांहीं खरा उपयोग होईल अशी आमची समजूत आहे. प्रो० गोखले यांनीं ठराव सुचवायचा आणि मिस्टर वाच्छा यांनीं त्यांस अनुमोदन द्यावयाचें हें आमच्या मतें आतां बस्स झालें. जमिनीचा धारा, जंगलें, मीठ, अबकारी वगैरे बाबतींत गरीब रयतेचे काय हक्क आहेत हे त्या रयतेस समजून देण्याच्या उद्योगास आम्ही आतां लागलें पाहिजे. रयतेच्या गरजा इंग्रज लोकांपेक्षां आम्हांस अधिक चांगल्या रीतीनें कळतात हें खरें असलें तरी तें तोंडानें सांगितल्यानें कांहीं उपयोग नाहीं. रयतेचीं दुःखें रयतेनेंच येऊन सभेंत सांगितलीं

पाहिजेत. किंवा निदान ज्यांच्या दुःखाबद्दल सरकारशीं आम्ही दाद मागतों ते लोक असल्या सभेस हजर तरी असले पाहिजेत. सारांश, राष्ट्रीय सभा घ्या किंवा प्रांतिक सभा घ्या, उत्तरोत्तर अशिक्षित अशा गरीब रयत लोकांत तिचा जितका रिघाव होईल तितका चांगला."[२७] तथापि हा रिघाव व्हावा कसा? या प्रश्नाचे उत्तर त्यांनी सार्वजनिक स्वरूप दिलेल्या गणेशोत्सवात व शिवजयंत्युत्सवात आढळते.

या दोन्ही उत्सवांचा 'राष्ट्रीय' उत्सव असा उल्लेख वारंवार केलेला आढळतो. यांपैकी शिवजयंतीच्या उत्सवासंबंधी यापूर्वीच उल्लेख केला आहे. गणपति-उत्सवाचा आता प्रथम थोडक्यात विचार करू. हा हिंदूंचा उत्सव आहे; तर मग तो 'राष्ट्रीय' कसा? या प्रश्नाचे उत्तर देताना टिळकांचा राष्ट्रवाद हा हिंदू राष्ट्रवाद होता असा निष्कर्ष काढला जातो. तो इतरही काही घटनांमुळे अधिक बळकट झाला आहे. यांतील एक महत्त्वाची घटना म्हणजे दंग्यांचा विचार करण्यासाठी रावबहादूर रानडे यांच्या सल्ल्यास न जुमानता बोलावण्यात आलेली हिंदूंची सभा ही होय. रानड्यांच्या मताने हिंदु-मुसलमानांच्या पुढाऱ्यांची सभा बोलावणे आवश्यक होते. या संदर्भात टिळकांनी केवळ एकतर्फी उदार बुद्धीपेक्षा "न्याय व उदारबुद्धी यांच्या जोडगोळीनें" हा प्रश्न लवकर निकालात निघू शकेल असे मत व्यक्त केले, व दंगे मिटवण्यासाठी काय केले पाहिजे याबद्दल हिंदूंचे मत व्यक्त करण्यासाठी हिंदूंची सभा बोलावली पाहिजे, असा स्पष्ट अभिप्राय व्यक्त केला. त्याचप्रमाणे या उत्सवासंबंधाने, ते हिंदूंचे उत्सव होते हे जाणूनदेखील, राष्ट्रीय कार्यासाठी हिंदू-हिंदूंत ऐक्यभावना जागृत करून त्यांना कार्यप्रवण करणे हाच त्यांचा उद्देश असावा असे म्हणता येईल. "खिस्ती व मुसलमानी धर्मांत सार्वजनिक प्रार्थनेची जी पद्धत आहे त्यापासून त्या धर्मातील लोकांस जो फायदा होतो तशाच प्रकारचा फायदा दहा दिवसांचा गणपत्युत्सव सार्वजनिक झाल्याने हिंदूलोकांस होईल अशी आमची खात्री आहे."[२८]... "एक धर्म, एक राजा, एक भाषा हीं राष्ट्रीयत्वाचीं प्रधान अंगें आहेत. पैकीं इंग्रज सरकारच्या राज्यसत्तेखालीं शेवटचीं दोन साधनें आपणांस चांगल्या तऱ्हेनें प्राप्त झालीं आहेत. राजकीय उपास्यदैवत एक असल्यामुळें जितका फायदा व्हावयाचा तितका हल्लीं होत आहे. व आमच्या मतें धार्मिक उपास्य दैवत एक असल्यानें तोच फायदा दुप्पट होण्याचा संभव आहे."[२९] अशाच प्रकारे छत्रपती शिवाजीमहाराजांच्या कार्यासंबंधी लिहिताना टिळक म्हणतात, "मराठे, ब्राह्मण, परभू, शेणवी वगैरे कोणताही भेद मनांत न आणितां 'गुणाः पूजास्थानं, गुणिषु नच लिंगं नच वयः' या न्यायानें ज्याचा जो गुण आढळण्यांत आला त्याचा सार्वजनिक कामीं उपयोग करून घेऊन सर्वांस एकराष्ट्रीयत्वाच्या जाळ्यांत आणिलें."[३०] हे महाराजांचे कार्य होय.

गोरक्षणामुळे हिंदु-मुसलमान दंगे झाले. गणपति-उत्सव ब्राह्मण भोजने घालण्या-

साठी आहे; इतरांना मुळी त्यात स्थानच नाही. शिवाजीमहाराजांचे राज्य ब्राह्मणांनी बुडविले. त्यांनीच आता त्यांचा उत्सव करणे चमत्कारिक नव्हे काय ? अशा प्रकारची टीका त्या काळीही होत होतीच. आणि टिळकांनी त्या टीकेला उत्तर देण्याचा प्रयत्नही केला आहे. परंतु त्या तपशिलात जाण्याचे कारण नाही. राष्ट्राचे ऐक्य निर्माण होण्यासाठी प्रथम प्रांतांचे ऐक्य होणे आवश्यक आहे; राष्ट्रीय ऐक्य निर्माण होण्यासाठी हिंदूंचे ऐक्य हा एक महत्त्वाचा टप्पा होय; —हा दृष्टिकोण टिळकांच्या विचारांत होता हे नाकारता येत नाही. परंतु त्यांच्य राष्ट्रीयत्वाच्या मर्यादा 'प्रांत' किंवा 'हिंदू' या कल्पनेपुरत्याच मर्यादित होत्या' किंवा या कल्पनांचे प्राथम्य त्यांनी मान्य केले होते, असे मात्र म्हणता यायचे नाही. उलट, त्यांच्या मताने हा राजकीय प्रश्नांपुरती लोकजागृती करण्याचा नजिकचा मार्ग होता इतकेच. विवेकबुद्धीपेक्षा लोकमताला व म्हणूनच लोकप्रियतेला त्यात अधिक महत्त्व होते. "लोक आणि त्यांचे पुढारी यांमधील संबंध" हा टिळकांच्या मताने "धनी आणि चाकर यांच्यामधील संबंधापेक्षां फार निराळा आहे; पुढारी हे लोकांचे धनी नव्हत तर चाकर होत. जोंपर्यंत पुढाऱ्यांचें मत लोकमताहून फारसें भिन्न नसतें तोंपर्यंतच लोकांच्या आदरास ते पात्र होतात. परंतु पुढाऱ्यांचें मत लोकमताहून अगदीं भिन्न असलें म्हणजे मग अर्थातच तेवढ्यापुरता तरी काडी मोडून देण्याचा प्रसंग येतो. लोकांचें मत सरकारास कळविते म्हणून सार्वजनिक सभेस किंमत आली आहे—रावबहादुरांचें मत कळविते म्हणून नव्हे—हें सभेनें लक्षांत ठेवलें पाहिजे."[३१]

टिळकांच्या म्हणण्याचा अर्थ लावायचा म्हणजे ज्या विशिष्ट परिस्थितीत ते कार्य करीत होते तिचा त्यांच्या विचारांवर व कार्यपद्धतीवर परिणाम होणे अपरिहार्य होते असे म्हणावे लागते. या ठिकाणी उत्तर व दक्षिण हिंदुस्थानांत टिळकांनी एका प्रसंगी केलेला फरक नमूद करावासा वाटतो. उत्तरेत मुसलमानांनी राज्य केले, आणि प्रजेतही मुसलमानांचे स्थान महत्त्वाचें; तशी परिस्थिती दक्षिणेत व विशेषतः महाराष्ट्रात नव्हती. यामुळे ज्या काळात राष्ट्रीय जाणीवेचा उदय अजून व्हायचा होता आणि तो होण्यासाठी वर्षाकाठी एकदा जमून ठराव करणे ज्यांना पुरेसे वाटत नव्हते त्यांना सभोवतालच्या लोकांकडे वळणे आवश्यक होते. त्यांच्यापैकी नवे वाद निर्माण करणारांस टिळकांनी बाजूस टाकले, आणि मुसलमान हा तेथे फारसा महत्त्वाचा घटक नसल्याकारणाने हिंदूंचे ऐक्य घडवून आणणे व सर्वांना राष्ट्रहितासाठी कार्यप्रवण करणे हे प्रत्यक्ष कार्याच्या दृष्टीने त्यांचे उद्दिष्ट ठरले, आणि व्यापक प्रश्नासंबंधी त्यांच्या विचारांनाही त्या योगाने आकार आला. जेथे कार्य करायचे ती इंग्रजांपूर्वी हिंदूंच्या राज्याची राजधानी होती, आणि गणपती व शिवाजी ही धार्मिक व ऐतिहासिक प्रतीके होती. परंतु आपल्या सभोवतालच्या परिस्थितीत हिंदूंना जागृत करण्याचे प्रयत्न करीत असतानाच राष्ट्रीय सभेचा मात्र हिंदूंच्या सामाजिक आंदोलनांशी आरंभापासून आलेला संबंध

त्यांनी तोडला, आणि राष्ट्रीय सभा आणि राष्ट्रवाद यांना सर्वसंग्राहक स्वरूप देण्याचाच प्रयत्न केला, हे स्पष्ट दिसून येते. राजद्रोहाचा दुसरा खटला होऊन टिळक तुरुंगात गेले असता मवाळांनी काँग्रेसचा कब्जा घेतला व इतरांना आत येणे अशक्य व्हावे अशा प्रकारचे नियम केले. त्या वेळी 'राष्ट्रीय सभा' ही राष्ट्रीय असली पाहिजे; म्हणजे ती कोणत्याही एका पक्षाची, विचाराची, जाति-जमातीची होऊ शकत नाही; तिच्यात सर्वांना—जे जे स्वराज्य हे ध्येय मान्य करतात अशा सर्वांना—स्थान असलेच पाहिजे; तरच ती 'राष्ट्रीय' म्हणता येईल;—असा स्पष्ट इशारा टिळकांनी दिला.

अशा प्रकारे सामान्य ध्येयाने प्रेरित झालेल्या निरनिराळ्या विचारांच्या लोकांची संघटना हे राष्ट्रीय सभेचे स्वरूप, वेळोवेळी विविध गट तिच्यातून बाहेर पडूनसुद्धा, अजूनपर्यंत कायम राहिले आहे. साधने बदलली, एका विचारसरणीऐवजी दुसरी प्रभावी झाली, प्रतियोगी सहकारिता गेली आणि असहकाराचे युग आले. आजचे जहाल हे उद्याचे मवाळ होतील असे स्वतः टिळकांनीच म्हटले होते. "देशांतील दक्ष लोकांचे हातांत आळीपाळीनें संस्था जाव्यात" असेही मत टिळकांनी एकदा व्यक्त केले होते. आणि या सर्वांच्या मागे 'राष्ट्रीय' म्हणवणाऱ्या संस्थेत सर्वांना स्थान मिळाले पाहिजे, अशी त्यांची भूमिका होती. राष्ट्रीय सभेला आरंभीच्या काळात दिले गेलेले हे स्वरूप तिचे कायमचे वैशिष्ट्य ठरले. राष्ट्रीय ध्येयप्राप्तीसाठी उद्युक्त झालेल्या राष्ट्रवादी विचारसरणीचेही तेच वैशिष्ट्य झाले. अनेक प्रकारचे भेदाभेद असलेला हा समाज. या सर्व भेदाभेदांना काटशह देऊन, सर्वांचे काही एक सामान्य लक्षण घेऊन, त्यावर राष्ट्रीयत्वाची उभारणी होणे आवश्यक होते. परंतु व्यापक सामाजिक समीक्षेवाचून ते अशक्य होते. सुधारणा नको म्हणून समीक्षा नको, आणि समीक्षा नाही म्हणजे लोकशिक्षणाचीही गरज नाही. सामान्य लक्षण म्हणजे सामान्य आपत्ती. ती म्हणजे इंग्रजाचे राज्य. ते घालवले पाहिजे म्हणजे स्वराज्य पाहिजे हे मान्य केले की, सर्व कार्यभाग साधला; इतर सर्व प्रश्न तूर्त काढूच नयेत. हवे तर हिंदूंना सर्व अधिकार द्या, हवे तर मुसलमानांना द्या. कायदे-मंडळात सर्व ब्राह्मणेतर आले तरी चालतील, आम्ही त्यास हरकत घेणार नाही. हे सारे आपापसातले प्रश्न आहेत; आपण ते केव्हाही सोडवू शकू, हे राष्ट्रवादी विचारसरणीचे वैशिष्ट्य बनले. यामुळे सर्व भेदाभेद कायम राहिले. राष्ट्रवाद हे त्या सर्वांवर तात्पुरते आवरण घालणारे छत्र बनले. आंदोलनाची व्यापकता झपाट्याने वाढली आणि नेत्यांची लोकप्रियताही, पण त्याबरोबरच दौर्बल्यही वाढले. टिळकांनाही याचा अनुभव आला होता. हक्क प्राप्त होण्याची वेळ आली की, राष्ट्रीयत्व मागे पडून गटागटांच्या हितसंबधाविषयीचे प्रश्न व तज्जन्य वाद वर येणे अपरिहार्य झाले. हिंदू अधिक मुसलमान अधिक पारशी अधिक ख्रिश्चन अशी राष्ट्रीयत्वाची व्याख्या बनली. धार्मिक, भाषिक, जातीय इत्यादी सर्व

अभिमान कायम राहिले. सर्व जण भविष्याविषयी आपापल्या गटाच्या आशा बाळगीत; आणि हे प्रश्न तूर्त विचारात घेऊन मतभेद माजवणे योग्य नाही हा नेत्यांचा सल्ला स्वीकारून स्वराज्याच्या आंदोलनाला पाठिंबा देत. टिळकांनीही असा सल्ला दिला आहे. तूर्त भांडणे नकोत याच भावनेतून त्यांच्या वेदोक्तावरील भाष्याचा अर्थ लागतो. अस्पृश्योद्धाराच्या प्रश्नाचीही तीच अवस्था झाली. वरवरच्या ऐक्याला महत्त्व आले, अंतःकरणे मात्र दुरावलेलीच राहिली. टिळकांच्या काळात आणि बव्हंशी त्यांच्या प्रयत्नामुळेच राष्ट्रवादाचे निश्चित झालेले स्वरूप व राष्ट्रीय सभेला आणि तिने वेळोवेळी उभारलेल्या आंदोलनांना आलेला आकार हा पुढे थोड्याफार फरकाने कायमच राहिला, असे म्हणावे लागते. नेता आणि लोक यांचा टिळकांनी सांगितलेला संबंधही राष्ट्रीय राजकारणात वेळोवेळी प्रत्ययास येत राहिला. लोकशिक्षणाची जबाबदारी न स्वीकारल्यामुळे लोकप्रियता हेच नेतृत्वाचे एकमेव वैशिष्ट्य बनले. नेत्यांनी लोकांना शिकवले नाही असे नाही; पण ते फक्त चळवळीचे तंत्र वा व्याकरण. विचार करण्याचे सामर्थ्य या आंदोलनात फारसे वाढीस लागले नाही, हा आजवरचा एक सामान्य अनुभव आहे.

टिळकांच्या कार्याला व शिकवणुकीला दुसरी एक मौलिक स्वरूपाची बाजू आहे. टिळकांच्या जीवनकार्याचा आरंभ होतानाच ती प्रकट झाली, आणि राष्ट्रीय आंदोलनाचा साचाच तिच्या योगाने निश्चित झाला, असे म्हणता येईल. तिच्यासंबंधी विचार करताना इंग्रजी राज्याविषयीचा टिळकांचा दृष्टिकोण आणि स्वराज्य व सुराज्य यासंबंधीची टिळकांची भूमिका ध्यानात घेतली पाहिजे. १८९४ सालच्या एका लेखात इंग्रजी राज्याने येथे एकराष्ट्रीयत्वाची भावना निर्माण केली याचा उल्लेख करून टिळकांनी इंग्रजी व त्यापूर्वीच्या मराठी राज्याची सविस्तर तुलना केली आहे. दोहोंतील काही साम्ये त्यांनी दाखविली, त्याचप्रमाणे फरकही! "मराठी राज्यांत न्यायमनसुब्याचे निकाल वहिवाटीवर होत असत, व हल्लीं लिहिलेल्या कायद्याच्या अनुरोधानें होतात हा मोठा विशेष आहे. शिवाय त्या वेळीं कामगार करतील तेंच प्रमाण व हल्लीं कायदा सांगेल तें प्रमाण हा जरी मोठासा भेद दिसतो, तरी स्वराज्य असल्यामुळें व आमची ग्रामव्यवस्था चांगली असल्यामुळें रयतेची दाद जितक्या लौकर व सोप्या रीतीनें लागत असे, तितकी आतां सुधारलेल्या व कायदेप्रिय राज्यांतहि लागत नाहीं. तथापि जसजसे जास्त हक्क लोकांस मिळत जातील तसतसा वरील दोष नाहींसा होऊन एकंदर राज्यव्यवस्था लोकांस सुखकर होत जाईल असा सुमार दिसतो. .....हल्लींची राज्यपद्धति पौरस्त्य पद्धतीपेक्षां जास्त सोयीस्कर व जास्त सुखकर आहे हें आम्हांस कबूल आहे....तथापि गोड लागला म्हणून उंस जसा मुळासकट खातां येत नाहीं तद्वतच राज्यपद्धती चांगली म्हणून तिचा अंमलहि चांगलाच झाला पाहिजे असें म्हणतां येणार नाहीं."[३२] म्हणून राज्यकर्त्यांनी येथील

"समंजस विद्वानांचा" सल्ला घ्यावा, "दुष्परिणामी विचार अगर आग्रह" यांस बळी पडू नये, असे त्यांनी सुचविले होते. आणि एकाच वर्षाच्या अवधीत मुंबई सरकारचे चिटणीस लीवार्नर यांच्या विचारांचा परामर्ष घेताना त्यांची भूमिका अधिक मूलगामी झालेली दिसते. "हिंदुस्थानांत इंग्रज लोक परकी आहेत, शिवाय त्यांना पंतोजीचेंहि काम करावयाचें आहे. जेथें अनेक जातींचे व धर्मांचे लोक आहेत तेथें आमच्या कोणत्याहि कृत्याला सर्व लोक चांगले म्हणणार नाहींत."[३३] या त्यांच्या विधानाचा व त्यात अभिप्रेत असलेल्या इंग्रजी राज्याबद्दलच्या असंतोषाच्या मीमांसेचा परामर्ष घेतांना "रोमन पातशाही आणि इंग्रजी राज्य" या लेखात टिळक म्हणतात, "रानटी लोकांवर राज्य करण्याला कदाचित रोमन राज्यपद्धतीच श्रेयस्कर असेल. ती इंग्रजांनीं येथें व १९ व्या शतकांत सुरू केली नाहीं ह्यांत फारसें नवल नाहीं. सुरू केली असती तर ब्रिटिश सत्ता हिंदुस्थानांत फार दिवस टिकलीही नसती, याची १८५७ साल चांगली साक्ष देत आहे. सबब इंग्रजांनीं रोमन राज्यपद्धति स्वीकारली नाहीं ती लोकोपकाराकरितां नसून स्वसंरक्षणाकरितां होय असें म्हणावें लागतें....शिवाय, रोमन लोकांनीं कितीही जुलूम केला असला तरी जिंकलेल्या लोकांना हिंदुस्थानांतील हल्लींच्या प्रजेप्रमाणें सर्वतोपरी हतवीर्य करून ठेविलें नव्हतें ही गोष्ट निर्विवाद आहे. म्हणूनच त्या जिंकलेल्या लोकांच्या वंशजांनीं मोठमोठीं कृत्यें केलीं. पण आम्हीं सर्वस्वी पराधीन झालों आहों. लीवार्नर म्हणतात त्याचप्रमाणें इंग्रज लोक आमचे पंतोजीच होऊन राहिले आहेत असें नाहीं, तर 'त्वमेव माता त्वमेव बंधुः' असेंच म्हणण्याची आम्हांला पाळी येऊं लागली आहे. आमच्याविषयीं सरकारची कळकळ इतकी अतोनात वाढत चालली आहे कीं, आमचें जेवणखाण, निजणेउठणें, खेळणेंबसणें यांवर देखील खाविंद सरकारचा डोळा आहे. आम्हीं आणखी कांहीं वर्षें अडाणी राहिलेले पत्करलों; पण हा इतका सासुरवास नको. जोंपर्यंत स्वावलंबनाची संवय लागली नाहीं तोंपर्यंत आम्हीं आणखी कितीहि गुणसंपन्न झालों तरी व्यर्थ आहे."[३४] राज्याच्या कार्यपद्धतीचा नागरिकांवर होणारा परिणाम हा या टीकेचा गाभा आहे. इंग्रजी राज्याने आमचे स्वावलंबन नाहीसे केले आहे, त्यापेक्षा अडाणीपणा पत्करला, असे टिळकांचे म्हणणे आहे.

धीरनपाल या नावाच्या गृहस्थांनी 'पायोनियर' पत्रात लिहिलेल्या एका लेखात "इंग्रजी राज्यांत दोष आहेत म्हणून इंग्रज सरकाराबद्दल लोक असंतुष्ट नाहींत तर ते परकीय राजे आहेत एवढ्याकरतांच हिंदुस्थानांतील लोकांस वाईट वाटते" असे म्हटले होते. त्यास उत्तर देतांना, १८९९ सालच्या एका लेखात टिळक म्हणतात, "हिंदुस्थानांतील लोकांस पर्रराज्याची संवय आज पुष्कळ दिवस झालेली आहे, व निव्वळ परकी म्हणून राज्यकर्त्यांबद्दल जर त्यांस वाईट वाटत असतें तर लॉर्ड रिपनसारख्यांचा त्यांनीं कधींहि जयोत्साह केला नसता, अथवा अकबर बादशहाची थोरवी गाईली नसती. सारांश, 'अयं निजः परो

वेत्ति गणना लघुचेतसाम्'. 'हा आपला', 'हा परक्याचा' हा क्षुद्र भेद आमच्या वेदांती लोकांनी कधीच टाकून दिलेला आहे. राज्य कोणाचेंही असो, तें आपल्या फायद्याचें आहे कीं नाहीं; त्यापासून देशांतील व्यापाराची, उद्योगाची, संपत्तीची, विद्येची, कलाकौशल्याची अथवा लोकांच्या अंगांतल्या कर्तबगारीची दिवसानुदिवस अभिवृद्धि होत आहे कीं नाहीं; हेंच आमच्या लोकांचें मुख्य पहाणें असतें.... आगगाडी, तारायंत्रें, सडका अथवा पक्षकारांमधील तंटे तोडण्यास चांगलीं न्यायाचीं कोर्टें एवढ्या गोष्टी झाल्या म्हणजे वर लिहिलेले सर्व फायदे नेहमीं लोकांस मिळालेच पाहिजेत असें मात्र आम्हीं समजत नाहीं. राष्ट्राच्या व सुधारणेच्या प्रगतीस हीं साधनें लागतात खरीं. पण तीं साधनें प्राप्त झालीं असतां साध्य गोष्ट अवश्य मिळालीच पाहिजे हा सिद्धांत मात्र तर्कशास्त्रदृष्ट्याहि चुकीचा आहे."[३५]

धीरनपाल यांचे असे मत होते की, "हिंदुस्थानास एकराष्ट्रीयत्व येण्यास हिंदुस्थानांतील लोकांचा जातिभेद नाहींसा होऊन एक धर्म झाला पाहिजे, असें जें कित्येकांचें म्हणणें आहे तें बरोबर आहे....हिंदूंनीं हिंदू आणि मुसलमानांनीं मुसलमान रहावें यानें कांहीं देशाची धडगत लागावयाची नाहीं. हल्लींच्या अस्वस्थतेचें बीज सर्व कांहीं हल्लीं धर्मोन्नतीप्रीत्यर्थ चालू असलेल्या खटपटींत आहे. त्यामुळें तरुण लोकांचीं डोकीं फिरून जाऊन आपल्या धर्माचा व देशाचा गाढा अभिमान व परकीयांबद्दल परकीय म्हणून अप्रीति त्यांच्या मनांत उत्पन्न झाली आहे." तथापि, हे म्हणणे चुकीचे आहे हे सहज लक्षात येईल असे म्हणून टिळकांनी या विचारसरणीस उत्तर दिलेले आहे. "स्वधर्माचा अभिमान जागृत झाल्यानें इंग्रजी राज्यास तरी धोका नाहीं. कारण, धीरनपाल यांच्या म्हणण्याप्रमाणेंच त्यानें जो तो स्वधर्माभिमानी बनून सगळ्या लोकांची ऐक्यता होऊं शकत नाहीं. आणि ऐक्यता नाहीं म्हणजे इंग्रजी राज्यास त्यापासून कांहीं भय नाहीं. आतां या धर्माभिमानानें परकी म्हणून इंग्रजांबद्दल लोकांचीं मनें अस्वस्थ होतात एवढाच काय तो धीरनपाल यांचा आक्षेप राहिला....तथापि स्वदेशीं राज्य होणें आतां शक्य नाहीं; झालें तरी तें टिकणार नाहीं, आणि हल्लीं चालू असलेल्या युरोपांतील प्रबळ राष्ट्रांच्या चढाओढींत आम्हांस इंग्रजांच्या नाहीं तर दुसऱ्या कोणाच्या तरी तडाख्यांत जावें लागेल. या गोष्टी आतां सर्व लोकांस चांगल्या कळूं लागल्या आहेत."[३६] अशा प्रकारे धीरनपाल यांस उत्तर देणारे टिळक, अवघ्या पाचसात वर्षांच्या काळात वेगळ्या भूमिकेवर आलेले दिसतात. १९०६ साली दादाभाई नौरोजी यांनी काँग्रेसच्या अध्यक्षपदावरून केलेल्या भाषणात स्वराज्य हे राजकीय ध्येय होय अशी घोषणा केली आणि "स्वराज्याची तहान सुराज्यानें भागत नाहीं" असे वचनही आपल्या भाषणाच्या आरंभी घातले. याचा उल्लेख करून टिळक, १९०७ साली लिहिलेल्या एका लेखात म्हणतात, "नुसत्या सुराज्यानें आमची राजकीय उत्कर्षाची इच्छा तृप्त होत नाहीं,

तर आम्हांस स्वराज्य पाहिजे....'स्व' शब्दानें सकृद्दर्शनीं आपलेपणाचा बोध होतो....'आपलें' म्हणजे आपल्या ज्ञातींतील, आपल्यांतील सरदारांचें, आपल्या धर्मीयांचें किंवा आपल्या सर्व प्रजेचें अथवा आपल्या देशांत अगर धर्मांत उत्पन्न झालेल्या राजाचें असे प्रश्न 'आपला' या शब्दाच्या अर्थाचा विचार करतांना सहजगत्या उद्भवतात....राजे लोक अधिकारमदानें किंवा अन्य कारणांनीं अंध होऊन प्रजेच्या हिताकडे दुर्लक्ष करूं लागले किंवा जुलमी झाले म्हणजे स्वधर्मांतील किंवा स्वदेशांतील राजे असतांनाही त्यांचें राज्य लोकांस नकोसें होतें. पेशवाईची अखेरची स्थिति अशा प्रकारची होती; व म्हणूनच तेव्हां बाजी रावाचें राज्य जाऊन इंग्रजांचें राज्य आलें याचें लोकांस फारसें वाईट वाटलें नाहीं...'स्वराज्य' या शब्दाचा अर्थ दोन प्रकारें होऊं शकतो. एक सुव्यवस्थित राज्य आणि दुसरा सुखकारक राज्य. या दुसऱ्या अर्थानें पेशवाईचे अखेरीस बाजीरावाचें राज्य 'स्वराज्य' नव्हतें, असें म्हणतां येईल. स्वराज्य, शिस्तवारीच्या दृष्टीनें पाहिलें तर सुराज्य असूं शकेल, पण म्हणून तें सुखकारक राज्य असेलच असें नाहीं." रशियातील झारशाहीचे उदाहरण देऊन टिळक म्हणतात, "'स्वराज्य' या शब्दाचा अर्थ 'स्व' म्हणजे प्रजा, यांच्या मताप्रमाणें चालणारें राज्य असा जर केला तर रशियांतील राज्य सुराज्य असलें तरी स्वराज्य नाहीं असेंच म्हणावें लागेल. 'स्वराज्य' हा शब्द सनदशीर राज्यपद्धतीस पुष्कळदां लावण्यांत येत असतो. ज्या राज्याचा कारभार प्रजेच्या किंवा प्रजापक्षाच्या तंत्रानें चालतो, तेंच खरें स्वराज्य होय, असें म्हणणारे पुष्कळ लोक आहेत. त्यांच्या मतें 'स्वराज्यां'तील 'स्व' शब्दाचा अर्थ निव्वळ स्वदेशी राजाचें राज्य असा नव्हे, तर 'स्व' म्हणजे प्रजा, यांच्या तंत्रानें चाललेलें राज्य असा होय. अशा दृष्टीनें पहिलें म्हणजे रशियाचेंच काय पण हिंदुस्थानांतील नेटिव्ह संस्थानांचें राज्यही खरें स्वराज्य नाहीं असें म्हणावें लागेल. म्हणजे स्वदेशी राजा असला म्हणजे कांहीं सर्व कार्यभाग होत नाहीं. कदाचित्, त्याची राज्यपद्धति शिस्तवार नसेल आणि यदाकदाचित् शिस्तवार असली तरी लोकांस सुखकारक नसेल. कारण शिस्त आणि सुख हीं दोनही नेहमीं एकत्र राहातातच असें नाहीं. तुरुंगांतील व्यवस्था पुष्कळ शिस्तवार असते पण त्यामुळें तुरुंगांतील कैद्यांस ती केव्हांहि सुखकारक वाटत नाहीं. प्रजेपैकीं बहुतेक सर्वांस, निदान जाणत्या लोकांस तरी, स्वातंत्र्यसुखाचें अत्यंत महत्त्व वाटत असतें, आणि ज्या राज्यांत या स्वातंत्र्यसुखाचा लोप होतो तें इतर दृष्टीनें कितीही शिस्तवार असलें तरी लोकांस सुखकारक होत नाहीं....शिक्षणाचा जितका अधिकाधिक फैलाव होईल त्या मानानें केवळ स्वदेशी राजा आणि सुव्यवस्थित राज्यकारभार एवढ्यानें तृप्ति होणें अधिकाधिक दुर्घट होत जाईल. इतकेंच नव्हे तर प्रजासत्ताक राज्याखेरीज खरें स्वराज्यच नाहीं असें म्हणण्यापर्यंतही लोकांची मजल येऊन ठेपेल; आणि याखेरीज दुसरें राज्य सुराज्य होणें नाहीं, असेंही लोकांस वाटूं लागेल.

स्वराज्य आणि सुराज्य यांची ही अंतिम एकवाक्यता आहे."[३७] अशा प्रकारे टिळकांनी स्वराज्य आणि सुराज्य यांची एकवाक्यता लोकशाही राज्यव्यवस्थेत पाहिली.

टिळकांच्या भूमिकेबाबत नंतरच्या पिढ्यांनी टिळकांवर अन्याय तर केला नाही ना, अशी शंका काही वेळा आल्यावाचून राहात नाही. उदाहरणार्थ, टिळकांच्या कार्याचे मूल्यमापन म्हणून केले जाणारे बहुतेक लेखन, ते परंपरा-वादी, जुन्या विचारांचे, पुण्यातील सनातनी ब्राम्हणांना प्रिय, सामाजिक क्षेत्रात प्रतिगामी वा 'नेमस्त' होते, ही भूमिका घेताना आढळते. राजकीय क्षेत्रात मात्र 'क्रांतिकारक', 'जहाल', 'असंतोषाचे जनक' असे त्यांना संबोधण्यात आले आहे. अनेकांनी या बाबतीत व्हॅलेंटाईन चिरोल यांचीच री ओढली आहे. "हिंदु राष्ट्रवादी", "चित्पावन ब्राह्मणांच्या राजद्रोही वृत्तीचे प्रतीक", "भारतीय असंतोषाचे जनक" या चिरोलसाहेबांच्या वर्णनाने[३८] आकर्षित होऊनच की काय, विविध विचारांची मंडळी आपापले प्रतिबिंब टिळकांच्या चरित्रात पाहू लागली. यात दोनतीन प्रकारच्या अडचणींची भर पडली आहे. एक तर टिळकांचे बहुतेक सर्व लेखन मराठीत असल्यामुळे ते तपासून त्याचे काळजीपूर्वक मूल्यमापन करणारांची संख्या मर्यादित झाली; दुसरे म्हणजे सुधारक-सनातनी आणि ब्राह्मण-ब्राह्मणेतर या दोन्ही वादांच्या संदर्भात टिळकांचे स्थान काहीसे वादग्रस्त झाल्यामुळे त्यांच्या कार्याचे व विचारांचे व्यापक व वस्तुनिष्ठ अध्ययन जवळजवळ अशक्यच झाले. ही वस्तुनिष्ठता पुष्कळ अंशी बाबू अरविंद घोष यांनी केलेल्या मार्मिक गुणग्रहणात व्यक्त झाली आहे, अशी माझी समजूत आहे. आपल्या राष्ट्रीय तपश्चर्येची मूर्तिमंत प्रतीके आणि आशाआकांक्षांना प्रत्यक्षरीत्या व्यवहारात आणणारे जे दोनतीन नेते हिंदी लोकांना दिसतात त्यांत टिळकांचा उल्लेख करावा लागेल, असे अरविंदांचे म्हणणे आहे.

ज्या उद्दिष्टांच्या योगाने वाद वाढतील किंवा जी उद्दिष्टे लवकर साध्य होण्या-सारखी वाटली नाहीत त्यासाठी शक्तीचा अपव्यय करण्याचे टाळून राजकीय ध्येयावर आपले सर्व लक्ष टिळकांनी केंद्रित केले हे म्हणणे ठीक आहे. यामुळेच सामाजिक जीवनातील सर्व भेदाभेद कायम राहिले. विविध गटांची गोळाबेरीज म्हणजे राष्ट्रीयत्व अशी राष्ट्रीयत्वाची व्याख्या बनली आणि राष्ट्रीय आंदोलनात एक-प्रकारे विचारविरोधी परंपरा निर्माण होऊन आंदोलनाला वैचारिक दौर्बल्य आले. उलट, कृतीच्या दृष्टीने बोलायचे झाल्यास टिळकांच्या नेतृत्वामुळे राष्ट्रीय आंदो-लनाला तात्पुरता पण अतिशय मोठा उठाव मिळाला. त्याबरोबर राज्यकर्त्यांवर विश्वास ठेवण्याची टिळकांची तयारी नसली तरी इंग्रजी शिक्षणाने आणि पाश्चात्य संस्कृतीशी आलेल्या संपर्काने इकडे आलेल्या लोकशाहीवरील विश्वास हाही टिळकांच्या विचारात अढळ होता यांत शंका नाही. केवळ 'बहुमताचे राज्य' ही

कल्पना बहुमतात असलेल्या हिंदूंना मान्य होणे स्वाभाविक होते, असा या विधानाचा उथळ अर्थ करणे उचित नाही. लोकशाही मूल्यांची जाणीवही टिळकांच्या लेखनात आढळते; आणि ती टिळकांनी अत्यंत मार्मिकपणाने इंग्रजांविरुद्ध वापरली होती. १९०२ साली लिहिलेल्या 'पाच्छाहीपणा का गुलामगिरी' या लेखात ते म्हणतात, "अधिकार व गुलामगिरी या कांहीं नित्य परस्परविरोधी गोष्टी नाहींत, व जें राष्ट्र अधिकाधिक अधिकार मिळवीत चाललें आहे, त्यास तें त्याच प्रमाणानें गुलाम बनत चाललें आहे, असें म्हणणें म्हणजे सूर्याचा प्रकाश व काळोख यांचें साहचर्य प्रस्थापित करण्यासारखें असंभवनीय नाहीं....इंग्रजी राष्ट्र अथवा समाज असें आपण ज्यांस म्हणतों तो एक व्यक्ति नसून पुष्कळ व्यक्तींचा समुदाय आहे, व यांतील प्रत्येक व्यक्तीस ज्या मानानें अधिकाधिक स्वातंत्र्य भोगतां येईल त्या मानानें तो समाज गुलामगिरीपासून अलिप्त राहील. परंतु कोणत्याहि कारणानें कां असेना जर व्यक्तींचें स्वातंत्र्य कमीकमी होत चाललें असेल तर या व्यक्तींनीं बनलेला समाज गुलामगिरींत अधिकाधिक लपेटला जात आहे, असें म्हणणें भाग आहे."[३९] टिळकांचे हे म्हणणे इंग्रजी पाच्छाहीपणाला (इंपीरिॲलिझम) उद्देशून असले तरी सर्व समाजांना सर्व काळी लागू पडणारे एक महान सत्य त्यात आहे हे निर्विवाद होय. निर्भेळ व्यक्तिस्वातंत्र्याचा मानदंड म्हणून अशा प्रकारे पुरस्कार करणारे टिळक वैचारिक वा सैद्धांतिक पातळीवर जात, प्रांत, धर्म इत्यादींच्या बंधनांनी जखडलेले असू शकतील असे मानणे हा त्यांच्यावर एक मोठाच अन्याय होय.

जात, प्रांत, धर्म इत्यादींचे अस्तित्व नाकारल्याने त्या नष्ट होत नाहीत. गेल्या वीस वर्षांतील अनुभव हेच दर्शवितो. धर्म व प्रांत यांसंबंधीच्या टिळकांच्या विचारांचा थोडाफार ऊहापोह यापूर्वी केला आहे. त्यांच्या जातिविषयक भूमिकेमुळेही काही महत्त्वाचे गैरसमज झाले आहेत. वेदोक्तप्रकरणातील त्यांची भूमिका आणि अस्पृश्यतेबाबतच्या पत्रकावर सही करण्यास त्यांनी दिलेला नकार याबद्दलची आठवण ही दोन उदाहरणे दिली जातात. या दोन्ही प्रसंगी टिळकांनी घेतलेली भूमिका समर्थनीय ठरत नाही. ज्या सामान्य जनतेला ते राजकीय लढ्याकडे आकर्षित करू पाहात होते त्यांच्याच मनात या काहीशा वकिली पद्धतीच्या लेखनाने ते दुरावा निर्माण करीत होते. तथापि मृत्युवश होण्याच्या अवघे साडेचार महिने आधी लिहिलेल्या एका लेखात टिळक म्हणतात, "हल्लींच्या कालांत देशहिताचे व्यापारदृष्ट्या, शेतकीदृष्ट्या, धंदेदृष्ट्या आणि लष्करीदृष्ट्या अगर आर्थिकदृष्ट्या असे निरनिराळे प्रकार होऊं शकतात हें खरें. पण हे भिन्नभिन्न देशहिताचे प्रकार सिद्धीस नेण्यास भिन्नभिन्न जातवारच लोक पाहिजेत असें मात्र त्यानें सिद्ध होत नाहीं. अधिकारारूढ पुरुष त्याच्या त्याच्या विषयांत निष्णात असला म्हणजे झालें; मग तो जातीचा ब्राह्मण असो वा ब्राह्मणेतर असो, जैन असो वा लिंगायत असो, तिकडे पहाण्याचें कारण नाहीं.

हल्लीं उदयास येऊं घातलेल्या लोकशाहींत जें काय शिकावयाचें आहे तें हेंच होय. मग नोकरशाही किंवा तिचे अनुयायी त्याकरितां आमची स्तुति करोत वा निंदा करोत. रणांगणांत तरवार गाजवणारा कोणी असला तरी ज्याप्रमाणें तो क्षत्रिय अगर मराठा समजावयाचा तद्वतच हल्लींच्या कठीण प्रसंगीं कामास आलेला किंवा येणारा पुरुष ब्राह्मणेतर असला तरी ब्राह्मणच समजला पाहिजे. जातिभेद जन्मसिद्ध न मानतां गुणकर्मसिद्ध मानण्यास येथेंच सुरुवात होते व झाली पाहिजे."[४०]

लोकमान्यांचे हे राजकीय मृत्युपत्रच होय. "हल्लीं उदयास येऊं लागलेल्या लोकशाहींत" आजवर कायम राहिलेले धार्मिक, प्रांतीय, जातीय व अन्य गट सतत तणातणीची परिस्थिती निर्माण करीत आहेत. त्यामुळे काहींना आमच्या सामाजिक जीवनाला पाश्चात्य पद्धतीची लोकशाही मानवत नाही अशी शंका येऊ लागली आहे. धार्मिक वा प्रादेशिक भावनांचा राष्ट्रकार्यासाठी टिळकांनी उपयोग केला खरा; पण राष्ट्रीय सभेला राजकीय व जनताभिमुख बनवून ते शस्त्र आपले कार्य पुढे नेणारांच्या हाती त्यांनी दिले. इंग्रजी शिक्षण व पाश्चात्य संस्कृती यांच्यापासून प्रत्यक्ष राष्ट्रीय आंदोलनाच्या बाबतीत त्यांनी फायदा घेतला, परंतु मार्गदर्शन स्वीकारले नाही. भारतासारख्या प्राचीन संस्कृतीत भूतकाळाकडे नकारात्मक दृष्टीने पाहून राष्ट्रवाद वा राष्ट्रीय आंदोलन उभारले जाणे अशक्यच होते. परंतु त्याबरोबरच अनेक भेदाभेदांनी भरलेल्या या समाजाचे प्रश्न आधुनिक लोकशाहीतच सुटू शकतील हे त्यांनी ओळखले. सुधारकांशी ते झगडले तसेच सनातन्यांशीदेखील. एकदा राजकीय स्वातंत्र्य प्राप्त झाले की सर्व प्रश्न सोडवता येतील अशी त्यांची धारणा होती. या दृष्टिकोणामुळे काही फायदा झाला त्याचप्रमाणे काही किंमतही द्यावी लागली आहे. वैचारिक भूमिकेवरून प्रश्न सोडविताना प्रत्यक्ष लोकमताकडे दुर्लक्ष करण्याची प्रवृत्ती बळावू न देता साधेभोळे, अडाणी, खातेपिते अशा प्रत्यक्षात आढळणाऱ्या माणसाचे मत म्हणजे लोकमत होय अशी भूमिका त्यांनी घेतली. यामुळे टिळकांनी तात्पुरती लोकप्रियता मिळवली असेल, पण त्या योगाने दीर्घकालीन संदर्भात लोकशिक्षणाचाही पाया घातला. आक्रमक धार्मिकता, प्रांतिकता किंवा जात्यभिमान यांना त्यांच्या विचारांत स्थान दिसत नाही; हळूहळू लोकशिक्षणाने लोकशाहीच्या पायास बळकटी आणून या प्रवृत्ती निरुपद्रवी बनविल्या पाहिजेत किंवा नष्ट केल्या पाहिजेत, अशीच त्यांची शिकवणूक आहे. निधर्मी राज्याची सूत्रे त्यांच्या शिकवणुकीत आढळतात. राज्य कायद्याचे हवे, दांडगाईचे नव्हे; 'स्वराज्य म्हणजे पेशवाई नव्हे,' असे ते सांगतात. कायदाही प्रसंगी मोडावा लागतो असे त्यांनी म्हटले खरे, पण ते कायदा करण्याचे सामर्थ्य आपणांजवळ नाही म्हणून. ते एकदा सर्वांना प्राप्त झाले, स्वराज्य व सुराज्य हीं एकरूप होऊन लोकशाही स्थापन झाली म्हणजे हा प्रश्न उद्भवत नाही; सर्व विरोध हा सनदशीरच होतो, अशी

त्यांची भूमिका होती. 'प्रत्येक' व्यक्तीचे स्वातंत्र्य वाढत आहे की संकुचित होत आहे हे पाहाणे हेच लोकशाहीच्या यशापयशाचे गमक होय असा मौलिक सिद्धांत त्यांनी मांडला; आणि लोकशाहीच्या विकासासाठी सर्व परंपरागत भेदाभेद विसरून जीवनाच्या सर्व क्षेत्रांत गुणांच्या विकासासाठी सर्वांस, प्रत्येकास उत्तेजन दिले पाहिजे, अशी स्पष्ट शिकवणूक लोकमान्यांनी दिली. "स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे" अशी घोषणा करणाऱ्या व ते मिळविण्यासाठी त्यागाने व जिद्दीने आयुष्यभर तत्कालीन जगातील सर्वांत प्रबळ शक्तीशी लढणाऱ्या या थोर नेत्याने स्वराज्याबाबत व्यक्त केलेल्या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी सदैव प्रयत्नशील राहाणे हाच त्याच्याविषयीची कृतज्ञता व्यक्त करण्याचा योग्य मार्ग होय. हे भेदाभेद राष्ट्रवादाच्या वाढीतून नष्ट झाले नाहीत, पण लोकशाहीच्या चौकटीत ते नाहीसे करण्यासाठी लोकमान्य अजूनही मार्गदर्शन करू शकतात, आणि मिळालेले राष्ट्रीय स्वातंत्र्य हा सर्वांच्या विकासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो. ही राष्ट्रनिर्मिती आपणास अजून करायची आहे. लोकमान्य टिळक हे चिरोळ्ला भारतीय असंतोषाचे जनक वाटले असतील, आम्ही त्यांना 'भारतीय राष्ट्रवादाचे शिल्पकार' म्हणूनच मुजरा केला पाहिजे.

टीपा

राडा ग्रंथ संग्रहालय, डाग. स्व
अनुक्रम.....
अंक .....

पहिले व्याख्यान

१. लो० टिळकचरित्र (पूर्वार्ध), न० चिं० केळकर, पृ० ५१.
२. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग ४), पृ० २८२.
३. Shay Theodore L, *The Legacy of the Lokmanya*, Oxford, 1956, p. vii.
४. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग १), प्रस्तावना, पृ० ३.
५. लो० टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका, संपा० स० वि० बापट, १९२४ (खंड १), पृ० १६.
६. आमच्या देशाची स्थिती, विष्णुशास्त्री चिपळुणकर, य० गो० जोशी प्रकाशन, पृ० १०.
७. कित्ता, पृ० ८९.
८. Dhananjay Keer, *Mahatma Jotirao Pooley*, Popular, 1964, pp. 16–17.
९. लो० टिळक यांच्या आठवणी व आख्यायिका, संपा० स० वि० बापट, १९२४ (खंड १), पृ० २७.
१०. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग २), पृ० ४६७.
११. लो० टिळकचरित्र, (पूर्वार्ध), न० चिं० केळकर, पृ० ९९.
१२. लोकहितवादीकृत निबंधसंग्रह, अ० का० प्रियोळकर, पॉप्युलर प्रकाशन, १९६७, पृ० २३८–२३८.
१३. कित्ता, पृ० १३८.
१४. कित्ता, पृ० ३५.
१५. निबंधमाला, विष्णुशास्त्री चिपळुकर, चित्रशाळा, १९१७, पृ० १०८५.
१६. कित्ता, पृ० १४.
१७. लो० टिळकचरित्र (पूर्वार्ध), न० चिं० केळकर, पृ० ५०.
१८. कित्ता, पृ० १९३–१९४.
१९. कित्ता, पृ० १५२.
२०. कित्ता, पृ० १९५.
२१. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग २), पृ० ७२–७७.

२२. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग ३), पृ० ३९.

२३. *A Review of Education in Bombay State* : 1855–1955, Govt. of Bombay 1958, p. 179.

२४. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग २), पृ० ५६.

२५. लो० टिळकचरित्र (पूर्वार्ध), न० चिं० केळकर, पृ० १७५.

२६. आमच्या देशाची स्थिती, विष्णुशास्त्री चिपळुणकर, य० गो० जोशी प्रकाशन, पृ० ७९.

२७. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग ४), पृ० २८३.

२८. कित्ता, पृ० २८५.

२९. कित्ता, पृ० २८४.

३०. *Religion and Social Reform : A Collection of Essays and Speeches by M. G. Ranade*, Gopal Narayan & Co., Bombay, 1902; pp. 135–155.

३१. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग ४), पृ० ३२–३८.

३२. कित्ता, पृ० ३२.

३३. कित्ता, पृ० ३६–३८.

३४. निबंधसंग्रह (भाग १), गो० ग० आगरकर, शिराळकर कंपनी, पृ० १४२–१४६.

३५. कित्ता, पृ० १४६–१४७.

३६. कित्ता, पृ० १५१.

३७. कित्ता, पृ० १५३.

३८. कित्ता, पृ० १४४.

३९. कित्ता, पृ० १६२.

४०. निबंधसंग्रह (भाग ३), गो० ग० आगरकर, शिराळकर कंपनी, पृ० ११५–११६.

४१. आधुनिक भारत (तिसरी आवृत्ती), आचार्य जावडेकर, पृ० १८५–१८६.

४२. कित्ता, पृ० २३४.

४३. निबंधसंग्रह (भाग १), गो० ग० आगरकर, शिराळकर कंपनी, पृ० १२–१३

४४. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग ४), पृ० ५३१–५३६.

४५. निबंधसंग्रह (भाग २ रा), गो० ग० आगरकर, शिराळकर कंपनी, पृ० २४६–२४८.

४६. लो० टिळकचरित्र (पूर्वार्ध), न० चिं० केळकर, पृ० २४९.

४७. निबंधसंग्रह (भाग २ रा), गो० ग० आगरकर, शिराळकर कंपनी, पृ० ९९–१००

४८. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग ४), पृ० २१.

४९. न्या० रानडेचरित्र (दुसरी आवृत्ती), न० र० फाटक, पृ० ६८–६९.

५०. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग ४), पृ० १.

दुसरे व्याख्यान

१. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग १), पृ० १२–१३.
२. आमच्या देशाची स्थिती, विष्णुशास्त्री चिपळुणकर, य० गो० जोशी प्रकाशन, पृ० ४२.
३. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग २), पृ० २२२.
४. कित्ता, पृ० २२४.
५. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग ३), पृ० १७.
६. कित्ता, पृ० १६६.
७. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग १), पृ० ५५.
८. कित्ता, पृ० ५९.
९. कित्ता, पृ० ६१–६२.
१०. कित्ता, पृ० ५५१–५५२.
११. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग ३), पृ० ७०–७२.
१२. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग १), पृ० ६३.
१३. कित्ता, पृ० ४१.
१४. कित्ता, पृ० १३७.
१५. कित्ता, पृ० १५८–१५९.
१६. कित्ता, पृ० ५९०.
१७. कित्ता, पृ० ५९५.
१८. कित्ता, पृ० ५९६.
१९. कित्ता, पृ० ४९९.
२०. कित्ता, पृ० ६४४.
२१. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग २), पृ० ७–८.
२२. कित्ता, पृ० ९.
२३. कित्ता, पृ० ९–१०.
२४. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग ३), पृ० १४४.
२५. कित्ता, पृ० १४४–१४६.
२६. कित्ता, पृ० १६७.
२७. कित्ता, पृ० १७१.
२८. कित्ता, पृ० २३.
२९. कित्ता, पृ० ९८.
३०. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग ४), पृ० ९.
३१. कित्ता, पृ० १४१.
३२. *Bal Gangadhar Tilak : His Writings and Speeches*, Enlaregd Ed., Ganesh Co., Madras, pp. 64–65.
३३. *Ibid*, p. 55.

३४. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग ३), पृ० २०२.
३५. कित्ता, पृ० २६१.
३६. कित्ता, पृ० २५९.
३७. कित्ता, पृ० २९०.
३८. कित्ता, पृ० ३०६–३२८.
३९. कित्ता, पृ० ३३२.
४०. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग १), पृ० ३७६.
४१. कित्ता, पृ० २२५–२२६.

तिसरे व्याख्यान

१. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग १), पृ० २५१–२५२.
२. कित्ता, पृ० २५६–२५७.
३. कित्ता, पृ० ३३०.
४. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग २), पृ० ४८२.
५. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग ४), पृ० १९०.
६. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग १), पृ० २७१.
७. *The Evolution of India and Pakistan: 1858–1947*, C. H. Philips, Oxford & English Language Book Society, 1965, pp. 185–189.
८. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग २), पृ० २३८.
९. कित्ता, पृ० २४०.
१०. कित्ता, पृ० २०.
११. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग १), पृ० २०९–२११.
१२. कित्ता, पृ० २१६.
१३. कित्ता, पृ० २१४.
१४. कित्ता, पृ० २३४–२३५.
१५. कित्ता, पृ० ४५६–४५७.
१६. निबंधसंग्रह (भाग ३), गो० ग० आगरकर, शिराळकर कंपनी, पृ० १८७–१९२.
१७. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग १), पृ० १७९.
१८. लो० टिळकचरित्र, (खंड ३, भाग २), न० चिं० केळकर, पृ० ६७–६८.
१९. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग १), पृ० १०८.
२०. कित्ता, पृ० ३३०.
२१. कित्ता, पृ० ५४८.
२२. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग ३), पृ० ३१७–३२२.
२३. *Bal Gangadhar Tilak: His Writings and Speeches*, Ganesh & Co., Madras, p. 327.

२४. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग १), पृ० ४७५–४७६.
२५. कित्ता, पृ७ २५२.
२६. कित्ता, पृ० १११–११२.
२७. कित्ता, पृ० ५३५–५३६.
२८. कित्ता, पृ० ४८७.
२९. कित्ता.
३०. कित्ता, पृ० ५३२.
३१. कित्ता, पृ० २२१.
३२. कित्ता, पृ० ३३३–३३४.
३३. कित्ता, पृ० ४०६.
३४. कित्ता, पृ० ४०७–४०८.
३५. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग २), पृ० १४.
३६. कित्ता, पृ० १५–१६.
३७. कित्ता, पृ० १७२–१७७.
३८. Valentine Chirol, *Indian Unrest*, Macmillan, London, 1910, pp. 37–71.
३९. *Bal Gangadhar Tilak : His Writings and Speeches*, Ganesh & Co., Madras, p. 2.
४०. लो० टिळकांचे केसरीतील लेख (भाग २), पृ० ३७९.

ठाणा ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक ...०१३७५ दि. ...१६/८/९८
प्राप्ति ...पुस्तक... बोर्ड दि. 9312160



REFBK-0017300



काही प्रकाशने

माझी जीवनकथा
गंगाधरराव देशपांडे
रु० १५.००

चंबळची दस्युभूमी
गीता साने
रु० १५.००

आदर्श भारतसेवक (नामदार गोखले)
नरहर रघुनाथ फाटक
रु० २१.००

मराठी विचारवंत आणि आपण
रु० २.००

सोविएत रशियाची पन्नास वर्षे [खंड १ व २]
संपादक : वसंत पळशीकर
रु० २२.५०

प्राचीन भारतीय राजनीती
र० पं० केंगले
रु० ७.५०